मकरन्द पुस्तक माला.
पुस्तक २७ वें.

# मालती

अथवा

# भारलेली अंगठी.

लेखक

उदास.

प्रकाशक,
नरहर नारायण पटवर्धन,
मकरन्द कार्यालय,
वांई.

मुद्रक,
दामोदर लक्ष्मण लेले,
'मोदवृत्त' प्रेस.
वांई.

( प्रथमावृत्ति )

शके १८३५ ] [ आक्टोबर १९१३

किंमत दहा आणे.

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क " नरहर नारायण पटवर्धन "
यांनीं स्वाधीन ठेवले आहेत.

# दोन शब्द.

वास्तविक या पुस्तकासंबंधानें जास्त तें काय लिहावयाचें ! हें आत्मवृत्त लिहिलें जाण्यास कारण **सुंदरराव.** सुमारें दोन वर्षांपूर्वी एके दिवशीं **सुंदररावास** सुटी असल्यानें आम्हीं सहज गप्पा मारीत बसलो होतों. बोलण्याच्या ओघांत कलकत्त्यांतील त्या दिवशींच्या संध्याकाळची– शुक्रवारची बागेंतील गोष्ट निघाली असतांना **सुंदररावानें** मला माझें चरित्र लिहिलें गेल्यास तें फार चित्तवेधक होईल ह्मणून म्हटलें व पुढेंहि त्यानें एक दोन वेळां आग्रह केल्यावरून मीं तें लिहून त्याचेकडे दिलें. तें वाचल्यावर त्याला फार आनंद झाल्याचें दर्शवून तें आपण प्रसिद्ध करणारच असा त्यानें हेका धरला. मात्र त्याच्या संबंधानें — त्यानें केलेल्या मजवरील उपकारासंबंधानें — असलेला भाग गाळण्याबद्दल मला सुचविलें. मींहि असें असेल व घडलेली सर्वच हकीगत प्रसिद्ध करणार नसलास तर तें प्रसिद्ध करूं देणार नाहीं ह्मणून निक्षून सांगितलें; पण तो कसला छट ! त्यानें या गोष्टीला कांहीं दिवस जाऊं देऊन त्याला नको असलेला त्याच्या संबंधाचा तेवढा भाग गाळून पुस्तकाचीं अस्सल छापलेलीं पानें मला दाखविलीं. शेंवटीं मित्रप्रेमामुळें त्याचा हेतू मला मोडवेना व हें पुस्तक प्रसिद्ध करण्याबद्दल त्याला परवानगी द्यावी लागली.

पुस्तकांतील संविधानक जसें घडलें तसेंच तें दिलें आहे. तें जास्त चटकदार होण्यासाठीं घडलेल्या हकीगतीपेक्षां त्यांत जास्त भर घाल.

ण्यासंबंधानें माझ्या प्रिय **मालतीची** व माझी इच्छा नसल्यानें मला तें जास्त आलंकारिक करितां आलें नाहीं त्यांस नाइलाज आहे. आतां तें वाचकांचें मन कितपत रमवील तें रमवो.

मी कोणी मोठा लेखक नाहीं यामुळें पुस्तकांत भाषादोष असण्याचा बराच संभव आहे. पण तिकडे वाचक लक्ष देणार नाहींत अशी आशा आहे. शेंवटीं हें अल्पचरित्र **सुंदररावानें मकरन्दाच्या** संपादकांकडून वाचकांपुढें ठेवविलें याबद्दल मी **मकरन्द** संपादक यांचा फार आभारी आहे. **सुंदररावा**संबंधानें—त्याच्या मित्रत्वाच्या उपकाराबद्दल त्याचे कितीहि आभार मानिले तरी ते थोडेच आहेत !

# मालती

अथवा

# भारलेली अंगठी.

## प्रकरण पहिलें.

वाचकहो, हें लहानसें पुस्तक ह्मणजे माझा स्वतःचा जीवनवृत्तांत होय. ह्यामध्यें मोठमोठ्या कादंबऱ्यांप्रमाणें चटकदार व हृदयंगम भाषा, वीररसप्रधानप्रसंग वगैरे येणार भाग नाहींत ही गोष्ट मी कबूल करतों. तथापि माझा जीवनवृत्तांत ह्या नात्यानें पहातां व विशेषतः माझ्या एकंदर परिस्थितीकडे लक्ष दिलें असतां हा वृत्तांत स्त्रीपुरुषांची घटकाभर तरी करमणुक केल्यावांचून खास राहणार नाहीं अशी मला उमेद आहे. हा माझा वृत्तांत कोणास खोटा वाटेल व तसें वाटणेंही एकप्रकारें साहजिक आहे; परंतु, सूक्ष्म दृष्टीनें पहातां हा प्रकार खोटा नाहीं अशी अखेर तरी निदान वाचकांची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. माझा आयुष्यक्रम ह्मणजे जगांतील आयुष्यक्रमाहून फारसा भिन्न नाहीं. ह्या मानवी सृष्टींत जे चमत्कार घडून येतात त्यापैकींच हाही एक

आहे. ह्यांत जेवढें चांगलें ह्मणून दिसेल तें सर्व माझ्या सहधर्मचारिणी मालतीचें व जें दोषार्ह असेल तें मात्र माझें असें समजावें. अशी वाचकांची प्रार्थना करून मी मुख्य कथानकाकडे वळतों.

ह्या प्रकरणांत मीं माझा थोडासा पूर्वेतिहास सांगण्याचें योजलें आहे. माझें घराणें म्हणजे कांहीं एकाद्या मोठ्या जहागिरदाराचें नव्हे कीं, त्याला ऐतिहासिकदृष्ट्या कांहीं महत्व येईल. माझें घराणें साधें, खाऊन पिऊन चांगलें सुखी होतें इतकेंच. माझ्या वडील, मातुश्रीनीं ह्या जगाचा बरा वाईट अनुभव घेण्याकरतां मला एकट्यालाच अगदीं लहानपणीं सोडून देऊन स्वर्गलोकीं प्रयाण केलें होतें. घरांत माझें असें कोणीं नव्हतें. फक्त एक म्हातारी बाई होती. हिचें नांव काशी. वास्तविक पहातां ही केवळ मोलकरीण ह्या नात्यानें आमच्या घरीं राहिली होती; परंतु आज कांहीं नाहीं तरी तिचीं पन्नास वर्षें आमच्याच घरांत गेलीं असल्याकारणानें व माझ्यासह तिनें आमच्या तीन पिढ्या पाहिल्या असल्याकारणानें, माझीं मातापितरें मला सोडून गेल्यानंतर आमच्या घराचा बोजा सर्व प्रकारें त्या बिचारीवरच पडला होता व त्यामुळें ह्या घराची ती एकप्रकारें मालकीण बनली होती. तथापि ती आपलें कर्तव्य विसरली नव्हती. तिचें माझ्यावर किती प्रेम होतें तें माझ्यानें लिहून कां दाखवतां येणार आहे ! हें मी लिहीत असतांना ह्यावेळीं ती बिचारी स्वर्गलोकांत माझ्या आईबरोबर मोठ्या सुखांत असेल. ईश्वर तिच्या आत्म्याला शांति देवो.

आमची मूळच गर्भश्रीमंती व तींत माझ्या बाबांनीं बरीच भरही घातली होती. आतां ह्या एवढ्या अफाट संपत्तीचा मी एकटाच कायतो वारस होतों; परंतु हाय ! मला बिचाऱ्याला तिचा काय उपयोग होता.

जेवढें कांहीं पोटांत जाई तेवढेंच काय तें माझें असें समजून मला स्वस्थ बसावें लागत होतें. कारण वाचकहो, मीं दोन्ही डोळ्यांनीं अंधळा होतों ! दृष्टी नाहीं ह्मणजे कांहींच नाहीं ! गाड्याघोडे, नोकरचाकर वगैरे ऐषआराम माझ्या अंधत्वानें मला नसल्यासारखे होते.

परंतु मी जरी अंधळा होतों, तरीपण जन्मांध नव्हतों. लहानपणीं बाबांच्याबरोबर कधीं चौपटीवर तर कधीं वाळकेश्वराकडे, कधीं राणीच्या बागेकडे तर कधीं दिवाळीची लाईट पहावयास. असले सुंदर देखावे पहाण्यास मी गाडींत बसून गेल्याचें मला अजून आठवतें. माझ्या डोळ्यांची अशी ही स्थिति होईल अशी मला त्यावेळीं कल्पना तरी होती काय ? पण दुर्दैव माझें ! कांहीं जिवापाड आजार होऊन त्यांत माझा जीव बचावला; परंतु मी सूरदास बनलों. त्यावेळीं बाबांनीं अनेक इलाज केले; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं ! ह्यामुळें त्यांना फार दुःख झालें व त्या दुःखांतच मी एकटा व तोही असा अंधळा, अशा स्थितींत माझें पुढें कसें होईल; ह्या दुःखद विचारांनीं हाय हाय करून अखेर त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. पुढें माझी आईच कायती मला आधारभूत होती; परंतु तिलासुद्धां बाबांच्या मागें ह्या जगांत फार दिवस रहाण्याचा जणूं कंटाळाच आल्यानें तिनें मला काशीच्या स्वाधीन करून स्वर्गवास पत्करिला ! झालें; ह्याप्रमाणें मी अगदीं लहान वयांतच पोरका बनलों. परंतु बिचारी काशी मात्र आपल्या इमानाला जागली. तिनें माझ्या आईच्या शब्दाला मान देऊन माझें संगोपन केलें व आजचें जगांतलें माझें अस्तित्व हें तिच्याच प्रेमाचें फळ होय.

असो, ह्याप्रमाणें मी तर अंधळा, अर्थात् अशा अंधळ्याच्या

जीवनवृत्तांतांत विशेष तें काय असणार असें वाटून वाचक कदाचित् त्याला हातांतून टाकूनही देतील ! पण नाहीं; हा माझा अंधेळपणा— ज्याला मी अगदीं कंटाळून गेलों होतों व ज्यापेक्षां मृत्यू बरा असें मीं हजारों वेळ म्हटलें असेल त्याचाच—परिणाम असा गोड होईल व पुढला माझा आयुष्यक्रम महत्वाचा होऊन तो मला जगापुढें मांडतां येईल असें मला त्यावेळीं स्वप्नसुद्धां पडलें नव्हतें ! परंतु ज्याअर्थीं मी सर्व सुखें आज अनुभवीत आहें त्याअर्थीं त्या माझ्या अंधळेपणांतही कांहींतरी विशेष हें असेलच ! तर वाचकहो, तें समजून घेण्याची जर तुमची इच्छा असेल तर चला मजबरोबर—पण एका अटीवर—कीं, जसा मी खराखुरा अंधळा तसे तुह्मींही डोळे असून अंधळे बनले पाहिजे; नाहींतर भलताच एखादा अनर्थ ओढवून घ्याल.

---

## प्रकरण दुसरें.

आतां ह्यापुढें जी हकीकत मी देणार आहें त्यावेळीं माझें वय सुमारें बावीस वर्षांचें असेल. माझी दृष्टी गेली त्यावेळीं मी १० वर्षांचा होतों. तेव्हांपासून आजपर्यंत गेलेलीं हीं बारा वर्षें ह्मणजे बारा तपाप्रमाणें मला भासत होतीं, ह्यांत नवल तें काय ! कारण, एक तर मीं वयानें तारुण्यांत नुकताच प्रवेश केलेला व दुसरें असें कीं, मी मुळापासूनच अंधळा असतों तर एक हरकत नव्हती; परंतु जग ह्मणजे काय हें मला किंचित् समजूं लागण्याच्या ऐन उमेदीलाच हा मजवर प्रसंग गुदरला बरें! त्यांतूनही मी घरचा आपला असा तसा असतो—तर

तसेंही नाहीं; खाणेंपिणें, गाडीघोडा, नोकरचाकर, पैसाअडका वगैरे कशाचीही मला काडीमात्र ददात नव्हती. असे छप्पन्न अंधळे रोज माझ्या दारीं भीक मागून जात होते; परंतु, त्यांच्याचसारखा दृष्टीला अंचवलेला एक अभागी त्याच घरांत रहात होता, हें त्या बिचाऱ्यांना काय माहीत! तात्पर्य, ह्या एका व्यंगामुळें मी अगदीं वेडापिसा बनून गेलों होतों. काशी मला रोज गाडींत बसवून बरोबर कोणी तरी देऊन फिरावयास पाठवीत असे. नवे नवे कपडे घालावयास देत असे व रोज कांहीं तरी नवा पदार्थ करवून मला सर्वतोपरीं सुख व्हावें ह्मणून फार खटपट करीत असे; पण हे तिचे प्रयत्न सर्व फोल होत. कारण ह्या सर्व उपचारांचा वास्तविक मला काय उपयोग होता! परंतु मला अमुक एक गोष्ट ह्मणजे नको असें ह्मणून माझ्या अंतःस्थ वैराग्याचें व नैराश्याचें मीं होऊन काशीसमोर एक दिवसही दिग्दर्शन केलें नाहीं. अथवा करून तरी काय उपयोग होता. माझ्या शोचनीय स्थितीबद्दल पोटभर रडावें ह्मटलें तरीसुद्धां तें ऐकून घेणारें काशीशिवाय दुसरें कोणी नव्हतें. अशा रीतीनें सदा दुःखी व निराश असा होऊन मी नेहमीं आपल्या खोलींत पडून असे.

याप्रमाणें मी एक दिवस रात्रीं जेवून खाऊन माझ्या दुःखद स्थितीचा विचार करीत पडलों होतों. तो दिवस म्हणजे श्रावणी सोमवार असल्याकारणानें त्या दिवशीं श्रीबाबुलनाथाच्या पायऱ्या चढून जाण्याचाही लाभ मला झालाच होता. कारण दर्शन ह्मणजे काय ह्याची कल्पना मला काय असणार! त्या ठिकाणीं बसलेल्या अनेक अंधळ्या पांगळ्यांनीं पोटासाठीं प्रत्येकापुढें दीनवाणीनें केलेल्या विनवण्या अद्याप माझ्या कानांत जशाच्या तशाच घुमघुमत

होत्या; इतक्यांत एक अंधळ्याची टोळी ' महाराज, आज सोमवार आहे, सगळ्यांत मिळून एक तरी पैसा द्या ! गरीबांची कांहीं तरी कणवा येऊं द्या. ' असें ओरडत खालीं येऊन थडकली. खालीं नोकरानें एक पैसा त्यांच्या हातीं ठेवला असावा. कारण, लागलीच ' भंडार भरपूर, आम्हां दिलें तांब्याचें तुम्हां देईल सोन्याचें... ' वगैरे रीतीनें आशिर्वाद देऊन ते बिचारे आपल्या मार्गानें निघून गेले.

अंधळे तर निघून गेलेच; परंतु, त्यांच्या ह्या येण्यानें माझ्या मात्र विचारांत क्रांति झाली. मला असें वाटूं लागलें कीं, मीं एवढा श्रीमंत, मला कोणत्याही सुखाची वाण नाहीं असें असूनही मी दृष्टी नाहीं म्हणून इतका वैतागून गेलों ! मग हे तर बिचारे निव्वळ भिकारी, पोटासाठीं रात्रंदिवस दारोंदार भिक्षा मागणारे, ह्यांचे हाल कोण पुसतो ? पण हे बिचारे सुखी कीं, ह्यांच्या बरोबर मार्गदर्शक म्हणून एक तरी डोळस मनुष्य आहे. पण जे बिचारे एकटे दुकटे, रात्रीं-बेरात्रीं गल्ल्याकुच्यांतूनसुद्धां भिकारड्या वीतभर पोटाकरतां भीक मागत फिरत असतात, त्यांना रस्ता कोण दाखवीत असेल; व त्यांना परत ठिकाणावर तरी कोण नेऊन सोडीत असेल ! ईश्वरा; अशा दीनदुबळ्यांची सुद्धां तुला दया येत नाहीं मग तूं दयाघन कसला ! बस्स तें कांहीं नाहीं ! आपण एकदां ह्यांच्यासारखे एकटें कुठें तरी जाऊन पाहिलेंच पाहिजे. त्या शिवाय त्यांचे हाल काय होत असतील तें समजायचें नाहींत, असें मनांत ठरलें !

ह्या नश्वर जगांत नेहमीं असें दिसून येतें कीं, द्रव्यप्राप्तीच्या योगानें मनुष्य अंधळा बनतो व त्याला सारासार विचार रहात नाहीं. आणि मला तर ह्या दोन्ही गोष्टी उत्तम तऱ्हेनें अनुकूल कारण, संपत्ती

तर बरीच होती, आणि अंधळाही पण होतोंच. मग ह्या दोन्हीत तिसऱ्या अविवेकाचीं भर कां पडूं नये ! आतांपर्यंत तेवढाच कायतो कमी होता; पण मला झालेल्या बुद्धीनें ती उणीव भरून काढली. खरोखर ह्यावेळेस माझे चांगले कान उपटणारा जर एखादा दडपता कोणी असता तर माझ्यावरचे पुढील कितीतरी अनर्थ टळले असते ! पण नाहीं; मी म्हणतों, झालें हें एकपरीं चांगलेंच झालें. हा माझा दुराग्रह जर यावेळीं पार पडला नसता तर अनेक दुःखें भोगून आज जें सुख मला मिळत आहे तें मला मिळालें नसतें. तसेंच हा माझा जीवनवृत्तांत जगापुढें मांडण्याची ही उत्तम संधीही मला आली नसती ! पण जाऊं द्या; ती सर्व हकीकत क्रमाक्रमानें पुढें यायचीच आहे, हें मीं अगदींच विसरून जाऊन कुणीकडे तरी वहात चाललों ! असो.

घरांतून बाहेर पडावयाचें असें मनांत येतांच तसें करण्याचा माझा पक्का निश्चयही झाला व निश्चय होतांच मी तयारीला सुद्धां लागलों. ह्यावेळीं सुमारें दहा वाजले होते. अर्थात् घरांत जिकडे तिकडे निजानीज होऊन सर्वत्र शांततादेवीचें साम्राज्य सुरू होतें. अशावेळीं मी मुकाट्यानें पलंगावरून उतरून अंगांत कोट घालून टोपी चढवली व हातांत एक भक्कमशी काठी घेतली आणि दरवाजाला कुलूप लावून किल्ली खिशांत टाकली. माडीचा जिना व पुढील दरवाजापर्यंतचा रस्ता नेहमींच्या सरावांतला असल्याकारणानें तो गांठावयास मला विशेषसा त्रास पडला नाहीं. सुदैवानें दरवाजा त्यावेळीं उघडा असल्यामुळें मी हळुहळू काठी टेकीत दरवाजाच्या बाहेर येऊन उभा राहिलों व वास्तविक इथूनच माझ्या प्रवासाला सुरवात झाली !

एकदां रस्त्यांत येऊन उभें राहिल्यावर पुढें काय करावयाचें ह्या-

बद्दल मीं थोडासा विचार केला व आमच्या घराजवळचा एक कमेटीचा कंदील असे तो पायऱ्यापासून किती पावलावर होता तीं पावलें मोजलीं. नंतर आमचें घर गल्लींत असल्यानें तेथून मोठ्या रस्त्यावर यावयास लागलेलीं पावलें मोजलीं व हे दोन्ही आंकडे बरोबर ध्यानांत ठेवून एकदांचा मोठ्या सडकेवर येऊन पोंचलों. आतां पुढें जायचें कुठें ? हा एक मोठा प्रश्न आला. पण त्याचाही उलगडा ताबडतोब झालाच. कारण मला कांहीं अमुक एका विवक्षित ठिकाणीं असें जायचें नव्हतेंच. कुठें तरी फेरफटका करावयाचा होता. अर्थात् उजव्या बाजूलाच मीं आपला मोर्चा फिरविला व हळुहळूं काठी टेकीत, चांचपडत, गाड्या-घोडे वगैरे संमर्दांतून आमची स्वारी हा अंधळ्याचा प्रवास करूं लागली.

वाटेनें माझी किती त्रेधा उडाली ती जर मी दुसऱ्या एखाद्या अंधळ्या भिक्षेकऱ्याला सांगूं लागलों तर ती त्याला सुद्धां खरी वाटणार नाहीं. किती ठिकाणीं अडखळलों, किती ठेंचा लागल्या व किती वेळां भिंतीवर डोकें आपटलें तें कांहीं विचारूंच नका ! एकदां तर असें झालें कीं, काठी टेकतां टेकतां एका मुतारींतच जाऊन अडकलों व तेथून कांहीं बाहेर निघतां येईना ! जिकडे काठी टेंकावी तिकडे भिंती लागूं लागल्या. पण अखेर एका गृहस्थानें त्यांतून माझी सुटका करून मला रस्त्यावर आणून सोडिलें. पण पुढें तर याहूनही एक गमतीची गोष्ट घडून आली ! वाटेनें जात असतां एका गृहस्थाच्या व माझ्या मस्तकाची चांगली नादयुक्त भेट झाली. तो गृहस्थ पडला मदिरादेवीची सेवा करणारा ! त्यानें एकदम " कां हो, नीट बघून चालावें कीं नाहीं ? काय अंधळे बिंधळे आहांत कीं काय ! " असें मला हटकलें. मला तर त्यावेळीं बराच राग आला होता; पण करायचें काय ? मुकाट्यानें, अत्यंत

नम्रपणानें, " होय महाराज, मी खरोखरच अंधळा आहें ! " असा जबाब दिला. मला वाटलें होतें कीं, एवढ्यानें त्याचें समाधान होईल; पण छे:, तो मला फिरून " मग ! अंधळे होतात तर एक कंदील घ्यायचा होता बरोबर ! " असें ह्मणून निघून गेला.

मला तर ह्या त्याच्या बोलण्याचें हसूंच आलें. कारण त्याच्या ह्मणण्याप्रमाणें जरी मजजवळ एखादा कंदील असता तरी मला त्याचा कांहीं उपयोग नव्हता. पण त्याचा उजेड पाहून व त्यावरून मी अंधळा आहें असें समजून दुसरा कोणी आला नसता ह्मणावें तर ती गोष्ट निदान ह्या गृहस्थांच्या बाबतींत तरी शक्य नव्हती ! कारण मदिरादेवीच्या फाजील कृपेनें हे गृहस्थ जवळ जवळ माझ्यासारखेच बनले होते ! आणखी किती तरी चमत्कारिक प्रसंग आले; पण ते सर्वच ह्याठिकाणीं सांगत बसून वाचकांना कंटाळा आणीत नाहीं.

हा माझा प्रवास किती पल्ल्याचा झाला कोणास ठाऊक; परंतु पुढें जेव्हां गाड्याघोड्यांची गर्दी साफ नाहींशी होऊन माणसांची चाहूलही ऐकूं येईनाशी झाली, तेव्हां मात्र मला भीती वाटूं लागली. आपण किती दूर आलों कोणास ठाऊक, परत जातांना रस्ताबिस्ता चुकला ह्मणजे पंचाईत व्हायची, तर आतां घरचा रस्ता सुधारावा असा विचार करून मी परत फिरलों.

परत येतांना मी माझ्याकडून तर झपाट्यानें येत होतोंच; पण एखादा अंधळा जलद जलद ह्मणजे कितीसा जलद चालणार. ह्यावेळीं रस्त्यांत गर्दी नसल्याकारणानें पहिल्याप्रमाणें कांहीं टकरा किंवा ठेंचा लागल्या नाहींत ही गोष्ट खरी. परंतु, रस्ता विचारावयास सुद्धां मनुष्य मिळेना. तेव्हां मात्र माझे हातपाय लटपटूं लागले. पण त्यांतल्यात्यांत

कसाबसा आणखी थोडा वेळ चालूनही जेव्हां कोणीच भेटेना तेव्हां मात्र अगदीं निराश झालों व अखेर एका ठिकाणीं स्वस्थ बसलों. नंतर मनाचा निश्चय केला कीं, आतां कोणी तरी मनुष्य ह्या रस्त्यानें येऊन माझ्या घराचा रस्ता सांगेपर्यंत येथून हालावयाचें म्हणून नाहीं.

हा वरील निश्चय झाला खरा; पण तो शरीरानें सुद्धां पक्का नव्हता, मग मनाची गोष्ट तर सोडूनच द्या ! हातपाय थरथर कांपत होते व आंत काळीज तर नुसतें उडच्या मारीत होतें. बस्स, एकदां झालें तें झालें; पुनः म्हणून असा मूर्खपणा करावयाचा नाहीं. आतां घरीं जातांच काशीला मात्र ही हकीकत कळली नसली ह्मणजे साधली ! कसा मी मूर्ख कीं, वेळेकडे एवढें सुद्धां लक्ष गेलें नाहीं ! अशा तऱ्हेनें मनांत विचारपरंपरा चालली होती व तिची शरीराचे लटपटणारे अवयव सांथ करीत होते. इतक्यांत एक मनुष्य मी बसलेल्या जागेकडे येत असावा असा मला भास झाला. तो मनुष्य तोंडानें एका पदाचें वेडेवाकडे सूर काढीत येत होता. त्याच्या सुरांत जे भलते सलते आरोहावरोह होत होते त्यावरून त्याच्या शरीरावर त्याचा पूर्णपणें ताबा नव्हता. अर्थात् त्यानें त्यावेळीं मदिरेचें यथेच्छ सेवन केलें असावें असें मला वाटलें. पण जाऊं द्या, मला त्याच्या ह्या कृतीशीं काय करावयाचें होतें ? असो; तो मनुष्य आतां चांगला जवळ आला असें समजून मीं त्यांस “ रामराम हो, दादा, रामराम. ” ह्मणून हटकलें. त्यावर तोही मजजवळ येऊन “ रामराम ” ह्मणून मी कोण व मला काय पाहिजे ह्मणून विचारूं लागला. मीं त्याला पहिल्यानें किती वाजले म्हणून विचारलें. त्यावर त्यानें एक वाजून गेला म्हणून सांगितलें, त्याबरोबर माझ्या पोटांत धस्स झालें व

" अबबब ! इतका उशीर झाला काय ? पण कांहो दादा, इथून फणसवाडी किती दूर आहे ? " असें मीं विचारलें.

" काय फणसवाडी ? ती कांदेवाडी जवळची ना ! ती तर जवळ आहे. आं ! आणि तुम्हीं अंधळे दिसतां ! "

" होय हो ! रस्ता चुकलों, अखेर इथें बसलों ! किती तरी वेळ झाला, कोणी या रस्त्यानें येईना; पण आतां तुम्हीं आलांत; तेव्हां म्हटलें तुम्हाला तरी विचारावें. "

" अरेरे ! अंधळ्यानें रस्ता चुकणें म्हणजे फारच पंचाईत बुवा ! पण कांहीं हरकत नाहीं. मलाही विद्यारामभाईच्या वाडीकडेच जायचें आहे; तेव्हां जातां जातां तुम्हाला फणसवाडीपर्यंत सहज पोंचवून देईन. " असें म्हणून त्यानें माझा हातही धरला.

मला आणखी काय पाहिजे होतें ? तो मनुष्य म्हणजे देवच भेटला असें मला वाटून " वा; तर मग माझ्यावर हे मोठेच उपकार झाले म्हणायचे. ईश्वर तुम्हाला सुखी राखो. " असें म्हणालों व त्याच्या मागून जावयास सिद्ध झालों. तोही " अं: त्यांत कसचे उपकार हो ! " असें बोलून चालूं लागला.

ह्या गृहस्थाचा हात धरून चालत असतांना वास्तविक पहातां मला माझ्या काठीचा उपयोग करण्याची मुळींच जरूर नव्हती; परंतु, तो जरा घोड्यावरच असल्याकारणानें त्याच्या वक्रगतीबरोबर साथ करावयास मला ती वरचेवर उपयोगांत आणावी लागे. मधून मधून त्याचें माझें भाषणही चाललेंच होतें. परंतु, मला एकदां कसें तरी घर गांठायचें होतें. अर्थात् तोच एक विचार माझ्या मनांत असल्याकारणानें त्याच्या बोलण्याकडे माझें विशेषसें लक्ष नव्हतें.

याप्रमाणें कांहीं वेळ चालल्यावर तो गृहस्थ एकदम उभा राहिला व म्हणतो " हां, हे पहा, आपण अगदीं फणसवाडीच्या नाक्यावर येऊन पोंचलों. आतां डाव्या बाजूला फणसवाडीच. तुमचें घर कुठेसें आहे तें सांगा म्हणजे–" तो पुढें कांहीं बोलणार होता; पण त्याला मध्येंच अडवून मी म्हणालों, " नको नको ! फणसवाडीच्या नाक्यावर आपण आलों ना ? आतां माझें घर इथून जवळ आहे. आणि तें माझ्या पायाखालच्या रस्त्यावर आहे. आतां मी एकटासुद्धां जाईन."

हें ऐकून त्यानें माझा हात सोडला व कांहीं वेळ थांबून म्हणाला, " पहा बोवा ! नाहींतर थेट घरींही नेऊन सोडतो पाहिजे तर. "

" नको नको; कांहीं कारण नाहीं. आतां मी घरीं पोंचल्यासारखाच आहे. तुमचें मात्र मजवर मोठे उपकार आहेत. हो, नाहींतर कोण कुणाच्या उपयोगी पडतो ? "

" अः, कसले आले आहेत त्यांत उपकार. तें कांहीं तुम्ही मनांत आणूं नका. तर मग मी जाऊं ! "

" या बरें. मी आतां घरीं पोंचतांच ईश्वरानें तुम्हाला सुखी ठेवावें म्हणून त्याची प्रार्थना करीन. "

पण माझें हें भाषण ऐकावयास तो उभा कुठें होता ! माझा हात सुटतांच तो " रामराम " म्हणून तडक निघून गेला. चलाबुवा ! आज हा मनुष्य भेटला म्हणून खैर झाली. नाहींतर कोण पंचाईत आली होती. आतां पुनः म्हणून एकटें बाहेर जावयाचें नाहीं असा पक्का निश्चय केला व आतां काशी मात्र काय म्हणेल तें मुकाट्यानें ऐकून घेतलें पाहिजे. असा विचार करीत करीत हा प्रवास अखेरीस सुखकर झाला म्हणून आनंद मानीत मी डाव्या हातानें माझ्या घराकडे मोठ्या

आनंदानें चाललों. चालतांना पावलें मोजण्याचें काम सुरू होतेंच. पहिल्यानें घरांतून निघतांना मोजलेल्या पावलांइतकीं पावलें भरतांच उभा राहून काठीनें चांचपलें तों मोठी खूण म्हणजे आमच्या घराजवळ असलेला कमेटीचा कंदील, तो सांपडला. झालें, आतां काय मी घरांतच येऊन पडलों म्हणायचा, असें वाटून पुढच्या पायरीवरून दरवाजा चांचपला तोही उघडाच होता. एवढ्या अपरात्रीं दरवाजा उघडा कां अशी एकदां शंका आली; परंतु मला कोणा नोकराच्या नजरेस पडावयाचें नव्हतें म्हणून, उठलें असेल कोणी तरी व गेलें असेल सहज बाहेर असें वाटून मीं तडक आपल्या माडीचा रस्ता धरला. जिन्याच्या पायऱ्या मोजून बरोबर भरतांच खोलीचें दार चांचपलें तों तेंही हातीं लागलें. मग काय हुश्श करून किल्ली काढून कुलुपास लावली व दरवाजा उघडून मी एकदांचा माझ्या स्वतःच्या खोलींत आलों.

सर्वांग घामानें भिजलें होतें म्हणून हातांतली काठी, डे.क्य.ची टोपी, कोट सगळें कांहीं कसें तरी फेंकून देऊन पलंगाकडे वळलों; पण पलंग सांपडेना. कोंपरा चुकलों असेन म्हणून दुसरा, नंतर तिसरा ह्याप्रमाणें चारी कोंपरे तपासलें; परंतु पलंग नाहीं ! तेव्हां मात्र धाबें दणाणलें. असें कसें झालें, खोली चुकलों तर नाहीं? छे; जिन्यावरून येतांच पहिली खोली माझी, मग चुकेन कसा ? शिवाय कुलूपही माझ्याच किल्लीनें उघडलें. हा मोठाच चमत्कार म्हणावयाचा. पण तसें नाहीं; एकदां सगळें नीट तपासूं या ! असा विचार करीत माझ्या खोलींतली मोठी खूण ह्मणजे माझ्या बाबांची तसबीर, तिथें हात लावून चांचपलें तों तसबीर नाहीं कांहीं नाहीं ! कांहीं रिकाम्या बाटल्या मात्र हातीं लागल्या. झालें,

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ व नारायण
दा. नों. १५८०



आशेचा शेवटचा तंतू याप्रमाणें तुटला. यावेळीं माझे हातपाय लटपटूं लागले व सर्वांगाला दरदरून घाम सुटला. घात झाला ! मी कुणातरी भलत्याच्या घरांत येऊन पडलों. त्या गृहस्थानें फणसवाडींत म्हणून आणून सोडलें; पण अखेर साफ फसविलें ! आतां माझें पुढें कसें होणार ! इत्यादि नानाप्रकारच्या भयंकर विचारांनीं माझें डोकें भणभणून गेलें व मी तसाच खालीं बसलों.

कांहीं वेळ मस्तक अगदीं शून्य झालें. हजारों कल्पना वायुवेगानें अंतःकरणांत आल्या व मला कांहीं सुचेनासें झालें. वाचकहो, त्यावेळीं माझी स्थिति काय झाली असेल याची कल्पना तुम्हीच करा. सांप्रत मी ती हकीकत नुसती लिहीत आहें; पण तेवढ्यानेंच मी इतका गोंधळून गेलों आहे कीं, पुढची हकीकत लिहावयास चित्ताची स्थिरता होण्याकरतां मला ह्याठिकाणीं कांहीं वेळ विश्रांतीच घेतली पाहिजे.

---

## प्रकरण तिसरें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मी त्या अनोळखी जागेंत येऊन पडल्यानंतर कांहीं वेळानें अंतःकरणाची किंचित् स्वस्थता झाल्यावर पहिल्यानें त्या फणसवाडींत म्हणून आणून सोडणाऱ्या गृहस्थाला मनांतल्या मनांत एक लाखोली मोजली व नंतर पुढचा मार्ग काय याबद्दल विचार करूं लागलों. बराच वेळपर्यंत मेंदूची उलथापालथ करून पाहिली; परंतु, तेथून मुक्ततेची कांहींच कल्पना सुचेना. सबब ' यापुढें जें काय होईल तें खरें. उद्यां सकाळीं ह्या घराचा जो

कोणी मालक असेल तो येईलच. तो आल्यावर त्याच्यापुढें झालेल्या सर्व हकीकतीचा खराखुरा पाढा वाचून त्याची क्षमा मागूं व घरचा रस्ता सुधारूं. तोंपर्यंत सांप्रतच्या ह्या कैदेंतच राहिलें पाहिजे. ' असा पक्का विचार करून मी तेथेंच आडवा झालों.

ईश्वरानें निद्रा ही स्थिति किती अपूर्व निर्माण केली आहे. तिचा प्रसाद मिळतांच मनाला किती आल्हाद होतो. ह्या स्थितीचा अनुभव घेत असतांना देह व आत्मा हे निदान त्या वेळेपुरते तरी सर्व आधि-व्याधींपासून अलिप्त असतात. परंतु मानवांना ही अमूल्य देणगी देतांना तिची गुरुकिल्ली मात्र ईश्वरानें आपल्या हातीं ठेविली आहे. चित्तांत शांतता नसेल तर निद्रा दूर दूर पळते. तिचें आणि चिंतेचें अत्यंत वाकडें असतें व ह्या सवतीमत्सरामुळेंच निद्रेशिवाय कित्येक संतप्त व विकारग्रस्त आत्म्यांना पराच्या मृदुशय्येवरसुद्धां तळमळत पडावें लागतें. वाचकहो, हीच स्थिति कांहीं वेळ माझी झाली. परंतु एकदां माझा पक्का निश्चय झाल्यावर जसजसें हृदयांतील चिंतेचें ठाणें उठत चाललें तसतसा डोळ्यावर निद्रेचा अंमलही हळुहळू बसत चालला.

तशा परक्या जागेंत व नुसत्या जमिनीवर मला झोंप लागत होती; परंतु ती असावी तशी गाढ मात्र नव्हती. माझा डोळा लागतो न लागतो तोंच मला एक स्वप्न पडलें व त्यांतच थोडासा दचकल्यासारखा होऊन निद्रा मजपासून थोडीशी दूर सरकली. तिच्या संगमाचा पुनः प्रयत्न करणार इतक्यांत मजपासून जवळच कांहीं अंतरावर कोणी तरी बोलत असल्याचा भास झाला. कोणी तरी त्या जागेवर आल्यानें माझा फायदाच होता ह्मणून मी उठून बसलों व जिकडून तो आवाज येत होता त्या अनुरोधानें कान देऊन ऐकूं लागलों.

बराच वेळ झाला तरी तो आवाज जवळ येईना व स्पष्ट असें कांहींच समजेना. परंतु तेवढ्यावरूनच मीं असा अंदाज केला कीं, माझ्या खोलीपासून थोड्या अंतरावर एखादी खोली असावी व त्या ठिकाणीं कोणी तरी तीन चार इसम बसून बोलत असावेत. यापलीकडे मात्र—त्यांच्या बोलण्याचा विषय काय असावा वगैरे—कांहीं समजलें नाहीं. याप्रमाणें मनुष्याची मदत जवळच मिळणें शक्य आहे अशी जेव्हां माझी खात्री झाली तेव्हां त्यांना आपली हकीकत सांगून त्यांच्याच साह्यानें पुढचा ह्मणजे घरीं जाण्याचा बेत पार पाडावा असा विचार माझ्या मनांत आला. त्याप्रमाणें हलकेंच उठून चांचपडत चांचपडत मी खोलीच्या दरवाजापर्यंत येऊन पोंचलों.

परंतु काय मौज पहा! त्याचवेळीं त्याच जागेंतून हार्मोनियमचे मधुर स्वर निघूं लागले व त्याच्याबरोबर सुस्वर जनानी गाण्याचे आलापही सुरू झाले. यामुळें मी किंचित् थबकलों. विचाराअंतीं हें कदाचित् एखाद्या विश्वयोषितेचें विलासमंदिर असावें व त्याठिकाणीं तिचे भक्त रंग उडवीत बसले असावे असा माझा तर्क झाला. अर्थात् अशाठिकाणीं माझ्यासारखा अपरिचित अंधळा एकाएकीं गेल्यानें कदाचित् त्यांचा रसभंग व्हावयाचा, सबब तूर्त येथेंच रहावें असें वाटून मी पुनः चार पावलें मागें परतलों.

मी स्वतः गाण्याचा फार शोकी होतों. त्यांतून गाणारी स्त्री व तिची सांथ करणारी पेटी असा योग जुळतांच मी क्षणमात्र आपली स्थिति विसरून जाऊन अगदीं तल्लीन झालों. त्या स्त्रीनें तर गाण्याची बहार करून सोडली. तिचें ते मधुर आलाप ऐकून मी तर बसल्याजागीं डुलतच होतों. वाचकहो, फार काय पण एक वेळ तर ' वन्समोअर ' !

हे शब्द माझ्या अगदीं ओंठावर आले होते; परंतु इतक्यांत ह्या गायनरंगाच्या रसाचा व माझ्या तल्लीन झालेल्या हृदयाचा भंग करण्याकरतांच कीं काय त्या जागीं एकदम कोणी तरी भांडल्यासारखा आवाज ऐकूं येऊं आगला. अर्थात् ह्यामुळें तें गाणें तितकेंच थांबलें.

ही गडबड काय असावी ह्याविषयीं विचार करावयास मला पुरता एक क्षणही मिळाला नाहीं तोंच ती गडबड किंचित् कमी होऊन तिच्या जागीं एका स्त्रीच्या रडण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्याबरोबर मी उठलों व उभा राहून भिंतीजवळ कान लावून ऐकूं लागलों. मला कांहीं पुरतेंसें ऐकूं आलें नाहीं; परंतु जेव्हां त्या स्त्रीच्या गुदमरल्यासारख्या अस्पष्ट आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या त्यावेळेस मात्र 'येथें कांहीं तरी दगा आहे!' अशी माझी खात्री झाली.

वाचकहो, स्त्रीजात म्हणजे अत्यंत निरपराधी. तिचे हे असे हाल कोण सहन करील. बस्स, तें कांहीं नाहीं. आपण ह्याठिकाणीं जिवंत आहोंत तोंपर्यंत तरी निदान असा अत्याचार घडूं देणार नाहीं! त्या मांगांनीं तिचा देह तिच्या आत्म्यापासून जर अद्याप वेगळा केला नसेल तर आधीं मी आपला बळी देईन व मग त्यांना पाहिजे तर तसें करूं देईन. असा मनाचा निर्धार करून मी खोलीबाहेर पडलों.

क्रोध ह्या मनोविकाराचा काय जबर प्रभाव हा. ह्यावेळीं मला तोच वाट दाखविणार होता. वास्तवीक मी अंधळा होतों मग माझ्या हातून त्या स्त्रीला त्या प्रसंगीं मदत ती काय होणार होती! परंतु, त्या प्रसंगीं माझें व्यंग मी पार विसरलों असल्यानें तसाच तडाक्यानें झपाझप पावलें टाकीत त्या जागेच्या अनुरोधानें गेलों तों माझ्या हातीं एक दार लागलें. मी जातांनाच जोरानें गेलों होतों

यामुळें माझी धडक दरवाजावर जोरानें बसली व सुदैवानें झणों अगर दुर्दैवानें झणा; तो दरवाजा उघडा असल्यानें मी आंत गेलों किंवा माझा झोंक आंत गेला. पण येथेंच माझ्या पायांनीं माझ्या शरीराचा भार वाहण्याचें नाकबूल केलें ! कारण, मी जों आंत गेलों तों कसल्याशा एका जिनसाची व माझी टक्कर होऊन आह्मी उभयतांनीं भूमीवर एकदमच शयन केलें !

ह्यावेळीं माझी स्थिति काय झाली असेल ती मी इतक्यांतच सांगत बसत नाहीं. कारण ती काय झाली होती तिचा विचार करण्यास व सहज चांचपून ज्याची मला धडक लागली तो एक दुर्दैवी मानवी प्राणी आपल्या मृत देहानेंच पडला होता हें समजून घेण्यास मला त्यावेळीं पुरते चार क्षणही मिळाले नाहींत तोंच कोणी एकानें येऊन माझा गळा गच्च दाबून धरला ! मला निःशब्द करून सोडलें.

त्या बिचाऱ्या निरपराध स्त्रीचें संरक्षण करावयास झणून आलेला मी; पण तूर्त माझ्याच प्राणावर येऊन बेतली ! अशा प्रसंगीं स्वशरीर-रक्षणार्थ धडपड करूनही कांहीं उपयोग होणार नव्हता. कारण एक प्राणी तर पंचतत्वाला पोंचलाच होता व दुसऱ्याचीही तीच स्थिति होण्याच्या बेतांत होती. अर्थात् अशा वेळीं मीं जर यत्किंचितही हाल-चाल केली असती तर त्या क्रूर राक्षसांनीं मलाही यमपुरीचा रस्ता दाखवावयास फारसा वेळ लावला नसता. झणून मी तसाच गप्प पडून राहिलों. परंतु मनुष्याला प्राणाहून दुसरी कोणती वस्तु प्यार आहे ? तिच्या बचावाकरतां तो काय करणार नाहीं ! माझा गळा इतका गच्च दाबून धरला होता तरी, तशांतही " अहो, मी अंधळा आहे ! मी रस्ता चुकून येथें आलों ! मला गरिबाला मारून तुह्मांला काय

मिळणार ! मला सोडा ! " इतके शब्द अडखळत अडखळत मोठ्या कष्टानें कसे तरी बोललोंच. त्यावर माझी मानगुटी धरणारा तो गृहस्थ मोठ्या रागानें मला म्हणतो, " गप्प बैस हरामखोरा, यापुढें एक शब्द उच्चारशील तर तुलाही तीच वाट पहावी लागेल. "

अगदीं बरोबर. मला बिचाऱ्याला तीच वाट दाखवायला त्याला वेळ कशाला पाहिजे होता ! असो. ह्या भाषणाचा परिणाम एवढाच झाला कीं, माझ्या गळ्याभोंवतालची मगरमिठी तर लवमात्रही सैल झाली नाहींच; पण त्या गृहस्थानें मला किंचित् बाजूला ओढून मात्र बसविलें. ह्यावेळींही मी पुनः " अ—हो—मी—अंधळा— " असें कांहीं बोलावयास लागलों होतों; परंतु माझ्या तोंडून एवढेच शब्द पुरते बाहेर पडलेही नसतील तोंच दुसरा एकजण मला म्हणतो, " हां, तुला गप्प बैस म्हणून सांगितलें ना ? खबरदार आतां एक ब्र सुद्धां काढशील तर. नाहीं तर ह्या सातबारी पिस्तुलाच्या एका गोळीनेंच तुझ्या टाळक्याच्या चिंधड्या होतील. " आणि खरोखर जणूं कांहीं हें त्याचें भाषण मला खरें वाटावें म्हणून त्यानें तें प्राणघातक हत्यार अगदीं माझ्या कानावर टेकलें असावें. कारण माझ्या कानाला कांहीं तरी गार पदार्थाचा स्पर्श होत होता असें मला भासलें.

ह्या त्याच्या भाषणावर उत्तर देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आणखी कांहीं वेळानें येणारा मृत्यु आतांच आणणें होतें म्हणून मला अगदीं गप्प बसणें भाग पडलें. परंतु, अशा रीतीनें त्यांनीं माझे सर्व अवयव जरी आपल्या स्वाधीन करून घेतले होते तरी पण सुदैवानें माझें कर्णेंद्रिय मात्र माझ्या स्वाधीन होतें व त्याचा उपयोग करण्याची मला पूर्ण मुभा होती. ते लोक आपापसांत कांहीं तरी

बोलत होते; परंतु तेंही इतकें हळूं बोलत होते कीं, त्यांच्या गुणगुणी पलीकडे मला कांहीं समजलें नाहीं. पण इतकें मात्र खरें कीं, ते इकडून तिकडे फिरत होते व चालतांना त्यांचीं पावलें जड अशीं ऐकूं येत होतीं. त्यावरून ते हातांत कांहीं तरी बोजा घेऊन जात असावेत–त्यांनीं नुकत्याच केलेल्या ह्या दुष्ट कृत्याचा मागमूस नाहींसा करण्याच्या बेतांत असावेत–इतका तर्क मला सहज बांधता आला.

इतकी व्यवस्था करून नंतर ते यमदूत माझ्याकडे वळले. त्यांपैकीं दोघेजण तर मजजवळ होतेच. कारण एकानें माझा गळा दाबून धरला होता व दुसऱ्यानें माझ्या दोन्ही हातावर आपले दोन्ही पाय ठेवून तें कालयंत्र माझ्या कानाला भिडविलें होतें. याशिवाय निदान दोन तरी सजीव राक्षस त्या खोलींत खात्रीनें होते. कारण एकानें दोन्ही हातांनीं माझ्या पापण्या खालीं वर करून माझ्या डोळ्यांची तपासणी केली व दुसऱ्यानें–माझ्या डोळ्याजवळ मला जी उष्णता भासत होती तीवरून–त्याला दिवा दाखविला असावा. ह्याप्रमाणें दोन तीनदां माझ्या डोळ्यांची तपासणी झाल्यावर–मला वाटतें मी खरोखरच अंधळा आहे अशी त्यांची पक्की खात्री झाल्यावर मात्र माझे हाल थोडेसे कमी झाले. माझ्या गळ्याचा फासही जरा सैल झाला, माझ्या डोळ्याजवळची उष्णताही पार नाहींशी झाली व माझ्या हातांवरील बोजाही काढून घेण्यांत आला. अर्थात् मला जरा मोकळ्यारीतीनें श्वासोश्वास करतां येऊं लागला.

परंतु त्या चांडाळांनीं मला अशा स्थितींतही फार वेळ ठेवलें नाहीं. सुमारें चार पांच मिनिटांनीं मला उठवून उभें करण्यांत आलें. एकानें माझे दोन्ही हात धरून फरफर ओढीत सुमारें १०।१२ पावलें नेल्या-

वर तेथें बसवलें. ह्याठिकाणीं मात्र माझा गळा पूर्णपणें मोकळा झाला; पण ही संधी साधून मी पुनः कांहीं तरी बोलेन ह्मणून कीं काय, एक-जण अगदीं माझ्या कानाजवळ तोंड आणून मला म्हणाला, " तूं असा मोकळा आहेस असें समजून कांहीं बोलण्याच्या—फार काय पण नुसतें ' हूं ' करण्याच्या खटपटींत पडशील तर संभाळ ! हें पिस्तूल अद्याप माझ्या हातांत असून तुझ्या अगदीं छातीवर रोखलेलें आहे."

बोलायचें नाहीं असा तर माझा आधींच निश्चय झाला होता. त्यांतून ही सक्त ताकीद पोंचलेली ! मग मी तोंड उघडण्याच्या भानगडींत पुनः कशाला पडतों. दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसलों झालें.

ह्याजागीं मला सुमारें अर्धा तास स्वस्थ बसावें लागलें; पण तो अर्धा तास ह्मणजे मला किती तरी लांबलचक वाटला. माझ्या-वरचा पहारेकरी सुद्धां अगदीं माझ्या जवळच बसून असावा असें मला वाटलें. कारण त्याचा तो घोगऱ्या आवाजांतला श्वासोश्वास अगदीं माझ्या कानाजवळ आहे असें भासत होतें. तो असतांना नुसता हात हलवावयाची सुद्धां मला पंचाईत होती. कारण जर तसें करावें तर कदाचित् त्याच्या मनांत भलतीच एखादी शंका येऊन त्याचा परिणाम आमच्या प्राणावरही घडावयाचा ! पण वाचकहो, जरी मी त्या ठिकाणीं बसलों होतों तरी माझा देहच मात्र तेथें बसला होता. माझ्या अंतःकरणाची कोण धांदल उडाली होती. त्यांचें तें अमानुष कृत्य व तें करावयास त्यांच्या अंगीं असलेलें राक्षसी धाडस, त्याचप्रमाणें मधून मधून मला ऐकूं येत असलेल्या त्या निरपराध स्त्रीचें वेदना युक्त कण्हणें—कारण तसा आवाज मला अस्पष्ट ऐकूं येत होता—, शिवाय ज्या दुष्टांनीं एक खून तर केलाच होता व दुस-

राही अर्धवट करून ठेवला होता ते आतां माझें पुढें काय करणार अशाविषयीं आलेल्या असंख्य भयप्रद कल्पनांनीं, माझ्या चित्तांत कोण हलकल्लोळ उडवून दिला होता त्याचें वर्णन कुठवर करूं ?

असो, ह्याप्रमाणें मी चिंताग्रस्त असा सुमारें अर्धा तास बसल्यानंतर माझ्या खोलींत पावलांचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्यावरून केलेलें दुष्ट कृत्य नापत्ता करून आतां हे यमदूत माझा समाचार घ्यावयास आले कीं काय असें वाटून मी दचकलों. आंत येतांच त्यांनीं पुनः एकवार माझ्या डोळ्यांची परीक्षा केली व कांहीं वेळानें मला तसाच सोडून ते सर्व मला वाटतें त्याच खोलींतल्या एका कोंपऱ्यांत गेले असावेत. ते त्या ठिकाणीं आपापसांत कुजबुजत होते; पण मला मात्र त्यापैकीं एक अक्षरसुद्धां ऐकूं आलें नाहीं. कांहीं वेळानें त्या ठिकाणीं बाटल्यांचे बूच उडून कांचपात्रांचे ठणठण आवाज ऐकूं येऊं लागले. अर्थात् एवढें थोरलें महत्कृत्य केल्यानंतर शरीरांत हुषारी आणण्याकरितां किंवा त्याहूनही एकादें जास्त राक्षसी कृत्य करावयास ताजा दम आणण्याकरितां कांहीं तरी पेय पदार्थांची ही तजवीज चालली असेल असें वाटून मीं तिकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं.

याप्रमाणें सर्व विधी उरकल्यावर सुमारें पावतासनें ते पुनः मजकडे आले व यावेळीं माझ्या जबानीला सुरवात झाली. त्यांपैकीं एकानें माझें नांव, गांव, जात, धंदा वगैरे सर्व कांहीं विचारावयास सुरुवात केली; पण भाषणाच्या सुरुवातीपूर्वीं सुद्धां पिस्तुलाची भीति दाखवून सर्व खरें खरें सांगण्याविषयीं खडकावून बजावण्यास ते चुकले नाहींत. ही प्रश्नमालिका सुरूं झाली तेव्हां यांना उत्तर काय द्यावें, खरें सांगावें कीं, खोटें सांगावें हा एक मला मोठाच प्रश्न पडला. पण ही शंका

येऊन न येऊन काय उपयोग होता ? कारण माझ्या खऱ्या खोट्यावर ते दुरात्मे थोडाच विश्वास ठेवणार होते. अर्थात् मी खरें बोललों असतों तरी कांहीं विशेषशी अडचण नव्हती; परंतु उगाच मन भित्रें ह्मणून ' मी गरीब असून अंधळा आहें; सहज बाहेर जात असतांना रस्ता चुकून येथें आलों. ' असें सांगून व कांहीं तरी खोटें नांव सांगून, मला सोडून द्यावें ह्मणून दीनवाणीनें त्यांची प्रार्थना केली. मला वाटतें ह्या भाषणानें त्यांचें मुळींच समाधान झालें नसावें; कारण माझें हें भाषण संपतांच ते सर्व ' खो खो ' हंसत सुटले. ते त्यावर कांहींच बोलले नाहींत; पण एकानें ' तर मग तूं ज्या किल्लीनें कुलूप काढलेंस ती किल्ली आण इकडे. ' असें दरडावून ती मजकडून काढून घेतली तोंच दुसऱ्यानें माझ्या हातांत एक ग्लास देऊन ' बरें आहे, तूं काय म्हणालास तें आह्मीं सर्व ऐकून घेतलें. तुला आह्मीं सोडून देऊं; पण आधीं हें पिऊन टाक. ' असें मोठ्या जोरानें सांगितलें.

कोण हा दुर्धर प्रसंग ! हे मला ' सोडून देऊं ' म्हणतात ना ! मग हा प्रसंग कां ? ह्या ग्लासांत काय असेल ! ह्यांत एकादें जालीम विष तर नसेल ! अशा रीतीनें माझ्या हातूनच माझा मृत्यु करविण्यापेक्षां त्यांनींच माझा सोक्षमोक्ष करणें त्यांच्या जिवावर कां आलें होतें ? अरेरे ! ह्यापेक्षां उघडच्या डोळ्यांनीं जर माझा प्राण जाता तर मला त्यांतही आनंद वाटता ! त्या गरीब बिचाऱ्या स्त्रीला मदत करावयास मी केवढ्या धैर्यानें आलों; पण आतां हा माझा काय परिणाम होत आहे. सुखानें घरांत पडावयाचें सोडून हा नसता प्रसंग केवळ माझ्या मूर्खपणामुळें मीं होऊन ओढून घेतला. आतां त्या काशीचें काय होईल. अशाच प्रकारचे अनेक भयंकर विचारतरंग

माझ्या मनांत उद्भवून ज्या हातानें मी तो ग्लास धरला होता तो हात भीतीनें थरथर कांपूं लागला !

पण माझ्या ह्या स्थितीची त्या अधमांना काय कल्पना असणार ! त्यांच्या हुकुमाची अंमलबजावणी होण्यास वेळ लागला यावरून मी काकूं करतों असें वाटून त्यांपैकीं एकजण मला खेंकसून विचारतो ' कारे ? कसला विचार करतो आहेस ? आह्मीं तुला काय सांगितलें ? '

प्राण तर जाणारच असें खात्रीपूर्वक ठरल्यावर माणसाला नसतें धैर्य उत्पन्न होत असतें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. कारण त्यांचें हें भाषण ऐकून मला इतका त्वेष चढला कीं, बेहेत्तर आहे मागाहून कांहीं झालें तरी; परंतु माझा जीव जाण्यापूर्वीं मीं एकदोघांना तरी लोळविल्याखेरीज रहाणार नाहीं. असें मला वाटून हातांतलें ग्लास फेकून माझ्या समोरच्या इसमावर तुटून पडावें असा सुद्धां माझा विचार झाला ! पण हायरे दुर्दैवा ! मीं अंधळा आणि ते डोळस असून सशस्त्र ! त्यांतून त्यांना खून चढलेला ! माझी नुसती हालचाल पहातांच एखाद्या क्षुद्र कीटकाप्रमाणें त्यांनीं मला तेव्हांच चुरडून टाकलें असतें. ही कल्पना मनांत येतांच तें माझें धैर्य साफ वितळून गेलें व मीं त्यांना ह्मणालों कीं, ' अहो, कांहीं तरी विचार करा ! मला गरिबाला मारून तुम्हांला काय मिळणार आहे ? मी कोणाला कांहीं सांगेन अशी तुह्मांला शंका येत असेल तर ती उगाच आहे ! कारण मी अंधळा आहें हें तुह्मांला माहितच आहे. मी तुमच्या पाया पडतों. मी ह्यापैकीं एक अ सुद्धां— '

मी आणखी किती तरी बोलणार होतों; पण ते मला तसें कुठलें करूं द्यायला ! त्यापैकीं एकानें मला मध्येंच थांबवून माझा हात घट्ट धरला व मला म्हटलें, ' बस्स, पुरे कर तुझा हा चरबटपणा, आम्हांला तो

ऐकून घ्यावयास फुरसत नाहीं. चल आटप, पितोस कीं नाहीं ! कीं देऊं तुझा मगज उडवून ! '

माझें विनवणें ह्मणजे त्यांच्या मतें चरबटपणा. तें त्यांना ऐकून घ्यावयास त्यांनीं ह्मटल्याप्रमाणें खरोखरच फुरसत नसेल. हो, अद्याप त्यांना याहीपेक्षां किती अनन्वित कृत्यें करावयाचीं असतील कोणास ठाऊक ? अर्थात् अशा नगाऱ्याच्या गडबडींत माझी केवळ प्राणरक्षणासाठीं वाजणारी टिमकी त्यांना ऐकून घ्यावयास कोठली फुरसत मिळणार ! अथवा मिळाली असती तरी होणारा परिणाम थोडाच चुकत होता ! ह्यामुळें व त्या दुष्टानें ते शेवटचे शब्द उच्चारतांना आपलें प्राणघातक पिस्तूल अगदीं माझ्या डोक्याला आणून भिडविलें अस- ल्यामुळें माझा सर्वतोपरी नाइलाज झाला. शेवटीं घरादाराची, त्या स्त्रीच्या रक्षणाची व माझ्या जीविताची सुद्धां आशा सोडून, केवळ ईश्वरावर भरंवसा ठेवून त्या यमदूतांच्या इच्छेप्रमाणें मीं तें ग्लास पिऊन टाकलें !

ग्लास तोंडाला लावतांना त्यांतील पदार्थाच्या नुसत्या वासानेंच माझें जीवित नष्ट होईल मग तो पदार्थ पोटांत गेल्यावर तर काय बोलायलाच नको, अशी मला पहिल्यानें फार भीति वाटत होती; पण त्यापैकीं एक घोट पोटांत जातांच ती साफ नाहींशी झाली. कारण तें पेय म्हणजे जसें बर्फमिश्रित पाणी असावें तसें थंडगार होतें. इतकेंच नव्हे तर तो सर्व पदार्थ पोटांत गेल्यानंतर मला बरीच हुषारीही वाटली. माझ्या हातांतून ग्लास काढून घेतल्यावर ते लोक हळुहळु मजपासून किंचित् दूर सरकले. तेव्हां मात्र माझ्या जिवाला जरा स्वस्थता वाटली. इतका वेळ तरी आपलें जीवित टिकलें ह्याबद्दल

मी थोडासा आनंदही मानूं लागलों. हा माझा आनंद केवळ तात्पुरताच होता. कारण लागलींच मला झोंप येते असें वाटूं लागलें. त्या पदार्थानें आपला अंमल बसवावयास सुरुवात केली असावी. कारण मी माझी स्थिति विसरून जाऊन तेथेंच लवंडलों. पुढें माझें काय झालें—त्या दुष्टांनीं ह्मटल्याप्रमाणें माझा मगज खरोखरीच उडवला कीं काय केलें—ह्याची मला मुळींच स्मृति नव्हती. कारण क्षणाधांत मला झोंप लागली ह्मणा अगर मी बेशुद्ध झालों ह्मणा; पण माझ्या मतें मात्र मी सर्वस्वी पराधीन झालों ! !

## प्रकरण चवथें.

या दुष्ट लोकांनीं माझ्याच हातानें मला विष पाजवून माझा अंत खात्रीनें केला असावा अशी मागील प्रकरण वाचून वाचकांची जर कल्पना झाली असेल तर ती माझ्या पुढील हकीकतीवरून चुकीची ठरणार आहे. कारण त्यांनीं माझा जीव घेण्याचीच ही एक अजब युक्ति काढली असावी अशी मला प्रथम भीती वाटली होती. अर्थात् तुम्हांलाही तसें वाटावयास मीं लाविलें होतें. पण नाहीं, मला वाटनें होतें तितके कांहीं ते लोक दुष्ट नव्हते. पण ते दुष्ट नव्हते असें तरी मी कसें ह्मणूं ? त्यांचें तें घोर कृत्य अद्याप जसेंच्या तसेंच माझ्या स्मृतींत आहे. मग माझ्याच बाबतींत त्यांनीं हा पक्षपात कां केला कोणास ठाऊक ? कांहींही असो, त्या प्रसंगांतून ही हकीकत लोकांना सांगावयास तरी मी जगलों ही मोठ्या आनंदाची गोष्ट नव्हे काय ?

असो. त्या ग्लासांतून त्यांनीं जें कांहीं मला पाजलें होतें त्यांत

खात्रीनें कांहीं तरी जबर अंमली पदार्थ असला पाहिजे. कारण त्याच्या सेवनानें मी इतका क्षीण झालों होतों कीं, ज्यावेळीं त्या महानिद्रेतून मीं जागा झालों त्या वेळीं मला एक शब्द सुद्धां उच्चारणें जड जात होतें. शुद्धीवर येऊन चांगलीं पांच दहा मिनिटें झाल्यानंतर मी आपल्या भोंवतीं इकडे तिकडे हात हालवून चाचपूं लागलों तों माझ्या हातास जें कांहीं लागलें त्यावरून मी त्या भयंकर जागेंत नसून कोठें तरी एका पलंगावर पडलों आहे असें मला वाटलें. नंतर त्या रात्रीच्या हकीकतीचें एकदम स्मरण होऊन व त्यांतल्यात्यांत जीवित बचावल्याबद्दल झालेल्या आनंदाची भर पडून मी किंचित् गोंधळल्यासारखा झालों. पण हें घर कुणाचें ? इथें मला कोणीं आणून टाकलें ? इथें आणखी काय काय प्रसंग गुदरतात कोणास ठाऊक; इत्यादि नवीन विचारांत मी होतों; इतक्यांत त्या खोलींत कोणी तरी आपापसांत बोलत असल्यासारखे आवाज मला ऐकूं येऊं लागले व माझी विचारसरणी त्यामुळें तशीच थांबून माझें लक्ष तिकडे वेधलें. आवाज किंचित् ओळखीचे ऐकूं येऊं लागले, ह्मणून मीं मोठ्या उत्कंठेनें, " इथें कुणी आहे कां ? " ह्मणून विचारलें. त्यावर " काय पाहिजे तुम्हाला ? " असा मोठ्या प्रेमानें उच्चारलेला प्रश्न ऐकूं आला.

ह्या वेळेस मात्र तो आवाज माझ्या ओळखीचा असल्याबद्दल माझी बहुतेक खात्री झाली. तरी पण न जाणो, आवाजासारखे आवाज पुष्कळ असतात, तेव्हां पुरता संशय फेडून घ्यावा ह्मणून मी पुनः, " आं ! कोण—काशी ? " म्हणून विचारलें.

" होय ! मीच ती. पण आतां कसें काय वाटतें तुम्हांला ? "

" आं ! काशी ! तर मग ऐकून मी आपल्या घरांतच आहे म्हणा-यचा ! पण काग काशी मी येथें कसा आलों ? "

" तें कांहीं आतां विचारूं नका. मग मी सर्व सांगेन. पण आतां तुम्हाला अंमळ बरें वाटतें ना ? "

" बरें म्हणून काय विचारतेस ! तुझा मायेचा शब्द कानीं पड-तांच माझा सर्व शीण गेला ! " असें म्हणून मी उठून बसण्याची तयारी करूं लागलों. पण मला तिनें तसें करूं दिलें नाहीं. मला तिनें पुनः निजविलें व माझ्या अंगावर हात ठेवून मला म्हणाली, " नका नका, इतक्यांतच उठूं नका. तुम्हांला आणखी कांहीं वेळ तरी असेंच पडून राहिलें पाहिजे, असें डाक्टर सांगताहेत. तेही इथेंच आहेत. "

मला काय झालें होतें तें मला माहीत होतेंच. परंतु सर्व हकीकत काशीकडूनच काढून घ्यावयाची होती म्हणून मीं मोठ्या आश्चर्यानें पुन्हा विचारलें, " काय ? डॉक्टरनीं सांगितलें ? आणि डाक्टरांचें काय काम होतें इथें ? "

त्यावर ते डॉक्टर ह्मणविणारे गृहस्थ माझ्या अंगावर हात ठेवून मला म्हणतात, " हें पहा, अद्याप तुम्ही पुरते बरे झाला नाहीं. सबब तुम्हीं आतां असेच आणखी कांहीं वेळ पडून रहा. निदान आणखी पांचसहा तास तरी तुम्हाला उठतां कामा नये व तोंपर्यंत तुम्ही बोल-ण्याचेही फारसे श्रम घेऊं नका. "

हे डाक्टर माझ्या चांगले परिचयाचे होते. अर्थात् त्यांच्या सांग-ण्यावर माझा पुर्ण विश्वासही बसला. तेव्हां त्यांना नुसतेंच " नमस्कार डॉक्टरसाहेब–पण आतां पुढचें मगच बोलूं ! " असें म्हणून मी तोंडा-वर पांघरूण घेऊन गप्प पडलों. इकडे डाक्टरही माझ्या खाण्या-

पिण्यासंबंधानें काशीला कांहीं सूचना देऊन जरूर पडल्यास पुनः बोलवा असें सांगून निघून गेले आणि मी अद्याप त्या विषारी पदार्थाचा अंमल थोडासा असल्यानें पुनः गुंग झालों.

ह्यानंतर सुमारें आठ तासांनीं मी पुनः जागा झालों; पण ह्यावेळीं मात्र मी चांगला हुषार होतों. त्या पदार्थाचा अंमल साफ उडाला होता व मी आतां आपल्याच घरांत आहें अशी मला पूर्ण खात्री होती. ह्मणून जागा होतांच पहिल्यानें काशीला हांक मारली. मला वाटतें. मी निजलों असतांना काशीही जवळच कोठें तरी असावी. कारण ती माझ्या हांकेसरशी मजजवळ आली व " कां, कसें काय आतां; बरें वाटतें कां तुम्हाला ? " म्हणून मला विचारूं लागली.

" काशी, आतां माझी प्रकृति ठीक आहे. सांग पाहूं आतां; मी इथें कसा आलों, मला इथें कोणी आणलें वगैरे सर्व कांहीं सांग ! "

" झालें गेलें; आतां त्याचें कशाला पाहिजे आणि आतां तरी तुह्मी आपल्याच घरांत आहांत ना पण ? "

" तें कांहीं नाहीं, मला तें सर्व समजलेंच पाहिजे. मघां तुझें व डाक्टरांचें बोलणें मीं मुकाट्यानें ऐकिलें. पण ह्यावेळीं मी मुळींच ऐकायचा नाहीं. हं, तर सांग पाहूं. "

" आतां काय करावें बाई माणसानें ! मला माहीत आहे तुम्ही ऐकायचे नाहींत तें ! ह्या हट्टानेंच तर हा सगळा घोटाळा झाला ! बरें झालें; काळ आला होता पण वेळ आली नव्हती ! नाहींतर काय ह्मणतातना.... "

" काशी, ह्या तुझ्या संदिग्ध भाषणानें मला जास्त घोटाळ्यांत

पाहूं नकोस. काय असेल तें एकदां सांगून टाकीनास ? माझ्याजवळ असा आडपडदा कां ? ”

“ सगळें सगळें तें काय असायचें ! महाराज, इथें ज्या वेळेला तुम्हाला मीं आणलें तेव्हां तुमच्या तोंडाला अशी घाण येत होती कीं, तिचें नांवसुद्धां आह्मीं घेऊं नये. असलें कांहीं तुम्हाला करायचें होतें तर आपलें घर नव्हतें का स्वतःचें ? पण नाहीं, इथें एक माझी आहेना अडचण ! नकोग बाई, नुसती आठवण झाली ह्मणजे अंगावर कसा कांटा उभा राहतो ! ” असें म्हणून ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

मींसुद्धां त्यावेळीं तिला विशेषसा आग्रह केला नाहीं. परंतु, तेथें बसल्या बसल्याच रडत रडत व अडखळत अडखळत, तिनें सर्व कांहीं मला सांगितलें. तो सर्व मजकूर तिच्या लांबलचक भाषेंत सांगायचा म्हटला तर विनाकारण जागा अडविली जाणार म्हणून तिच्याकडून जी हकीकत मला कळली ती मी माझ्याच भाषेनें खालीं देत आहे. तीवरून त्या अधमांनीं मला तें पेय पाजल्यावर माझें पुढें काय केलें व मी माझ्या घरीं कसा आलों तो सर्व मजकूर सहज समजून येणार आहे.

तो पदार्थ प्याल्यावर मी बेशुद्ध झालों, इथवर तर मीं वाचकांना सांगितलें आहेच. त्या पेयांत दारू तर होतीच होती. अर्थात् मी तिच्या पूर्ण अंमलांत जातांच त्या दुष्टांनीं मला तसाच उचलून दूर एका गटाराच्या कडेला टाकून दिलें व ते आपल्या रस्त्यानें निघून गेले. इकडे मी घरांतून बाहेर पडल्यानंतर नित्यक्रमाप्रमाणें काशी मला पाहण्याकरितां वर आली व पाहतें तों माझ्या दरवाजाला कुलूप ! मी असा तिला सांगितल्याशिवाय, निदान रात्रींतरी कुठेंही बाहेर जात नसे. मग आजच हा असा प्रकार कां ? म्हणून

तिला जरासा खेद वाटून तिनें खालीं तपास केला तों आमची गाडी, नोकर चाकर सर्व कांहीं जागचेजागीं हजर ! हें पाहून मात्र तिच्या पोटांत धस्स झालें. मी अंधळा म्हणून वरचेवर संताप करून घेत असे व ह्यापेक्षां मृत्यु बरा असेंही कधीं कधीं त्या भरांत म्हणत असे. तें सर्व तिच्या मनांत एकदम उभें राहून, मीं कुठें तरी जीवबीव तर दिला नसेल, अशी तिला भीति वाटली. शेजारीपाजारीसुद्धां जेव्हां माझा पत्ता लागेना तेव्हां घाबरून जाऊन तिनें नोकराकरवीं पोलिसांत वर्दि देवविली व स्वतः दोन नोकर बरोबर घेऊन माझा तपास मोठ्या जारीनें सुरू केला. परंतु बराच वेळ इकडे तिकडे हिंडूनही जेव्हां माझा कांहींच शोध लागेना तेव्हां बिचारी निराश होऊन घरीं आली.

परंतु ईश्वराच्या मनांत तिला असेंच निराश ठेवावयाचें नव्हतें. पहाटे सुमारें तीन वाजण्याच्या सुमारास दूरच्या एका ठाण्यावरून गिरगावांतल्या पोलिसठाण्यांत असा टेलिफोन आला कीं, " एक मनुष्य दारू पिऊन धुंद होऊन गटारांत पडलेला सापडला आहे. एकंदर स्थितीवरून सदर मनुष्य श्रीमंत असावा असें दिसतें. तपासाअंतीं तो मनुष्य अंधळा असावा असें दिसत आहे. " गिरगावांत माझ्याबद्दल वर्दि होतीच. सबब तेथून ही माहिती माझ्या घरीं येतांच " कदाचित् ही आमचीच स्वारी असेल असा तर्क करून काशी गाडी, नोकर व एक डाक्टर बरोबर घेऊन तावडतोब त्या दूरच्या ठाण्यावर येऊन पोंचली. पहाते तों तो गटारांत पडलेला मनुष्य मीच. त्याठिकाणीं आमचा पंचनामा झाला. नंतर दारू पिऊन अशा रीतीनें अस्ताव्यस्त पडल्याबद्दल सरकारची दंडाची रक्कम भरून व संभाळून

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. १५८०


ठेविल्याबद्दल पोलिसांनाही थोडेसें बक्षिस देऊन काशी मला घेऊन परत आली. पुढें उपचार सुरू झाले. नंतर मी शुद्धीवर आलों वगैरे सर्व हकीकत वर आहेच.

इतका मजकूर सांगतांना ती कितीवेळ रडली व कितीवेळां माझ्या ह्या अत्याचाराबद्दल रागावली तें मी कोठवर सांगूं! तिच्यासारखी मायेचीं माणसें ज्यांच्या घरांत असतील त्यांनाच त्याचा अनुभव असणार. अर्थात् त्यांना त्याची सहज कल्पना होणार आहे.

हा मजकूर सांगून ती पुनः दीनवाणीनें मला सांगूं लागली, "एकदां झालें तें झालें बाबा, पण पुनः तरी निदान असें एकटें बाहेर जात जाऊं नका! काय तुम्हाला करायचें असेल तें आपलें आपल्या घरांत इथें होऊं द्या!"

ती आणखी पुढें बोलणार होती; परंतु मीं तिला मध्येंच थांबवून म्हटलें, "बरें आहे, आतां पुनः जाणार नाहीं, म्हणजे तर झालेंना? पण खरेंच, काशी! मी दारू पिऊन पडलों होतों ही गोष्ट तुला सुद्धां अगदीं खरी वाटते ना?"

भोळी बिचारी काशी; तिला काय इतर गोष्टी माहीत. ती म्हणते, "म्हणजे, तुम्हांला खोटें कशाला सांगूं मी! मीच एकटी म्हणतें असें नाहीं; डाक्टरसुद्धां तसेंच म्हणत होते!"

"हं, बरें पण कांग! माझे कपडे तर तूं पाहिलें असशीलच. माझ्या कोटाच्या बाह्यांवर, धोतरावर, कोठें तरी तुला तांबडे डागबीग दिसले का?"

"डाग? कसले घेऊन बसलांत डाग? सगळे कपडे तर गटारां-तल्या चिखलानें बरबटलेले होते! आणि खरेंच मीं अगदींच विसरल्यें;

कायग बाई चमत्कार तरी ! तुमच्या अंगांतल्या कोटाला अस्तन्या होत्या कोठें मुळीं ! आणि धोतराला तर काय एक शंभर भोंकें होतीं ! काय केलेंत नि कुठें गेला होतात कुणाला ठाऊक इतकें सगळें करून घ्यायला ! ”

ही सर्व हकीकत ऐकून मला फारच आश्चर्य वाटलें. आणखी कांहीं तिला विचारावें असें माझ्या मनात होतें; पण कदाचित् बोलतां बोलतां ती रात्रीची हकीकत माझ्या तोंडून बाहेर पडेल व ती ऐकून बिचारीला जास्त दुःख होईल म्हणून यापुढें तिला मीं कांहींच विचारलें नाहीं. तिच्या समाधानार्थ मी दारू पिऊनच धुंद होऊन पडलें होतों हा तिचा ग्रह कायम ठेवावा असेंच मला बरा दिसलें. नंतर “ असें काय ? तर मग मोठेंच आश्चर्य म्हणायचें ! पण जाऊं द्या; आपण पुनः कांहीं बाहेर जायचे नाहीं. ” अशी तिला बरें वाटावें म्हणून शपथही वाहिली. पण मला ही चांगलीच अद्दल घडली. “ बरें तें सगळें खरें; पण मला भूक लागली आहे, कांहीं तरी खायला आणव पाहूं ? ” असें तिला मीं सांगितलें. मीं आतां कांहीं तरी खावें अशी तिचीही मनापासून इच्छा होतीच, सबब “ आणतें हो. ” असें म्हणून ती तावडतोब उठून खालीं गेली. वास्तविक पहातां मला ह्यावेळीं खरोखर भूक मुळींच लागली नव्हती; परंतु हा सर्व मजकूर ऐकून घेतल्यावर त्यासंबंधानें मला एकट्याशींच विचार करावयास थोडीशी फुरसत पाहिजे होती. अशी संधी काशी त्या ठिकाणीं असतांना मिळणें शक्य नव्हतें म्हणून तिला उठवून लावण्याकरतां ही कांहीं तरी सबब मला पुढें करावी लागली इतकेंच.

काशी निघून जातांच आमचें डोकें पुनः भ्रमण करूं लागलें.

अथपासून इतिपर्यंत सर्व हकीकत मनांत जशीच्या तशीच उभी राहिली. मी अंधळा आहें ही खात्री करून घेतल्यावर ती किल्ली मजजवळून काढून घेऊनसुद्धां त्या बेरडांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं मला कांहीं तरी जबरदस्त अंमली पदार्थ पाजून व पुढें मागें कदाचित् माझ्या कपड्यांवरचे रक्ताचे—मीं एका प्रेतावर कांहींवेळ पडलों होतों हें वाचकांना माहीत आहेच—डाग लोकांच्या नजरेस पडून तेवढ्यावरूनही आपण पकडले जाऊं ह्या भीतीनें त्या चोरांनीं डाग पडलेला तेवढा कपड्यांचा भाग कापून काढून मला एका गटारांत आणून टाकलें! जसे कांहीं आपण त्या गांवचेच नाहींत! कोण अमानुष कृत्य हें! हा विचार जेव्हां माझ्या मनांत आला तेव्हां मी त्वेषानें अगदीं वेडा होऊन गेलों. अरेरे, ह्यावेळीं जर माझी दृष्टी शाबुद असती तर—पण जाऊं द्या. ती पहा, काशी आली वाटतें. हो तिचींच पावलें हीं. तर आतां गप्प बसा. तिला ही हकीकत समजतां कामा नये.

यानंतर एक दोन दिवस जातांच मीं पुनः तोजातवाना बनलों. माझी ही हकीकत माझ्या मित्र मंडळींत पसरलीच होती. मीं दारू पिऊन गटारांत पडलों हीच एक खरी हकीकत धरून त्यांनीं माझी नुसती टर उडवली. वास्तविक पहातां इत्थंभूत हकीकतीचें वर्णन देऊन त्यांची खात्री करून हा माझ्यावरचा आळ मला दूर करतां आला असता; परंतु ते माझे मित्र ह्मणजे असेच सोकाजी असल्यानें इतका सगळा इतिहास सांगूनही वरती त्यांचें हंसें संपादन करून घेण्यापेक्षां त्यांच्या चेष्टेकडे दुर्लक्ष करणेंच मला बरें दिसलें. तथापि मीं तो विषय मात्र विसरलों होतों असें नाहीं. त्या अधमांचा सूड घेण्याची

माझी इच्छा उलट प्रबळ होत होती. परंतु करावयाचें काय ! माझें व्यंग जाणून मला त्या वेळेपुरतें तरी गप्प बसावें लागलें. पुढें कांहीं दिवसांनीं माझे परममित्र बॅरिस्टर सुंदरराव—हे एका खटल्यासाठीं बाहेर गांवीं गेले होते—आले. सुंदरराव म्हणजे माझा अगदीं पक्का दोस्त. तेव्हां त्याला मात्र माझी सर्व हकीकत अगदीं झाली तशी सांगितली व " सुंदरराव, ह्या कामांत वाटेल तो खर्च झाला तरी बेहेत्तर, परंतु त्या दुष्टांचा पत्ता हा लावलाच पाहिजे ! " असें त्याला मोठ्या काकुळतीनें सांगितलें.

सुंदररावानें हा विषय कांहीं अगदींच थट्टेवारी घालविला नाहीं खरा; परंतु ते पडले वकील. वकिलांची सर्व भिस्त कायती पुराव्यावर. आणि त्याचा तर मजजवळ पूर्ण अभाव ! कारण अमुक अमुक गोष्ट म्हणजे मीं पाहिली असें तर मला सांगतांच येत नव्हतें. इतकेंच नव्हे तर रक्ताचा डाग ज्यावरून दिसेल अशी एक कपड्याची चिंधीसुद्धां मजजवळ नव्हती. नाहीं म्हणायला त्या किल्लीच्या जोडीची किल्ली मात्र एक मजजवळ होती. पण तिचा उपयोग काय होणार होता. माझ्या किल्लीनें उघडणारीं कुलुपें मुंबईत शेंकडोंशें सांपडतील ! म्हणजे त्या सगळ्याच घरांत खून झाला होता असें म्हणतां येईल काय ? बरें, खुद्द आमच्या हकीकतीवरून कांहीं निष्पन्न होईल म्हणावें तर तींत तरी काय असणार ? मला असें वाटलें, मला असा भास झाला, मीं असा तर्क बांधला असाच कांहीं तरी मजकूर येणार ! म्हणजे काय, तर खरें असूनही त्याचा कांहींच उपयोग नाहीं. असा एकंदर सबगोलंकार असल्याकारणानें " पुरावा नाहीं सबब ह्यांत मी काय करूं ? " अशी त्यानेंही दिलगिरी दर्शविली.

झालें ! माझी मदार काय ती एकट्या सुंदररावावर ! व त्यानेंही जेव्हां अशा अक्षता लावल्या तेव्हां काय करावयाचें ! हकीकत खरी, मीं प्रत्यक्ष अनुभवलेली, परंतु ती मला जगाला खरी भासवतां येईना ! अर्थात् हा खून असाच पचणार व त्या स्त्रीचें जीवित जर अद्याप शाबूद असेल तर तें कसाई तिचा नाहक छळ करणार ह्या विचारांनीं माझा आत्मा तळतळत होता ! हा प्रसंग नवा होता तेव्हां दिवसांतून किती तरी वेळां त्याबद्दलच्या कल्पना माझ्या मनांत येत असत. परंतु पुढें पुढें कांहीं दिवसांनीं तर तो मी साफ विसरलों म्हटलें तरी चालेल.

अशा तऱ्हेनें बरेच दिवस गेले. इकडे मी घरांत आपली दुःखद स्थिति भोगीत पडलोंच होतों. परंतु ईश्वराच्या मनांत तींतून माझी मुक्तता करावयाची होती म्हणूनच कीं काय, एक सुप्रसिद्ध नेत्रवैद्य मुंबईंत आल्याची बातमी माझ्या कानीं आली. कसलाही नेत्ररोग असो; त्या कामांत ते हातखंडे होते, इतकेंच नव्हे; तर कित्येक जन्मांधांना सुद्धां त्यांच्या अद्भुत हस्तकौशल्यानें नेत्र प्राप्त झाले होते. अशी त्यांची लोकोत्तर कीर्ति जेव्हां कर्णोकर्णीं माझ्याही कानावर आली तेव्हां हा मनुष्य एक देवच म्हटला पाहिजे असें वाटून मीं सुंदररावा-कडून त्या नेत्रवैद्याला तावडतोब माझ्या घरीं बोलाविलें.

त्यांनीं येऊन माझ्या नेत्रांची परीक्षा केली; परंतु माझें अंधत्व बरेच दिवसांचें असल्यानें साफ असाध्य आहे असें सांगून त्यांनीं माझी निराशा केली नाहीं. तरी पण " आपरेशन् करावें लागेल. मात्र तुमचा आग्रहच असेल तर मी तें करून पाहीन. पण मला खात्री मात्र देतां येणार नाहीं. " असा संदिग्ध जबाब दिला. हा जबाब म्हणजे नका-रार्थीच होता; परंतु यदाकदाचित् ऑपरेशन् साध्य झालें नाहीं तर

घाईं आणखी वाईट तें काय होणार होतें ! अंधळा तर मीं होतोंच, तेव्हां काय होईल तें होवो. साधलें तर माझा फायदाच आहे, नच साधलें तरी तो तुमचाही दोष नव्हे व माझेंही नुकसान नाहीं. तेव्हां तुह्मी कां भितां ? असें ह्मणून आपरेशन् करून घ्याच असा मीं आग्रह धरला.

असो; ठरल्याप्रमाणें एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं आपरेशन् झालें. तें काय झालें व त्याला किती वेळ लागला तें मला दिसणें तर शक्य नव्हतेंच; पण मला तें माहीतही नाहीं. कारण, त्या वेळीं मला गुंगीचें औषध दिलें होतें. गुंगी काढून घेतल्यावर कांहीं वेळानें मी शुद्धीवर आलों असें पाहून " तुमच्या डोळ्यांवर आह्मीं औषधांच्या पट्या ठेवल्या आहेत. त्या कांहीं दिवस तशाच राहिल्या पाहिजेत. आह्मीं त्या सोडूं तोंपर्यंत थोड्या वेदना झाल्या तर सोसा पण पट्टी हलूं मात्र देवूं नका. " असें सांगून व ह्याबद्दल काशीला खबरदारी घ्यावयास बजावून वैद्यबोवा निघून गेले.

ऑपरेशन् झाल्या दिवसानंतर रोज डाक्टर स्वतः येऊन त्या पट्यांवर कांहीं औषधें सोडीत असत व आतां ' थोडे दिवस आहेत. ' असें आश्वासन देऊन जात असत. मला पहिल्यानें थोड्या वेदना झाल्या; परंतु त्यांचा परिणाम चांगलाच होणार या प्रबल आशेवर मीं त्या सोसल्या व पुढें तर त्या अजिबात बंदही झाल्या. असें होतां होतां एक दिवस पट्या नीट तपासून ' उद्यां पट्टी सोडणार ' असें वचनामृत वैद्यबुवांनीं माझ्या कर्णांत सोडून मला आनंदसागरांत गटंगळ्या खावयास लावलें. तो सारा दिवस व ती रात्र जातां जाईना. मित्र मंडळींच्या गप्पांत दिवस मात्र कसाबसा गेला; पण ती काळरात्र

मात्र नुसती खावयास आली. साऱ्या रात्रींत झोंप तर मुळीं आलीच नाहीं; पण जरा कुठें गुंगी यावी तों उजाडलें असें वाटून काशीला मीं ' उजाडलें कांग ? ' ह्मणून किती तरी वेळां विचारलें असेल व तिनेंही ' छे; अतां कुठें एक वाजला, तर केव्हां दोनच सारे वाजले ' असें सांगून किती वेळा मला निराश केलें असेल त्याची कल्पना माझ्या लिहिण्यानें यावयाची नाहीं. एखाद्या कार्याविषयीं माझ्यासारखी ज्यांना जबर उत्कंठा लागली असेल त्यांनाच ती येईल. पण अशी ती रात्र मोठी झाली -- नव्हे, मला तशी वाटली-- ह्मणून ती किती वेळ टिकणार होती ? कोणत्याही गोष्टीला शेवट हा असतोच. त्याप्रमाणें नियमित वेळीं तीही बिचारी संपून एकदांचें उजाडलें.

ठरल्याप्रमाणें वैद्यबुवांनीं येऊन पट्या सोडल्या व माझे डोळे कसल्याशा पाण्यानें धुऊन मला ते उघडावयास सांगितले. अहाहा, काय तो आनंद ! डोळे उघडतांच, आपल्या बालकिरणांनीं भूषित अशा व नुकत्याच क्षितिजावर येत असलेल्या भगवान् श्री सूर्य नारायणाचें आज बारावर्षांनीं पहिल्यानेंच मला परम मंगल दर्शन झालें. त्यावेळीं माझा आनंद गगनांत मावेना ! त्यानंतर प्रति देवच असे ते वैद्यराज, मातोश्री समान माझें पोषण करणारी माझी काशी, माझा मित्र सुंदरराव ह्या सर्वांना डोळाभर पाहून मला जें आनंदाचें भरतें आलें त्या भरांत मी त्या सर्वांना कडकडून भेटलों व " आज आपल्या घरांत मोठ्या सणासारखा उत्सव करा. नोकरांना बक्षिसें वाटा. रात्रीं मोठी रोषनाई करा. ' असा काशीला हुकूम सोडला. तात्पर्य, हा प्रसंग सर्वांना सारखाच आनंदकारक होता.

परंतु वैद्यबुवानीं ह्या माझ्या आनंदाचा मध्येंच विरस केला. त्यांनीं

माझ्या डोळ्यांवर त्या पट्ट्या पुनः चढवल्या व " डोळ्यांना जपण्याची तर हीच वेळ आहे. तुह्माला दृष्टी आली ही मोठीच आनंदाची गोष्ट. पण संभाळा, ह्या पट्ट्या इतक्यांत अशा एकदम काढतां येणार नाहींत. दृष्टी कोंवळी आहे, तशांत तिच्यावर जर भार पडला तर केलेले श्रम व्यर्थ जावयाचे. तुह्माला पट्ट्या काढाव्यात असें वाटलें तर खोलींत अंधार करून मग डोळे उघडीत जा. निदान कांहीं दिवस तरी असें करावें लागेल. " असें सांगितलें. मला ह्याच्यावर कांहींच बोलतां येईना सबब मीं त्यांच्याच मर्जीप्रमाणें चालावयाचा निश्चय केला.

असो, पुढें क्रमाक्रमानें पट्ट्या जाऊन त्या ठिकाणीं हिरवे पडदे आले व त्यानंतर हिरवी व काळी अशा चाळशा आल्या. पण ह्या वेळीं मात्र वैद्यबुवांच्या सांगण्याकडे किंचित् दुर्लक्ष्य केल्यामुळें त्याचा परिणाम असा झाला कीं, माझ्या डोळ्यांवर पेबलचा चष्मा कायमचा बसला. मला त्याचें कांहीं सुद्धां वाटलें नाहीं; कारण मुळींच दृष्टी नसल्यामुळें मीं जो अगदीं हताश बनलों होतों तें सर्व—चाळशीमुळें कां होईना पण—नाहींसें झालें ही थोडी का आनंदाची गोष्ट. असो; कांहीं का होईना पण ह्या ऑपरेशन्च्या योगानें माझ्या आयुष्यक्रमांत केवढी क्रांति झाली.

हें प्रकरण जरा लांबलचक झालें ह्मणून वाचकांचा मजवर थोडा रोष होण्याचा संभव आहे; परंतु त्यांनीं तो करूं नये अशी माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे. हें प्रकरण जर मागेंच संपविलें असतें तर माझ्या ह्या ऑपरेशनचा भाग लांबणीवर पडला असता. अर्थात् त्या दिवशींचा तो रात्रींचा प्रसंग माझ्याबरोबर तुम्हींही

पार विसरून गेला असतां. पण आतां मला दृष्टी आली आहे; आतां मला वाटेल तें करतां येईल. हरप्रयत्न करून मी तो खून पचूं देणार नाहीं. त्याचप्रमाणें त्या निरपराधी स्त्रीलाही त्या चांडाळांच्या हातून खात्रीनें सोडवीन, निदान तसें करण्याचा शक्य तितका प्रयत्न तरी करीन, अशी उत्कंठा त्यावेळीं जशी पुनः जोमानें जागृत झाली तशी माझी पुढील हकीकत ऐकण्याविषयींची तुमचीहि झाली नसेल काय? अर्थात् ह्या सर्वांना साधनीभुत झालेली जी माझी दृष्टी तिची हकीकत मीं याच प्रकरणांत सर्व सांगितली म्हणून तुमचा मजवर वृथा रोष कसा होईल. तर चला मजबरोबर, इतका वेळ अंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळून थकल्या भागलेल्या जिवाची थोडा वेळ करमणूक करून पुढील हकीकतीकडे वळूं.

---

## प्रकरण पांचवें.

पुढील हकीकत समजून घेण्यासाठीं आपल्याला प्रथम मधल्या स्थितीचें थोडेंसें सिंहावलोकन केलें पाहिजे. डोळे साफ बरे होऊन मी बाहेर हिंडूं फिरूं लागतांच पहिल्यानें माझ्याजवळ असलेल्या दुसऱ्या किल्लीनें माझ्या गल्लींतलीं सर्व कुलुपें उघडतात कीं काय तें पाहिलें. परंतु एकाही कुलुपास ती किल्ली लागेना असें पाहून मी बराच निराश झालों. अर्थात् तें खुनी घर निदान माझ्या गल्लीच्या आसपास तरी नाहीं अशी माझी पूर्ण खात्री झाली. नंतर पोलिसांत ही सर्व हकीकत सांगून पुष्कळ तपास करविला; परंतु बळकट पुराव्याचे अभावी त्याही बाजूनें निराशाच झाली. अशारीतीनें सर्व प्रयत्न निष्फळ

झाल्यामुळें खून खरोखर झाला असूनही, त्यावेळीं मीं अंधळा असल्या कारणानें मला त्याचा कांहींच पत्ता देतां येईना. म्हणून मला निराश होऊन नाइलाजास्तव तो नाद सोडावा लागला.

यानंतर मीं आपलें लक्ष स्वतःचे घरांतील व्यवस्थेकडे वळविलें. एकंदर इस्टेटीची मोजदाद केली तों रोकड दागदागिने व जमीन जुमला मिळून दहा लाखांचा अंदाज आला. एवढ्या निर्विवाद अफाट संपत्तीचा मालक मीच आहे हें पाहून मला फार आनंद झाला. पण ह्या संपत्तीचें करायचें काय हा एक मोठा प्रश्न येऊन पडला. पदरमोड करून नुसता आयतोबा होण्याचा तर मला मनापासून कंटाळा होता. सबब सुंदररावाच्या सल्यानें कापडाचें एक मोठें टोलेजंग दुकान कोटांत ठेवून दिलें व तशा रीतीनें तरी आपणास कांहीं उद्योग लागून वेळ आनंदांत जाईल अशी तजवीज केली. मुंबईत कांहीं घरें होतीं, त्यांच्यावर ठेवलेले भय्ये त्यांचें भाडें बरोबर वसूल करून आणीत असतच. तेव्हां तिकडे कांहीं पाहण्याची जरूर नव्हती. दागदागिने व घरांतील रोकड ह्यांवर काशीचा पहारा होताच. दुकानचें काम मुनीम पहात असत व माझी नुसती देखरेख असे. ह्याप्रमाणें सर्व व्यवस्था चोख झाल्यावर आतां आपण थोडासा प्रवास करून यावा अशी इच्छा झाली. सुंदररावाच्या कोर्टाला अनायासें मे महिन्याची सुटी असल्यानें त्यानेंही येण्याचें कबूल केलें. मग काय; आमची तयारी हां हां ह्मणतां झाली व आह्मीं चांगलासा दिवस पाहून कलकत्यास जावयाचें निश्चित केलें. वाचकहो, तुह्मींही यायचेंच बरें का ? तुमचींही तिकिटें काढलींच आहेत, मात्र मेलची वेळ चुकवूं नका.

बोरीबंदर स्टेशन सोडल्यापासून मध्यें गाडी किती ठिकाणीं व किती वेळ उभी राहिली, तसेंच गाडींत गर्दी किती होती वगैरे नेहमींच्या प्रचारांतल्या सटरफटर गोष्टी सांगून मीं विनाकारण जागा अडवूं इच्छित नाहीं व त्या सांगतों ह्मटलें तरी मला त्या बरोबर सांगतांही यावयाच्या नाहींत. कारण आमचीं तिकिटें फर्स्टक्लासचीं असल्या कारणानें गर्दीची कल्पनाच नव्हती व बहुतेक वेळ झोंपेंत आणि गप्पा मारण्यांत गेल्या कारणानें माझें तिकडे विशेषसें लक्ष्यही गेलें नाहीं. असो, आतां वाचकांना एकदम हौऱ्याच्या स्टेशनावर उतरण्याची मी विनंति करतों.

एवढें थोरलें कलकत्ता शहर, साऱ्या हिंदुस्थानचें नाक; पण स्टेशन ह्मणजे नुसती घोडगागा ! त्याला कांहीं तरी शोभा ! लांबचलांब जशी कांहीं धर्मशाळा, आमच्या बोरीबंदरच्या हें पासंगाला सुद्धां पोंचायचें नाहीं. पण जाऊं द्या; इथेंच फार वेळ घालवतां कामा नये. नाहीं तर गंगेवरचा नौकांचा पूल जर फिरला तर सर्व आगबोटी निघून जाईपर्यंत दोन तास विनाकारण कुचंबत पडावें लागेल.

सुंदररावानें कलकत्त्यास बंगल्याची सोय आधींच तारेनें करून ठेवली होती. त्याप्रमाणें आमच्या बंगल्यांत आह्मीं जाऊन उतरलों. स्नान वगैरे विधि उरकून व थोडासा उपहार करून पहिल्यानें सामानसुमान नीट लावलें. नंतर जेवण झाल्यावर थोडी वामकुक्षी करून आम्ही बाहेर पडलों. अस्तमानपर्यंत इकडे तिकडे हिंडून पुनः आठ वाजतां घरीं परत आलों व भोजन करून चार गप्पा मारून झोंपीं गेलों. पण आम्हांला असा दुसरा उद्योग तरी काय होता. सकाळीं उठल्याबरोबर चहापाणी करून बाहेर पडावें, तिकडून येऊन भोजन करावें,

थोडी विश्रांती घेऊन पुनः बाहेर पडावें, हिकडे तिकडे हिंडून पुनः घरीं येऊन भोजन करावें, रात्रौ एकादें नाटक, कुठें गाणेंबजावणें नसलेंच तर निदान गप्पांना तर सुंदररावाजवळ वाण नव्हतीच! नंतर अगदीं पेंग येऊं लागला म्हणजे निजावें. सकाळीं पुनः पूर्ववत कार्यक्रम सुरू करावा.

कलकत्त्यांत पहाण्यासारख्या इमारती कांहीं विशेष नाहींत. आमच्या मुंबईपेक्षां येथें कांहीं तरी विशेष मौज असेल हा माझा भ्रम येथें येतांच दूर झाला. एवढे थोरले व्हॉइसराय पण त्यांच्या वसतिस्थानापेक्षां आमच्या मुंबईच्या गव्हरनरांचा बंगला किती तरी नामी! त्याचप्रमाणें हें हायकोर्ट, कुठें मुंबईचें हायकोर्ट आणि कुठें हें! हें ब्लॅकहोल म्हणजे केवढें इतिहासप्रसिद्ध स्थान; पण त्याचें स्मारक म्हणून बांधलेली घुमटी पाहिली म्हणजे मनाचा विरस होतो. एवढ्यावरून म्हणजे कलकत्ता अगदींच टाकाऊ असें माझें म्हणणें नाहीं. सर्वांत उत्तमस्थान म्हणजे श्रीकालीमातेचें पवित्र मंदिर. त्याचप्रमाणें डॉग किंवा चौरंगी मार्केट, झुऑलॉजिकल व बोटॅनिकल गार्डन्स अशीं कांहीं स्थानें खरोखरच प्रेक्षणीय आहेत; परंतु तीं किती तर एका हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखीं!

असो, याप्रमाणें रोज नव्या नव्या वस्तु पाहण्यांत, नव्या नव्या लोकांची ओळख करून घेण्यांत व त्याचप्रमाणें सुखानें गप्पा मारीत बसण्यांत एवढा थोरला मे महिना केव्हांच संपून जाऊन जून महिन्यास सुरुवातही झाली. जसजशी तेरावी तारिख जवळ येऊं लागली तसतशी सुंदररावाची परत जाण्याची निकड जास्त दिसूं लागली. कारण त्या तारखेला त्याचें कोर्ट उघडावयाचें होतें. अखेर उद्यांचें मेलनें कलकत्ता सोडावयाचा असा बेतही ठरला.

मनुष्यप्राण्याचा हा एक स्वभावच आहे कीं, जोंपर्यंत कोणतीही वस्तु त्याच्याजवळ असते तोंपर्यंत तिचें त्याला मुळींच महत्व वाटत नाहीं. परंतु त्याचा व तिचा वियोग होतो असें दिसूं लागतांच त्याची उत्कंठा एकदम उचल खाते. त्याचप्रमाणें आमची स्थिति झाली. कमीत कमी आम्ही महिनाभर कलकत्त्यांत होतों व रोज सारखे हिंडतच होतों; तथापि आतां जायचें असें ठरतांच जणूं कांहीं अद्याप आमचें पुष्कळ पहावयाचें राहिलें आहे असें वाटून त्यादिवशीं दोन प्रहरीं भोजनोत्तर विश्रांतीला फांटा देऊन आह्मीं एकदम बाहेर पडलों. कलकत्त्याला फळफळावळ फार स्वस्त मिळते. ती विकत घेण्यांत व त्याचप्रमाणें कपडालत्ता व कांहीं इतर चमत्कारिक वस्तु खरेदी करण्यांत जवळ जवळ संध्याकाळ झाली. नंतर बरोबरचें सर्व सामान हमालाहातीं घरीं पोंचतें करवून आह्मी एडनगार्डन्सकडे वळलों.

एडनगार्डन्स म्हणजे कांहीं मोठेसें रमणीय उद्यान नव्हे; परंतु एक तर तें अगदीं गंगेच्या कांठीं असल्यानें तेथें लोकांची विशेष गर्दी असते. त्यांतून आज शुक्रवार, बँडचा दिवस असल्यानें तर त्या बागेला विशेष शोभा आली होती. सदर बागेंत नेटिव्ह व युरोपियन ह्यांच्या हिंडण्याच्या रस्त्यांच्या मर्यादा ठरविलेल्या आहेत. त्यांचें कोणीं अतिक्रमण करूं नये एतदर्थ गोरे रक्षक सक्त पाहरा करीत असतात. विशेष मजा म्हणजे रोषनाईची. त्या ठिकाणीं सर्वत्र तांबडा, पांढरा, जांभळा असा रंगीबेरंगी लाइट असतो व त्यांमधून जात असतांना आंग्लयुवयुवतींच्या सुंदर पोषाखांवर त्यांच्या किरणांचें जें परावर्तन होत असतें, ती शोभा म्हणजे खरोखरच अवर्णनीय होय. आह्मांला हा प्रसंग आजचा शेवटचाच होता. अर्थात् तेथून पाय

निघेना. शेवटीं आठ वाजले तेव्हां मोठ्या कष्टानें तेथून घरचा रस्ता धरला.

चांदणेंही स्वच्छ पडलें असल्यानें आम्हांला पायीं जाणेंच बरें वाटलें. वाटेनें आमच्या गप्पा सुरू होत्याच.

एडनगार्डन्स मधून घरीं परत येतांना पहिल्यानें मोठ्या मैदानांत येतांच हिंदुस्थानच्या आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व गव्हरनर जनरलांच्या दगडी व धातुमय स्मारकांची एक जंगी सभा भरलेली दिसली. नंतर व्हॉइसरायांचें वसतिस्थान, ब्लॅक होलची घुमटी ह्याप्रमाणें जें जें म्हणून कांहीं दृष्टीपथांत येत होतें त्यापैकीं आमच्या कोटिक्रमाच्या तडाख्यांतून एवढेंसें सुद्धां सुटत नव्हतें. वास्तविक असा कोटिक्रम करण्यांत आमचा कांहीं विवक्षित हेतू होता अशांतला भाग मुळींच नव्हता. केवळ ही वेळ घालविण्याची युक्ति होती इतकेंच. चालतां चालतां आम्हीं हायकोर्टाच्या कोंपऱ्यावर आलों व तेथूनच आम्हांला सालट्याकडे म्हणजे आमचा बंगला होता त्या भागाकडे जावयाचें होतें. हायकोर्टाचा कोंपरा म्हणजे आमच्या मुंबईचें धायधुणीचें नाकेंच म्हणाना ! सहज दोनचार तरी ट्रॅम उभ्या असायच्याच. अर्थात् त्यांतून येणाऱ्याजाणाऱ्या उतारूंच्या व गाडीघोड्यांच्या गर्दीतून रस्ता काढून आम्हीं असे पुढें चालूं लागणार तों काय मौज पहा— एक म्हातारा गृहस्थ व त्याच्या मागून एक सुमारें १६।१७ वर्षांची मुलगी जात असतांना आम्हीं पाहिली. ह्या उभयतांना पाहतांच ह्या सर्व बंगाली समाजांत हे आपल्याकडील गृहस्थ कोण असावेत; असा मीं तर्क चालवूं लागलों. चालतांना मीं पुढें व माझ्यामागें सुंदरराव अशारीतीनें जात असल्यामुळें व मधून मधून त्या उभयतांनीं मागें

वरून पाहिल्यामुळें मला त्यांचे चेहरे व पोषाख सहज न्याहाळतां आले. त्या गृहस्थाचा पोषाख ह्मणजे स्वच्छ पांढरा पेशवाई असून त्यांनीं डोक्याला जणूं कांहीं आपल्या वयाला व केसांना शोभणारें असें पांढरें पागोटें घातलें होतें. त्यांची शरीराची काठी मध्यमच असून वर्ण गोरा जरी नाहीं तरी पण काळाही नव्हता. एकंदरींत पहातां ते पंचेचाळिशीच्या घरांत आले असावेत असें मला वाटलें, पण त्यांच्या बरोबरची ती मुलगी—ओ हो ! ती म्हणजे नुसती चटकचांदणी होती. ती स्वच्छ पांढरें जरीचें पातळ नेसली होती; पण तिच्या अंगावर दागदागिने कांहीं फारसे नसावेत. तिनें अंगावर पांघरलेला तांबडा बुट्टीदार शेला वाऱ्याच्या सपाट्यानें वरचेवर स्थानभ्रष्ट होत होता. चालतांना तिला त्या बरोबरच्या गृहस्थाबरोबर पावलें टाकावयास फार जड जात होतें; तरी पण ती मोठ्या लगबगीनें मागें पुढें पहात अगदीं त्यांच्या मागोमाग चालली होती. पण मीं वेड्यासारखा तिच्या चालण्याचें, शेल्याचें व पातळाचेंच काय वर्णन करीत बसलों. आणि तिच्या रूपाबद्दल अद्याप एक अक्षरही नाहीं ! वाचकहो, ह्याबद्दल तुह्मीं माझ्यावर रोष करूं नका. कारण हा दोष माझा नव्हे. तो सर्व तिच्या सौंदर्याचाच होय ! तिचें चालणें, तिचा शेला, पातळ वगैरे पाहून ज्यावेळेस तिच्या वदनचंद्राचें मला चांगलेंसें असें एकवारच दर्शन झालें त्यावेळीं तिच्या अप्रतिम सौंदर्यानें माझी जी स्थिति झाली तीमुळें मीं अगदीं वेडा बनलों. अर्थात् त्या सौंदर्याचें वर्णन करण्याचें मला भान राहिलें नाहीं हा दोष माझा कीं, त्या सौंदर्याचा ! मी स्पष्ट कबूल करतों कीं, मी अगदीं मोहित झालों व तिच्या पुनर्दर्शनाच्या लालसेनें मीं सुद्धां तिच्या मागोमाग

पावलें भराभर टाकूं लागलों. सुंदररावाच्या ध्यानांत ही माझी स्थिति आली म्हणूनच कीं काय त्यानें सुद्धां आपला वेग वाढविला व आम्ही दोघेही त्या उभयतांच्या मागोमाग अगदीं त्यांच्याजवळ येऊन पोंचलों. त्या गृहस्थाशीं कांहींतरी भाषणाचा योग काढून त्या मुलीची माहिती पैदा करावी, निदान त्यांच्या मागून जाऊन त्यांचें बिऱ्हाड वगैरे पाहून ठेवून उद्दिष्ट तें कार्य साधून घ्यावें, अशी माझी फार इच्छा होती व त्या उद्देशानेंच मीं इतकी लगट करीत होतों. परंतु ईश्वरी इच्छा तशी नव्हती म्हणूनच कीं काय, एक गृहस्थ गडबडीनें मागाहून येऊन अगदीं माझ्यापुढेंच उभा राहिला. हा गृहस्थ वयानें तिशीच्या घरांत असून अंगापिंडानें चांगला खबरदार होता. ह्याचा पोषाख आमच्या इकडच्या सारखाच, म्हणजे दक्षणी रिवाजाचा होता. ह्यानें येतांक्षणींच पहिल्यानें आपला रोंख अगदीं माझ्याकडेच फिरवून, "कांहो, तुम्ही ह्या गांवचेच कां ?" असें विचारलें. मीं त्याला त्याच्याचप्रमाणें जरा कुर्यांत "कां बरें ?" असा प्रश्न केला. त्याबरोबर तो किंचित् रागावून म्हणतो, "तुम्हीं कुठलेही असा, मला त्याच्याशीं कांहीं करावयाचें नाहीं; परंतु मला वाटतें तुमची आणि मनुष्यस्वभावाची मुळींच ओळख नाहीं ! तुमचें वर्तन मीं मघांपासून पहातों आहें—पण इतकें कशाला ? तुम्हीं त्या स्त्रीकडे इतके अगदीं टक लावून जे पाहत आहां तें काय म्हणून ? मुकाट्यानें आपल्या रस्त्यानें नाहीं का जाववत ?"

त्याच्या ह्या प्रश्नाच्या पहिल्या भागानें मलाही जरासा राग आला होता; पण त्याचें तें शेवटचें वाक्य जेव्हां ऐकलें तेव्हां मात्र मीं चपापलों. कारण माझें अंतःकरण अपराधी होतें व माझी कृतीही संशयास्पद

होती खरी. अर्थात् मीं निरुत्तर तर झालोंच; पण उगाच उसनें धैर्य आणून " कांहो, मला वाटतें तुह्मी शुद्धीवर नसावेत. नाहींतर तुह्मीं असा उगाच एखाद्या भलत्यावर आरोप केला नसतात ! " असें म्हटलेंच.

ह्या योगानें तर तो अधिकच खवळला व त्याची माझी चांगलीच जुंपणार होती; परंतु तेवढ्यांत इतका वेळ गप्प बसलेला सुंदरराव माझ्या मदतीला आला म्हणून बरें झालें. त्यानें आपल्या वकिली-बाण्यानें पहिल्यानें त्याचें खंडन करून " जाउं द्या हो, तुम्हीं तरी काय इतकें हें करता ! मंडळी आपल्या तिकडच्यासारखी दिसली म्हणून सहज पाहिलें, त्याचा एवढा ग्रंथ कशाला पाहिजे होता ! चला ! " असें ह्मणून कसा बसा तंटा तोडला.

त्याचें कांहीं एवढ्यानें समाधान झालें नाहीं; पण करतो काय बिचारा. आम्हीं दोघे व तो एकटा. यामुळें " नाहीं ! पण ही तरी ह्यांची रीत का काय ? " असें पुटपुटत तो मुकाट्यानें निघून गेला. ह्याप्रमाणें ह्या मधल्या तंट्याचा निकाल लागला; पण ह्याचा परिणाम काय झाला तर आमचें हें भाषण एका जागींच उभें राहून झाल्यानें माझ्या दृष्टीचा खरा विषय —ती मुलगी—मात्र माझ्या दृष्टिपथांतून पार निघून गेली.

आम्हांलाही त्याच रस्त्यानें बरेंच दूर जावयाचें असल्यानें, रस्त्यांच्या दोहों बाजूंना माझी सारखी नजर होतीच. परंतु तेथून थेट बंगल्यापर्यंत आलों तरी सुद्धां जेव्हां त्या वृद्ध गृहस्थाचा अथवा त्या सुंदरीचा पत्ता लागला नाहीं तेव्हां माझं मन फार विरसलें व त्या गृहस्थाशीं रस्त्यांत वितंडवाद करण्यांत आपण निष्कारण वेळ घालविला ही मोठी चूक झाली असें वाटूं लागलें.

त्या दिवशीं जेवणाखाणाकडे माझें मुळींचें लक्ष्य नव्हतें; तरी पण सुंदररावाच्या आग्रहास्तव बळेंच दोन घास खाणें भाग पडलें. जेवण-खाण झाल्यावर गप्पा मारीत बसण्याचा जो आमचा रोजचा परिपाठ त्याला खो देऊन कांहीं तरी सबब काढून मी निजावयास जाण्याच्या बेतांत होतों. परंतु सुंदरराव कसला छट, त्याला कांहीं माझी हकीकत समजली नव्हती थोडेंच ? त्यानें मला तसें करूं न देतां बसवून घेतलें. बराच वेळ झाला तरी मीं होऊन कांहीं त्याला माझा अंत लागूं दिला नाहीं. शेवटीं त्यानें होऊन जेव्हां गोष्ट काढली तेव्हां सर्व रहस्य ओकणें मला भाग पडलें. पण तो तरी काय करणार ? त्यानें माझी पुष्कळ तऱ्हेनें समजूत केली व माझ्या योग्यतेकडे पाहिलें असतां ही मुलगी माझ्या पासंगाला सुद्धां पुरणार नाहीं असें सांगितलें; परंतु कांहीं केल्या एकवार परतंत्र झालेलें मन माझ्या स्वाधीन होईना. शेवटीं “ अरे पण वेड्या, ती अद्याप अविवाहितच राहिली असेल अशी कशावरून तूं कल्पना करतोस ? ” असा जेव्हां मला त्यानें प्रश्न केला तेव्हां त्या ठिकाणीं मात्र मी निरुत्तर झालों. परंतु माझ्या मनांतली गोष्ट जातां जाईना. शेवटीं ह्या निमित्तानें तरी तो विषय तितकाच आटपून मी अंथरुणावर पडलों.

तिथें तरी काय ? उभ्या रात्रींत डोळा लागला नाहीं. मला तिच्याशिवाय दुसरा विषयच नव्हता. अर्थात् तिच्याच विचारांत मीं ती रात्र कशी बशी काढली. उजाडल्यावर चहापाणी करून एकदां बाहेर जाऊन आलों व दोन प्रहरीं भोजनोत्तर सामानाची बांधाबांध केली. कारण आजच रात्रीच्या मेलनें आह्मीं मुंबईस परत जाणार होतों. निदान आणखी दोन दिवस तरी राहणें झालें तर बरें, असें मला पुष्कळ

वाटलें; पण त्याचा उपयोग काय ? सुंदररावाची कोर्टाची नड मध्यें होतीच. सबब झालेला बेत कायम करावा लागला. त्या मनोहरिणीचा कांहीं पत्ता लागल्यास पहावयाला आतां कायते अवघे चारच तास होते. त्यावेळीं सुंदरराव बरोबर असतां तर मला घरांतून बाहेर पडतां आलें नसतें; परंतु सुदैवानें सुमारें चार वाजतां डबा रिझर्व करण्याकरितां तो एकटाच स्टेशनावर गेला व मला घरांतून बाहेर पडण्यास ही आयतीच संधि सांपडली.

घरांतून मी जों निघालों तों थेट हायकोर्टाच्या कोंपऱ्यावर उभा राहिलों. हेतू हा कीं, जर त्या उभयतांचा नित्य फिरावयास जाण्याचा नियम असेल तर ती दोघेंही जातांना अगर येतांना एकदां तरी दृष्टीस पडलींच पाहिजेत. रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक इसमाकडे—मग तो पायीं जाणारा असो, ट्रॅममध्यें असो, अगर गाडींत असो— माझी अगदीं बारिक नजर होती. लांबून एकादा पुरुष व स्त्री येतांना दिसलीं ह्मणजे तींच दोघें आलीं असतील असें वाटून तीं जवळ येतांच माझी एकसारखी निराशा होत होती. याप्रमाणें त्याठिकाणीं सुमारें साडेसात वाजेतोंपर्यंत असा वेड्यासारखा उभा होतों. परंतु, माझ्या इच्छित वस्तूचें मला दर्शन झालें नाहीं. ह्यापेक्षां जास्त वेळ मला बाहेर रहातां येत नव्हतें. कारण आमची गाडी बरोबर नऊ वाजतां सुटावयाची होती. शेवटीं अगदीं हताश होऊन, हा आजच जाण्याचा बेत कायम केल्याबद्दल सुंदररावाला दोष देत देत शून्य मनानें घराकडे परत फिरणें मला भाग पडलें. माझे पाय तरी ह्यावेळीं माझ्या स्वाधीन कुठें होते. यामुळें मला तेथून घरीं पोंचावयासही बराच वेळ लागला.

घरीं आल्यावर दुसरें कांहीं काम नव्हतेंच. सुंदरराव माझ्या अगोदर केव्हांच येऊन बसला होता. त्याच्याबरोबर, इच्छा नव्हती तरी थोडासा फराळ करून, कपडे बदलून, वेळ होतांच आह्मीं उभयतां स्टेशनावर आलों. तिकिटें काढलेलींच होतीं. जागेचीही तक्रार नव्हती. गाडींत बसल्यानंतर नियमितवेळीं तीही बिचारी मोठ्या वेगानें आम्हांला मुंबईकडे ओढू लागली; पण वाचकहो, माझा देह मात्र मुंबईस जात होता; अंतःकरण कलकत्त्यांतच होतें !

---

## प्रकरण सहावें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें गाडीनें आह्मांला योग्यवेळीं पुनः मुंबईत आणून सोडलें. घरीं गेल्यावर मी आपल्या मंडळींत जाऊन पडलों; पण मनाची अस्वस्थता मात्र वाढत चालली. सारा दिवस मला त्या रमणीशिवाय दुसरा विचार सुचेना. मी कोणाशीं बोलत चालतही नसे. सारा दिवसभर कोंडल्यासारखा घरांत पडून असे. माझी ही स्थिति कशानें झाली त्याचें कारण काशीच्या ध्यानांत पहिल्यानें आलें नाहीं; परंतु पुढें सुंदररावानें पर्यायानें तिला कानमंत्र देतांच ती सर्व समजली व तिनें कसेंही करून माझें लग्न करून टाकण्याविषयीं त्याला सूचना केली.

वास्तविकपणें माझ्या परिस्थितीच्या मानानें हा विधि कधींच उरकून गेला असता; परंतु माझ्या मातापितरांच्या अकालीं मृत्यूनें व मध्यंतरींच्या माझ्या अंधत्वानें तें कोणास सुचलें नाहीं. पुढें तर तें मीं स्वतःच नाकारलें होतें. पण आतां निदान एक तरी उणीव भरून

आली होती. दुसरीचा कधींही संभवच नव्हता. ह्मणून सर्वांचें लक्ष्य तिकडे वेधलें. जो तो माझ्या करतां वधूचा शोध करूं लागला. नित्य मजपुढें नव्या नव्या सुंदर व कुलीन कुमारींच्या तसबिरा पसंतीला येऊं लागल्या व त्यांतून मीं एक तरी पसंत करावी ह्मणून जो तो आपल्यापरीं शिकस्त करूं लागला. पण माझ्या अंतःकरणाची ओढ दुसरीकडेच असल्यामुळें मला त्या सर्व नापसंत कराव्या लागल्या. पुढें जेव्हां ह्या कामांत आपल्यावर जबरी होणार असा रंग दिसूं लागला तेव्हां मात्र निरुपाय होऊन सुंदररावाजवळ मन मोकळें करून "जन्माची सोबतीण करावयाची तर तीच करावयाची; नाहींपेक्षां मीं असाच अविवाहित राहीन. इतकेंही करून तुह्मीं मजवर जबरदस्ती कराल तर माझा देह मात्र तुमचा आहे, पण माझें मन माझ्याजवळच नाहीं तर तें तुह्मांला किंवा दुसऱ्या कुणाला तरी कसें मिळणार ? अर्थात् तुह्मी तूर्त तरी निदान ह्या भानगडींत पडूं नका." असें स्पष्ट सांगणें मला भाग पडलें.

ह्या माझ्या निग्रही उत्तरानें सर्वांचे प्रयत्न जेथल्या तेथें थबकले. सुंदरराव तर मोठ्या बुचकळ्यांत पडला. कारण माझ्या प्रेमाचा विषयच तसा अवघड व दुर्लभ होता ! प्रेम अंधळें म्हणावें तर एखाद्या वेळीं अति चाणाक्ष मनुष्याला सुद्धां तें चकवितें, बरें त्याला कांहीं सारासार विचारशक्ति आहे म्हणावें, तर एकादा मूर्खसुद्धां जी कृती करणार नाहीं ती तें सहज करवितें ! नाहींपेक्षां जिला मीं एकदांच आणि ती सुद्धां रात्रीं नुसती ओझरती पाहिली, तिनें पहिल्याच झटक्याला माझ्या देहाचा व मनाचा सर्वस्वी स्वामी बनावें हा काय चमत्कार !

ह्याप्रमाणें अहोरात्र तिची ती रम्य मूर्ती ध्यानांत आणून केवळ तिचेंच चिंतन करून मनाची करमणूक पण देहाचा क्षय करण्यांत किती तरी दिवस गेले; परंतु अशी ही स्थिति किती दिवस चालणार! मनुष्यप्राणी आशा करीत असतो; पण ती किती दिवस? त्या आशेची सफलता होण्याचें अल्पसें साधन अथवा चिन्ह त्याच्या नजरेसमोर असेपर्यंत! तें नाहींसें होतांच त्याची निराशा होते व शेवटीं तो तें विसरतो. त्याचप्रमाणें माझीही स्थिति झाली. माझी इष्ट वस्तु मला मिळण्याचें तर दूरच राहिलें; परंतु तिच्या पुनर्दर्शनाचाही लाभ होणें शक्य नव्हतें. कारण जसा मी त्यावेळीं कलकत्त्याचाच रहाणारा नव्हतों तशीच कदाचित् तीही नसेल! अर्थात् यापुढें स्वप्नांत सुद्धां तिचें पुनः दर्शन होईल अशी आशा करण्यास बिलकुल जागा नव्हती. तात्पर्य, ती दुर्लभ आहे, अशी माझी पुढें पक्की खात्री होऊन ती क्रमाक्रमानें माझ्या हृदयांतून जात चालली. या योगानें माझ्या मित्रांच्या माझ्या लग्नाविषयींच्या बेताला मीं संमती दिली असें मात्र नाहीं.

परंतु नाहीं! ईश्वराच्या मनांत मला असें अगदींच निराश करावयाचें नव्हतें. तसा जर त्याचा हेतू असता तर माझ्या आयुष्यक्रमाचा ह्या पुढचा भाग देण्याची मला पाळी आली नसती. अगर पहिल्यानेंच जर मला त्यानें कायमचें निराश करून सोडलें असतें तर इतकें हें लिहिण्याचा मला प्रसंगच आला नसता. सुखदुःखाच्या भवचक्रांतून मानवांचा प्रवास आपल्या इच्छेप्रमाणें करविणें हीच तर ईश्वराची खरी लीला आहे. तीमुळेंच आम्हाला त्याचें महत्व वाटतें. हीच जर एकाच मनुष्याची एकच स्थिति कायम रहाती तर आशेच्या जाळ्यांत कोण सापडता

व भवितव्यतेचें तरी एवढें स्तोम कां माजतें. पण जाऊं द्या. आपण आपल्या विषयाकडे वळूं या.

त्या सुंदरीचा माझा नाद कमी होतांच मीं आपल्या नित्य कृत्याकडे वळलों. कोटांतलें दुकान ह्यावेळीं बरेंच भरभराटीस आलें होतें. अर्थात् तें एक मला चांगलेंच करमणुकीचें साधन झालें. रोज सकाळीं उठून कुठें तरी मोकळ्या हवेंत मीं फिरावयास जात असें. तिकडून आल्यावर जेवण करून लागलींच दुकानांत जाई. तेथें सुमारें सहा वाजेपर्यंत बसून नंतर थोडा वेळ लायब्ररींत काढून आठाच्या सुमारास घरीं परत येत असें. ह्या क्रमाप्रमाणें दिवस जातां जातां एके दिवशीं दुकानांतून निघावयासच सात वाजले. मग लायब्ररीच्या वगैरे भानगडींत न पडतां एकदम ट्रॅममधून घरीं यावयास निघालों. मला ट्रॅम मिळाली ती व्हिक्टोरियागार्डनकडे जाणारी भेटली. अर्थात् मला कावसजी पटेलच्या तळ्याकडे जावयाचें असल्यानें पायधुणीवर उतरून दुसऱ्या ट्रॅममध्यें बसावयाचें होतें; ह्मणून खालीं उतरलों व रस्त्यांतील गर्दीमधून वाट काढून आणि ताज्या इंदूचा अंक घेऊन असा आतां दुसऱ्या ट्रॅममध्यें चढणार तों माझी नजर सहज समोरच्या रस्त्याकडे गेली. तेथें माझ्या दृष्टीस दोन माणसें पडलीं. त्याबरोबर मला किंचित् संशय आला ह्मणून ट्रॅममध्यें बसण्याचा बेत रद्द करून झपाट्यानें चार पावलें पुढें गेलों व पहातों तों माझा संशय अगदीं खरा झाला. त्या दोन माणसांपैकीं एक तर माझ्या माहितीचेंच होतें. कारण तें मनुष्य ह्मणजे दुसरें कोणी नसून जिच्या एकाच दर्शनानें मीं कांहीं दिवस अगदीं वेडा बनून गेलों होतों व जी माझ्या हृदयाची अधिष्ठात्री देवता बनून गेली होती, तीच

सुंदरी होती. कधींही आशा नाहीं; निदान ह्या मुंबईंत तरी मला तिचें पुनर्दर्शन होण्याचा संभव नाहीं अशी पक्की खात्री असल्यानें जिच्याविषयीं मी अगदीं निराश बनलों होतों तिचा आज हा असा अकल्पित व अलभ्य दर्शनलाभ मला किती सुखावह झाला तो मी लिहून कुठवर वर्णन करूं ? पण मोठ्या आश्चर्याची गोष्ट कीं, यावेळीं तिच्या बरोबर तो वृद्ध गृहस्थ नसून साधारण उतार वयाची एक स्त्री होती. त्याचप्रमाणें ती दोघें परस्परांशीं एक शब्दसुद्धां न बोलतां झपाझप पावलें टाकीत होतीं. मला तरी त्यांना सोडून कसें जाववलें असतें ? आतां कांहींही झालें तरी हरकत नाहीं, ती ह्या मुंबईंत आली आहे, कांहीं कलकत्त्यांत नाहीं. ह्याठिकाणीं तिचा पत्ता काढून तिच्याशीं भाषणाचा योग आणल्याशिवाय कधींही रहावयाचा नाहीं, असा माझा तर पक्का निश्चय झाला होता. ह्मणून मी मागोमाग त्यांचा पाठलाग करीत निघालों.

चालतां चालतां नळबाजारांत आल्यावर मला वाटलें होतें कीं, तीं उभयतां आतां कावसजी पटेलच्या तळ्याकडे फिरतील. कारण संभावित मंडळींची रहाण्याची मर्यादा तेथें संपते. पण पहातों तों त्यांनीं उभ्या पारशाचा ह्मणजे डंकनरोडचा रस्ता धरला. माझ्या पायांची गती सर्वस्वी त्यांच्या स्वाधीन झाली असल्याकारणानें मीही घराकडे जाण्याचा नाद सोडून देऊन त्यांच्या मागोमाग जाऊं लागलों. बाकी मी त्यांच्या मागून जात होतो खरा; परंतु ह्या स्त्रिया इकडे कोणीकडे वळल्या ? कदाचित् ह्यांचा रस्ता तर चुकला नसेलना ? व जर ह्यांची रहाण्याची जागा इकडेच कोठें तरी असेल तर ह्यांच्यासंबंधानें झालेला माझा तर्क कदाचित् चुकला तर नसेलना ? किंवा एकादा अनोळखी

मनुष्य आपला पाठलाग करतो आहे हें पाहून झुकांडी देण्याची ही युक्ति तर नसेल ? वगैरे किती तरी विचार माझ्या मनांत यावयास चुकले नाहींत. हां हां ह्मणतां आम्हीं दुटांकीवर आलों व आतां ह्या कोणीकडे जातात तें पहावें ह्मणून मीं किंचित् थांबलों तों त्या एकदम कामाठीपुऱ्याकडे वळल्या. त्यावेळीं मात्र ह्या स्त्रिया म्हणजे संभावित नसून कोणी तरी वारांगना असाव्यात, या माझ्या संशयाला जास्त जोर आला. अर्थात् आतां यापुढें यांच्या मागून जावें किंवा नाहीं हा मला प्रश्न पडला व त्या मानानें माझीं पावलेंही मागें ओढ घेऊं लागलीं. ह्यानंतर मला फारवेळ पाठलाग करावा लागला नाहीं. कारण जवळच्याच गल्लींतील एका चार मजली घरांत त्या झट्कन् निघून गेल्या. मला त्यांच्यासारखे आंत जाण्याचें धाडस होईना ह्मणून बाहेरच उभें रहावें लागलें !

त्या आंत गेल्यानंतर माझ्या डोक्यांत अनेक विचार येऊं लागले. खात्रीनें ह्या वेश्याच असल्या पाहिजेत नाहींपेक्षां ह्या असल्या हलकट वस्तींत त्यांचें काय काम ! वेश्या नसल्याच तर निदान मला वाटलें तेवढें त्यांचें कुल तरी उच्च नसावें खास. नाहींपेक्षां कामाठीपुऱ्यासारख्या वस्तींत बिऱ्हाड करणें त्यांना कसें बरें वाटलें असतें. हा विचार मनांत येऊन तिच्याविषयीं जराशी अश्रद्धा होऊं लागे तों दुसरा विचार असा येई कीं, छेः अशी गोष्ट होईल कशी ? तिच्या बरोबर कलकत्त्यांत जो वृद्ध मनुष्य होता त्याच्याकडे पाहिलें असतां तो चांगला संभावित दिसत होता ? शिवाय माझें मन अशा नीच वस्तूवर कधींही जाणार नाहीं अशी माझी पक्की खात्री होती. अर्थात् ह्या विचारानें तिच्याविषयीं कलुषित झालेलें मन साफ होऊन पुनः तिच्याकडेच

धांव घेई; तों पुनः असा विचार येई कीं, तर मग एवढ्या रात्रीं अशा भिकार वस्तींत व केवळ गिरणींतल्या मजुरांनीं अगर हलकट बाजारबसव्यांनीं भरलेल्या चाळींत तिचें काय काम असावें! तात्पर्य, अशा अनेक साधक-बाधक विचारांनीं माझ्या हृदयाची नुसती ओढाताण चालविली होती. आतां परत जावें असें सुद्धां मला एक दोनदां वाटलें; परंतु अखेर माझ्या अंध प्रेमाचाच विजय झाला! कदाचित् त्या कोणातरी आप्ताला भेटावयास आल्या असतील, अर्थात् थोड्या वेळानें बाहेर पडतीलच! ह्याकरितां—व थोड्यासाठीं पुढें मागें पश्चात्तापाला तरी कां जागा द्यावी असें वाटूं लागलें ह्मणून सर्व कुशंका बाजूला सारून त्यांची आणखी कांहीं वेळ वाट पहात बसण्याचा माझा निश्चय ठरला. त्याप्रमाणें विचार करीत मी त्या चार मजली चाळीसमोर उभा राहिलों.

त्या दोघीजणीं आतां येतील, मग येतील अशी प्रतिक्षणीं आशा करीत मी किती तरी वेळ वाट पहात होतों. शेवटीं बारा वाजले व जिकडे तिकडे सामसूम झालें. त्या रस्त्यानें जाणारा अगर येणारा एकही मनुष्य दिसेना, तेव्हां मात्र माझा नाइलाज झाला. यापेक्षां जास्तवेळ त्याठिकाणीं उभें राहणें मला धोक्याचें वाटूं लागलें. कारण त्यावेळीं गस्ती करतां पोलिससुद्धां हिंडूं लागले होते. अर्थात् निराश होऊन मला मुकाट्यानें घरचा रस्ता सुधरावा लागला. ह्या सगळ्या भानगडींत फायदा एवढाच झाला कीं, तिचें पुनः एकवार दर्शन झालें व तेवढ्यावरूनच, दग्ध झालेल्या माझ्या आशेला पुनः अंकुर फुटला! अपरात्र झालेली व खाण्यापिण्यासंबंधानें इंद्रसभा, त्यांतल्यात्यांत डोक्यांत हेच विचार, मग झोंप कसची येते? सर्व रात्र विचारांत गेली. ज्याअर्थीं अशा दुर्मिळ वस्तूचें मला पुनर्दर्शन

घडवून आणण्याचा योग ईश्वरानें आणून दिला त्याअर्थी त्यांत त्याचा कांहींतरी हेतू नसेल कशावरून ? असें माझ्या मनांत वरचेवर येऊन उजाडतांच पहिल्यानें त्या घरांत जाऊन तपास करावयाचा मीं निश्चय केला.

सूर्योदय होतांच स्नान वगैरे आटपून त्या चाळीजवळ तर येऊन थडकलों; पण आंत जाऊन त्यांचा शोध कसा करावा ही मोठी पंचाईत आली. कारण मला त्यांचें नांव, गांव कांहीं एक माहीत नव्हतें. अखेर एक युक्ति सुचली. त्या चाळीच्या मालकाला ह्या चाळींत कांहीं जागा भाड्यानें द्यावयाची आहे काय म्हणून विचारलें. तोही पहिल्यानें कांकूं करूं लागला; परंतु माझ्या पोशाखाकडे वगैरे पाहून त्यानें "आहे, पण अगदीं वरच्या मजल्यावर आहे. आणि ती सुद्धां तुम्हाला पसंत पडते कीं, नाहीं कोणास ठाऊक ?" असा जबाब दिला. मला वास्तविक जागेची अशी मूळ जरूर नव्हतीच. मला माझा उद्दिष्ट हेतू साधावयाचा होता. ह्मणून मींही पण त्याला "कशी कां असेना, मला तूर्त अडचण आहे तेव्हां मला कशीही चालेल. पण त्यांतल्या त्यांत मला ती जागा पहावयास मिळती तर बरें होतें." असें ह्मटलें व त्यावर "हो हो, मोठ्या खुषीनें." असें ह्मणून त्यानें भय्याला बोलावून आणून मला जागा दाखवावयास सांगितलें.

आह्मीं चवथ्या मजल्यावर जातांच अगदीं कोंपऱ्यांतली एक खोली उघडून "यही जगा देने की है." असें भय्यानें सांगितलें. मीं आंत जाऊन खिडकी उघडून वगैरे पहाण्याचा एक फार्स केला व तो आटपतांच खालीं उतरूं लागलों. जागा कांहीं विशेषशी बरी नव्हती. वरती तर जिकडे तिकडे धुराचीं जळमटें व कोळ्याचीं घरें होतीं.

जमिनीला दोन दोन इंच खड्डे पडले होते व खिडकीला एक झापड तर अजिबात नव्हती. अर्थात् आमच्या राजविलासी बंगल्यांत राहणाऱ्या माझ्यासारख्या मनुष्याला ती एकाद्या पोटमाळ्यासारखी जागा कशी पसंत पडणार? परंतु उतरतां उतरतां " महराज, आप दो रोज पहिले आजाते तो आपको इस्से अच्छी जगा मिल सकती! ये जो कोठडी मैंनें अभी बतायी इसके पडोसके दो कमरे बहोतही ठीक थे. मगर परसूंके रोजही दो औरतोंनें दो महिनेके वास्ते वो रख लिये है. आपकी मर्जीहो, तो दो महिनेंके बाद वे आपको मिल सकेंगे." असें जेव्हां त्या भय्यानें मला सांगितलें त्या वेळेस काय विचारतां? मला तो तसला पोटमाळाही पसंत पडला व खालीं येऊन दोन महिन्यांचें भाडें अगाऊ चुकतें करून ती जागा मीं माझ्याकरतां खास करून घेतली. मीं दोन प्रहर नंतर माझें सामान घेऊन येतों, तोंपर्यंत तुम्हीं त्या खोलींत साधारण होण्यासारखी असेल तेवढी दुरुस्ती करून खोली रिकामी ठेवा, असें मालकाला बजावून मोठ्या आनंदानें घरीं आलों.

घरांमध्यें माझ्यामागें व्याप म्हणजे विशेष नव्हताच. येऊन जाऊन काय तें दुकान. त्याची व्यवस्था नीट ठेवण्याबद्दल मुनीमाना बजावून ठेवलें. काशीकडे घरची सर्व मालकी होतीच; तेव्हां तिला आणखी जास्त काय सांगायचें.तथापि मला कांहीं तसेंच जरूरीचें काम असल्या कारणानें वेळेवर जेवावयास येतां येणार नाहीं तेव्हां माझी वाट पहात बसूं नये, इतकें मात्र कळवावें लागलें. ह्याप्रमाणें घरची व्यवस्था करून व थोडेंसें अगदीं जुजबी म्हणजे एक छोटासा पलंग, वळकटी, दिवा-बत्ती व एक लहान पुस्तकाचें कपाट इतकें सामान घेऊन ठरल्याप्रमाणें तिसऱ्या प्रहरीं माझ्या नवीन बिऱ्हाडीं आलों. मालकाला दोन महि-

त्यांचें भाडें अगाऊ पोंचलें असल्यानें तेवढ्या वेळांत त्यानें खोली नीट साफ करून चुना विना देऊन तयार करून ठेवली होती. इकडे तिकडे जुळवाजुळव करण्यांत सहज संध्याकाळ झाली. तेव्हां घराकडे जाऊन लवकर जेऊन पुनः परत स्वस्थानीं आलों व जी पुनः मला कधींहि दिसणार सुद्धां नाहीं म्हणून अगदीं हताश झालों होतों ती माझी हृदयदेवता व मीं आज एकाच भिंतीच्या आड कां होईना; पण एका घरांत आहोंत हें पाहून मला फार धन्यता वाटली.

याप्रमाणें त्या घरांत राहिल्याला एक पंधरवडा हां हां म्हणतां निघून गेला; परंतु माझा इष्ट हेतू साधण्याचा योग कांहींच घडून येईना. आमच्या दोघांच्याही खोल्यांना खिडक्या असून त्या रस्त्याच्या बाजूस असल्यानें प्रथम प्रथम ती सुंदरी खिडकींतून रस्त्याकडे पहात असतांना सहज माझ्या दृष्टीस पडे व मीं तेवढ्यांतच समाधान मानून घेत असे. परंतु पुढें जेव्हां माझी दृष्टी तिच्याकडे असून ती सुद्धां कांहीं अन्य विकारयुक्त आहे असें तिच्या नजरेस आलें तेव्हां ती खिडकींत मुळीं येईनाशीच झाली. त्यानंतर त्यांनीं ती खिडकी अजिबात बंद करून टाकली. यामुळें मी फार खिन्न झालों. मी इतका डोळ्यांत तेल घालून त्याठिकाणीं बसत असे, तरी पण त्यांचे व्यवहार इतके चोरून होत असत कीं, इतक्या दिवसांत दिवसा अगर रात्रीं कोणत्याही कामाकरतां बाहेर जातांना त्या मला कधींही दिसल्या नाहींत. परंतु माझा इष्ट हेतू साध्य होण्यास इतक्या गोष्टी प्रतिकूळ होत्या व त्या क्षणोक्षणीं मला हतवीर्य करीत होत्या तरी माझा दुराग्रह सुटला नाहीं. ज्याअर्थीं ईश्वरानें येथपर्यंतचा हा अतर्क्य योग जुळवून आणला त्याअर्थीं ह्यापुढील भागही खात्रीनें साध्य

होईल अशी मला जबर आशा होती व तिच्याच जोरावर मी त्या खोलींत तसाच राहिलों !

यानंतर मला फार दिवस तिष्ठत बसावें लागलें नाहीं. एक दिवस माझा त्या खोलींत प्रवेश होण्याचा योग अनायासें घडून आला. एके दिवशीं रात्रीं जेवण करून नित्याप्रमाणें मी आपल्या खोलींत पलंगावर वाचीत पडलों होतों तों पलीकडल्या खोलींत कोणी तरी आजारी असून कण्हल्यासारखा आवाज ऐकूं आला. त्या बरोबर मीं उठून बसून भिंतीला कान देऊन ऐकूं लागलों. त्या आपापसांत कांहीं बोलत होत्या. त्यापैकीं एकजण आजारी असल्या-मुळें तिचा आवाज अस्पष्ट येत होता व दुसरी अगदीं हळूं बोलत होती ह्मणून त्यांचें भाषण मला प्रथम मुळींच समजलें नाहीं. ही संधी फार चांगली आहे, यावेळीं जर मी तेथें गेलों व त्यांना मदत केली तर त्यांच्यावर अनायासें उपकार होतील व साहजिकच भाषणाचा योगही सहज घडून येईल, असें वाटून मी तिकडे जावयास उद्युक्त झालों. परंतु पुनः असें वाटलें कीं, त्या स्त्रिया, त्यांतून एकटच्या, अशा वेळीं जर मी त्याठिकाणीं गेलों तर त्यांना भलताच संशय यावयाचा व एकादा अनर्थ गुदरावयाचा. तेव्हां असें धाडस करणें बरें नव्हे. तात्पर्य, मीं सुमारें दोन मिनिटें किंकर्तव्यतामूढ बनलों. परंतु तो योग आज घडून यावयाचा होता ह्मणूनच कीं काय कोण जाणे; तें कण्हणें जास्त जोरानें सुरू झालें व त्यामुळें दुसऱ्या स्त्रीला भिती वाटून " मावशी, तुला तर हा असा ताप भरला आहे आणि मीं तर एकटी ! औषध आणीन म्हटलें तर एवढ्या रात्रीं कुठें जाऊं बाई मी ? खरेंच त्या शेजारच्यांना तरी हाक मारूं का ? " असें म्हटलेलें मला

ऐकूं आलें. एवढ्यावरून माझा संशय पार फिटला व माझी खात्री झाली कीं, ती उतारवयाची स्त्री म्हणजे मावशी आजारी असून त्यामुळें घाबरून जाऊन त्या सुकुमार स्त्रीनें म्हणजे माझ्या हृदयाला वेड लावणाऱ्या त्या तरुणीनें हे वरील शब्द उच्चारले होते. ह्या शब्दांवरूनच मला त्यांच्या खोलींत जावयास कोणतीही हरकत नव्हती असें वाटून मी तर जावयास अगदीं तयार झालों; परंतु या वरील प्रश्नावर मावशी काय म्हणते, त्याकरतां थोडी वाट पहाणें रास्त होतें म्हणून जरा घोंटाळलों तों " बोलाव पाहिजे तर " हे शब्द ऐकूं आले. मग काय ? बोलावण्याची वाट न पहातां मी दार उघडून एकदम त्यांच्या खोलीजवळ येऊन पोंचलों व दार उघडण्याकरतां असा दरवाजावर हात ठेवला तों तो उघडून ती सुंदरी उभी असलेली मीं पाहिली !

ह्यावेळीं माझा आनंद गगनांत मावेना. मला माझी बतावणी उत्तम करावयाची होती म्हणून मीं अगदीं तिच्याचसारखा घाबरून जाऊन "काय झालें ? कोणी आजारी का आहे तुमच्या येथें? मीं आतां माझ्या खोलींत असतांना तुमच्या इकडे कोणी जोरानें कण्हत असल्यासारखा आवाज ऐकूं आला म्हणून म्हटलें काय आहे पाहून तरी यावें ! " असें विचारलें व उत्तराकरतां तिच्याकडे पहात राहिलों. एकदम एकादा अनोळखी मनुष्य आला ह्मणून ती प्रथम थोडीशी चपापली. परंतु थोड्याच वेळांत तिनें माझ्याकरतां एक खुर्ची पुढें करून आपण जवळच उभी राहिली. माझा हा वरील प्रश्न ऐकून व त्या बरोबरच माझी दृष्टीही तिच्याकडे एकसारखी लागली असल्याचें पाहून तिनें मान खालीं घातली व लाजून " कांहीं नाहीं ! मावशीला बराच

ताप आला आहे, आणि त्यानें ती अगदीं घाबरली आहे. इथें औषध आणायला सुद्धां दुसरें कोणी— ” इतकें बोलून ती पुढें आणखी कांहीं बोलणार होती; परंतु मीं तिला मध्येंच थांबवून ह्मटलें, “ हात्याच्या, एवढेंचना ? त्यांत घाबरायला कशाला पाहिजे होतें ! शिवाय आम्हीं येथें शेजारीं असून जर आडल्यावेळींही आमचा उपयोग होणार नाहीं तर मग— पण जाऊं द्या. आतां घाबरूं नका, तुम्ही अगदीं स्वस्थ असा. मी आतां औषध पाणी सर्व कांहीं करतों. ” त्याप्रमाणें मी लागलींच खालीं उतरलों.

जवळच दुटाकीवर असलेल्या दवाखान्यांत जाऊन ही हकीकत सांगून एका डाक्टरांना बरोबर घेतलें व त्यांना मावशीची प्रकृति दाखवून औषधाची योजना करविली. मी पुनः औषध आणावयास म्हणून आलोंच होतों. अर्थात् तें घेऊन पुनः त्यांच्या खोलींत गेलों व डाक्टरांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांतला एक भाग आधीं मावशीला द्यावयास सांगितला. त्यानंतर मी सुमारें दहा मिनिटें तेथें बसून होतों; परंतु तेवढ्यांत माझ्याशीं कोणी कांहीं बोललें नाहीं. आतां ह्यापेक्षां जास्त वेळ बसल्यानें त्यांच्या शांततेचा भंग होईल असें जाणून मी उठलों व मावशीजवळ जाऊन “ ताप कांहीं मोठा नाहीं, घाबरूं नका तुम्ही अशा, आतां घाम आला म्हणजे बरें वाटेल. ” असें सांगून त्या सुंदरीकडे पाहून म्हटलें, “ आणि तुम्ही सुद्धां घाबरूं नका. हेंच औषध पुनः एकदां दोन तासांनीं द्यावयाचें आहे. पण जर त्यांना झोंप लागली असेल तर मात्र उठवून देऊं नका ! झालेंच ! आणि मी इथें शेजारीं आहेच. कांहीं जरूर पडली तर हांक मारावयास संकोच करूं नका. ” असें म्हणून जाऊं लागलों तों तिनेंहि लाजून अगदीं

अस्पष्ट आवाजानें " बरें आहे. आज जर तुम्ही नसतां तर– " एवढेच शब्द कसे बसे उच्चारले. पुढें काय ? आमचा स्तुतिपाठ व आभार प्रदर्शन–हेंच असणार असें जाणून मी तें ऐकत बसलों नाहीं व " अं; त्यांत काय आहे एवढें मोठें ? अहो एवढें सुद्धां जर आमचे हातून होईना तर आह्मीं शेजारीं कशाला राहिलों ? तें कांहीं तुह्मीं मनांत आणूं नका. " इतकेंच बोलून पुनः आपल्या खोलींत आलों.

त्यानंतर रात्रीं कांहीं विशेष घडून आलें नाहीं. सकाळीं उठतांच पुनः मीं त्यांच्याकडे जाऊन प्रकृतीचें मान वगैरे विचारलें व पुनः औषध वगैरे आणून दिलें. तात्पर्य, मावशीची प्रकृति म्हणजे मला निदान दिवसांतून दोनदां तरी तिकडे जाण्यास एक उत्तम साधन मिळालें. ह्या मावशीचा आजार कांहीं नाहीं ह्मटलें तरी चांगला पंधरा दिवस टिकला, तेवढ्या अवकाशांत माझें त्यांच्या खोलींत कधीं औषधाच्या निमित्तानें तर कधीं एरवींच, अस बरेच वेळां जाण्या-येण्यानें मीं त्यांच्या चांगला परिचयाचा झालों. नंतर त्या दोघींची व त्यांतून विशेषतः त्या सुकुमारीची बरीच भीड चेपली जाऊन त्यांचीं आमचीं भाषणेंही होऊं लागलीं. परंतु दुःखाची गोष्ट कीं, इतकें होऊनही, इतक्या दिवसांत तिचें नांव मालती होतें हें कळण्या पलीकडे, माझ्या फायद्याचें असें कांहींच माझ्या हस्तगत झालें नाहीं, अर्थात् ह्या सबंद महिन्याच्या खटाटोपांत फक्त नांव समजलें. एवढ्यावरच समाधान मानून मला स्वस्थ बसावें लागलें.

## प्रकरण सातवें.

आजारी असलेल्या दिवसांत मावशीचा व माझा भाषणाचा योग बरेच वेळां आला. मालतीही मधून मधून केव्हां तरी एखादा शब्द बोलत असे. परंतु ती नेहमीं मावशीजवळ बसलेली असल्या-कारणानें माझ्या मनांतले विचार उघड करावयास मला केव्हांही अव-काश मिळाला नाहीं. एकएक दिवस म्हणजे मला युगाप्रमाणें भासत होता. आतां त्या पोटमाळ्यांत राहण्याचाही मला कंटाळा आला होता. कारण तेथें ह्या नादांत राहिल्या दिवसापासून मला एकदांही वेळेवर जेवण मिळालें नाहीं किंवा पुरेशी झोंप मिळाली नाहीं. ह्यामुळें मी तर अगदीं जेरीला आलों होतों. परंतु केवळ इथवर आलेलें काम थोड्या-करतां सोडावयाचें नाहीं एवढ्याचसाठीं मी तसेच दिवस ढकलीत होतों.

अखेर एक दिवस काय होईल तें होवो, आज ह्या प्रकरणाचा निकाल करावयाचा असा निश्चय करून मी मावशीच्या खोलींत गेलों. मालती त्यावेळीं शेजारच्या खोलींत निजली होती हेंही एकप्रकारें माझ्या पथ्यावरच पडलें. कारण ती असती तर तिच्यासमोर तिच्याचसंबंधानें मावशीजवळ बोलण्याचें धाडस मला झालें नसतें. असो. बोलण्यांत आमच्या हिकडच्या तिकडच्या बराच वेळ गोष्टी झाल्यावर आतां हा विषय कसा काढावा म्हणून मी किंचित् विचारांत होतों तों मोठी आनंदाची गोष्ट कीं, मावशीनें होऊनच मालतीचें अद्याप लग्न झालें नाहीं अशा अर्थाचे शब्द आपल्या भाषणांत आणले.

झालें ! मला काय, जरासा चंचुप्रवेश व्हावयास पाहिजे होता ! त्याप्रमाणें एवढी ही सोनेरी संधी मिळतांच मी पुढें सरकलों.

मी:– तर मग मावशी, अद्याप तें तुम्ही कां बरें करून टाकलें नाहींत ! आतां ती वयानें सुद्धां कांहीं लहान नाहीं.

मावशी:– हो, तें आम्हांला तरी दिसत कां नाहीं ? पण बाई करायचें काय ?

मी:– कां बरें ? त्यांत अडचण कसली ?

मावशी:– अडचण कसली ! पण बाई तिच्या मामाच्या मनांत येईल तेव्हां ना ?

मी:– मामा कोण ? आणि ते असतात तरी कुठें ?

मावशी:– ते असतात कलकत्त्याला ? डाक्टर आहेत !

मी:–अस्सें, ते उंचेले असून, म्हातारे आहेत ते कीं काय ?

मावशी:— होय, पण [ आश्चर्यानें ] त्यांना तुम्ही कुठें पाहिलेंत ? ते तर कधींच इकडे आलेले नाहींत !

मी:— त्यांना मीं कलकत्त्यांतच पाहिलेलें आहे. मीं त्यांना पाहिलें त्यावेळीं मालतीसुद्धां त्यांच्याबरोबर होतीच.

मावशी:—– खरें कीं काय ?

हा पांच अक्षरी प्रश्न करून ती अगदीं आश्चर्यचकित् होऊन हिकडे तिकडे पाहूं लागली. जणुं काय, मला मालतीचें ह्यापूर्वीं एक-वार दर्शन झालें हें मोठें पाप झालें होतें. काय असेल तें असो, तिच्या त्या भांबावलेल्या वृत्तीवरून ही कदाचित् हा रंगांत आलेला विषय इथेंच सोडील अशी मला शंका आली व त्याप्रमाणें ती उठण्या-च्याही बेतांत होती. परंतु मला आज सोक्षमोक्ष करून घ्यायचाच होता म्हणून मीं तिला खालीं बसावयास विनंती केली. त्याप्रमाणें ती बसल्यानंतर अगदीं हलक्या स्वरानें तिच्याशीं पुन: बोलावयास मीं सुरुवात

केली. " मावशी, रागावूं नका, पण मीं तुह्मांला आधीं असें विचारतों कीं, मालतीच्या लग्नाचें अद्याप कुठें ठरलेलें तर नाहींना ? "

हा अकल्पित प्रश्न ऐकून तिला जास्तच आश्चर्य वाटलें व ती ह्मणाली " कां बरें ? असें विचारण्याचें कारण ? "

" कारण ह्मणून इतकेंच कीं, जर तिचें अद्याप कुठें ठरलें नसेल तर– "

मावशीः— [ जास्तच आश्चर्यानें ] तर काय ? तुम्हाला ती द्यावी म्हणतां कीं काय ?

दुसरा एकादा असता तर हा प्रश्न ऐकून घाबरून उठूनच जाता. कारण, हा प्रश्न विचारतांना तिची मुद्रा अगदीं तिरस्कारयुक्त दिसत होती. परंतु माझें मन मालतीमय झालें असल्याकारणानें माझ्या मनांत भीतीचा लवलेशही आला नाहीं. म्हणून मी " हो, अशी माझी मनापासून इच्छा आहे. " असा जबाब दिला.

हा जबाब ऐकून तर तिचा तिरस्कार जास्तच वाढला व ती म्हणते, " म्हणजे तुम्हाला वेडबिड तर लागलें नाहींना ? "

मीः—कां बरें मावशी ? मालतीला मी अयोग्य आहें असें कां वाटतें तुम्हाला ?

मावशीः—तसें नव्हे ! पण तुमचें असें काय बघून तुह्माला द्यावी बाई ! "

मीः—आणि मावशी, खरोखरच माझें तुह्मीं कांहींच बघितलें नाहीं हेंच खरें ! मी असा इथें ह्या भाड्याच्या खोलींत रहातों ह्यावरून तुह्माला शंका येणें अगदीं रास्त आहे. पण तुह्मीं एवढ्यावरूनच माझी किंमत करूं नका ! गांवांत माझें मोठें घर आहे, कोटांत माझें मोठें दुकान आहे, शेतवाडी, जमीनजुमला, मिळून कांहीं नाहीं ह्मटलें तरी मी दहा लाखांचा धनी आहें.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
ग्रं. नं. 9450

मावशीः—[ तिला ह्या भाषणाची थट्टा वाटून ] हें सर्व खरें आहे तर मग तुह्मी असे इथें कां ?

हा प्रश्न येणार व आपल्याला त्याचें उत्तर द्यावें लागणार हें मीं अगोदरच ताडलें होतें. अर्थात् त्याबद्दल माझी तयारीही होतीच. त्याप्रमाणें मीं पहिल्यानें मालतीला कसें पाहिलें; नंतर दुसऱ्या दिवशीं वेड्यासारखा तिचा शोध कसा केला; पुढें येथें मुंबईत कशी गाठ पडली व मीं तेथें कसा येऊन राहिलों वगैरे सर्व गोष्टी जशा घडल्या होत्या तशाच सर्व इत्थंभूत सांगितल्या. तिलाही त्या सर्व ऐकून बरेंच आश्चर्य वाटलेंसें दिसलें. कारण त्यावर ती ह्मणाली, "वाः तर मग तुह्मी बरेच खटपटी दिसतां एकूण ?"

ह्या वेळेस मी अगदीं दीन झालों होतों व ज्याअर्थीं तिनें माझें ह्मणणें शांतपणें ऐकून घेतलें त्याअर्थीं माझ्या कार्यांत झाली तर तिचीच मदत होईल अशी माझी खात्री झाली होती ह्मणून मींही "मावशी, खटपटी म्हणा अगर वाटेल तें म्हणा ! झाली गोष्ट तुम्हाला सांगून टाकली. आतां तुह्मी काय वाटेल तें करा. माझा कार्यभाग करून द्यावयाचा सर्व भार मी तुमच्यावर सोंपवितों. मला ह्यापेक्षां जास्त कांहीं बोलतां येत नाहीं." असा जबाब दिला.

ह्यावर ती कांहीं एक न बोलतां बराच वेळपर्यंत स्तब्ध बसली. त्यावरून ह्या कामीं कांहीं तरी आपली संभावना व्हावी अशी तिची इच्छा असावी व ती गोष्ट उघडपणें बोलून दाखवितां येत नसल्यानें ती कदाचित् गप्प बसली असवी अशी मला शंका आली. ह्मणून मीं तोंडीं प्रश्न सोडवून टाकला. मी ह्मणालों, "मावशी, विचार कसला चालला आहे एवढा ? नाहीं ह्मणून मला हताश करूं नका. आतां ह्या बाबतींत

तुम्हाला बरेच श्रम पडणार आहेत ही गोष्ट खरी; परंतु त्याबद्दल तुह्मीं बेफिकीर असा. मी तुमची मेहनत व्यर्थ जाऊं देणार नाहीं. माझ्या हातून जें कांहीं फूल नाहीं फुलाची पाकळी—पण इतकें कशाला, हें घ्या, हें आपलें उगच कांहीं तरी—पुढची संभावना फार निराळीच आहे ! यावरून तर तुमची खात्री होईलना ? " इतकें ह्मणून माझ्या हातांतली सुमारें पांचशें रुपये किमतीची हिऱ्याची अंगठी तिच्या हातावर ठेवली.

द्रव्य काय करणार नाहीं ! तिनें मोठ्या आनंदानें अंगठी हातांत घेऊन तिच्याकडे एक दोनदां पाहिलें. त्या वेळेस मला आलेला संशय अगदीं खरा होता, असें मला वाटलें. कारण अंगठीकडे पहातां पहातां तिची कळी खुलली. तथापि ती मोठी वस्ताद बाई, जणुं कांहीं आपल्याला असल्या लांचाची मुळींच जरूर नाहीं असें दाखवून " छे, छे, भारीच बाई तुह्मीं उतावळे; पण ही कशाला मला ? " असें म्हणून अंगठी मजपुढें करूं लागली. हा मानभावीपणा मला समजला होता ह्मणून मीं तो हात मागें सारून, " असूंद्या हो, तिची अशी काय मोठीशी बिशाद ! मालतीपुढें तिची काय किंमत ? पण आतां तरी करालना खटपट ? " असें मोठ्या काकुळतीनें विचारलें.

मावशीः—[ अंगठी बोटांत घालून ] माझें काय जातें करायला ! पण तुम्हाला खरेंच सांगूं का ? तुह्मी हा नाद सोडाल तर बरें होईल !

मीः—भले शाबास ! असें म्हणून मला निराश करावयाचें होतें तर मला इतकें बोलूं तरी कशाला दिलेंत ! छे, छे, मावशी, नकाहो, असें ह्मणूं नका ! ह्यावेळीं माझी स्थिति कशी झाली आहे ती जर तुम्हाला दाखवितां आली असती—

मावशीः—इतकें कांहीं हें नको व्हायला. माझें काय ! मीं करीन

खटपट म्हणा ! पण मला तिच्या मामाला आधीं विचारलें पाहिजे.

मी:— आतां ठीक बोललांत. पण मामा तरी काय ! तुह्मी जें कांहीं सांगाल तेंच ते करणार. अहो, ह्या लग्नाच्या बाबतींत जेवढें तुह्मां बायकांना कळतें तेवढें आह्मां पुरुषांना कळत नाहीं; ह्मणून म्हणतों कीं, जर तुह्मीं मनावर घ्याल तर मामा ह्मणजे नाहीं ह्मणतील अशांतला भाग नाहीं; मग कसें ?

मावशी:— हो तेंही खरेंच, मी त्यांना सांगेन व ते माझें ऐकतीलही. पण—

मी:— पण काय ? आतां अडलें कुठें तें समजूं द्या.

मावशी:— दुसरें कांहीं नाहीं; पण हा नाद—तुह्मीं—

मी:—मावशी, ह्यासकट दोनदां तुम्हीं मला " तुम्ही हा नाद सोडून द्या " म्हणून सांगितलेंत. पण त्याचें कारण कांहीं सांगत नाहीं. आतां मी तुम्हाला शेवटचें एकच सांगतों कीं, मला कोणीही व कितीही सांगितलें तरी माझा हा नाद सुटायचा नाहीं व तो मी काय वाटेल तें झालें तरी पुरविणारच. तुम्हाला असें का वाटतें, कीं मालतीसारख्या सौंदर्याच्या राशीला शोभेल असें माझ्या हातून कांहींच होणार नाहीं ? आणि म्हणून का तुम्हाला अशी शंका येते ? असें जर असेल तर ही शंका व्यर्थ आहे. मालती एकवार माझी झाली ह्मणजे तिला सोन्यामोत्यांनीं नुसती मढवून काढीन. गाडीशिवाय तर तिला एक पाऊल टाकूं देणार नाहीं. अशा सुखांत ठेवीन आणखी काय पाहिजे; पण आतां तुह्मी मला निराश करूं नका.

ह्यावर मात्र तिचें समाधान झाल्यासारखे दिसलें. कारण ती लागलीच हंसून ह्मणाली, " छे, छे, शर्थ झाली बाई तुमची ! बरें

तर मी माझ्या हातून होईल ती खटपट करतें. पण आधीं मामांना पत्र लिहिलें पाहिजे. ”

मी:– तर उद्याच जाऊं द्या पत्र. वाटलें तर त्यांना इथें बोलवा.

मावशी:– हो, उद्यांच लिहिवतें. त्यांना कांहीं यायला व्हायचें नाहीं ह्मणा; पण मी आपली बोलवतें त्यांना !

मी:– ठरलें तर मग ? आतां मी अगदीं निर्धास्त राहूं ?

मावशी:–हो, अगदीं खुशाल; आतां सगळें माझ्याकडे लागलें.

ह्याच सुमारास मालतीही उठली होती. मला वाटतें आमच्या ह्या भाषणाचा शेवटचा भाग तिनें ऐकलाही असेल. मलाही बसून बराच वेळ झाला होता ह्मणून, “ बरें आहे तर विसरूं नका हो ! मी पुनः करतोंच उद्यां आठवण. ” असें मावशीला बजावून उठलों व खोलींत आलों. आमच्या ह्या बोलण्याच्या नादांत वेळ किती निघून गेला हें मला समजलें सुद्धां नाहीं ! कारण ह्यावेळीं चांगले सहा वाजले होते; ह्मणून मी कपडे करून बाहेर फिरावयास गेलों व तेथून घरीं जाऊन भोजन केलें. आज माझें काम निर्मेशिग्में झालें होतें. ह्यामुळें मला जो आनंद झाला होता त्या भरांत मला आजची रात्र तरी निदान त्या कोठडींत जाऊन पडावें असें वाटलें नाहीं. म्हणून झालेल्या एकंदर हकीकतीचा विचार करीत व जिच्या पुनर्दर्शनाची सुद्धां आशा नव्हती ती मालती आतां थोड्याच दिवसांत माझी होणार ह्याबद्दल आनंद मानीत मीं ती रात्र घरींच काढली.

मनुष्यानें नुसते बेत मात्र करावेत, ते घडवून आणणें अगर न आणणें त्याच्या स्वाधीन नसतें. विषयी व चौरकर्म करणारे ह्यांचे सर्व बेत जर त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणें सिद्धीस जाते तर आणखी काय पाहिजे होतें !

मी अमुक करीन, तमुक करीन, हें उद्यां करतां वगैरे अनेक रीतीनें मनुष्यप्राणी आपल्या भावी सुखाची इमारत रचीत असतो; परंतु तिचा पाया ईश्वराच्या मायामय वालुकेवर असल्याकारणानें ती इमारत म्हणजे पुरी होतेच अथवा झालीच तर ती चिरस्थायी होतेच असें मात्र नाहीं. उद्यां किंवा मग ह्या शब्दांवर विश्वासच ठेवतां येणार नाहीं. कारण, आयुष्य हें क्षणभंगुर आहे, हें प्रत्येकाला माहीत असतें; तथापि आम्ही सर्व ईश्वराच्या मायाजालांत गुंतून गेल्यामुळें ह्या खऱ्या तत्त्वापासून फार दूर असतों व आमच्या भावी सुखाची आम्ही आजच तजवीज करीत असतों. परंतु ही तजवीज ईश्वरी सूत्रापुढें कितपत टिकणार आहे व अर्थात् तीपासून आपणाला किती सुख होणार आहे, ह्याचा आह्मी मुळींतरी विचार करतों काय ? पण जाऊं द्या; हें ब्रह्मज्ञान मला यावेळीं मुळींच उपयोगाचें नाहीं. कारण जर ह्या वेदांतानें मला ह्याचवेळीं पछाडलें तर माझा जीवनक्रम मला येथेंच आटपावा लागेल.

असो; रात्रौ यथेच्छ झोंप घेऊन आज कलकत्त्यास पत्र लिहविण्याची मावशीला आठवण करावयाची म्हणून सकाळींच चहापाणी करून मीं माझ्या खोलीकडे आलों. आधीं खोली वगैरे न उघडतां तसाच मावशीच्या खोलीकडे गेलों. अहाहा, ह्यावेळीं मालतीचेंही दर्शन सहज होईल म्हणून मला किती आनंद झाला होता; पण खोलीजवळ जातों तों तिथें काय ? खोलीचीं दारें साफ उघडीं असून आंत सामानसुमान वगैरे कांहीं नव्हतें. हें पहातांच माझे हात पाय गळून गेले. परंतु कदाचित् ही खोली सारवण्याकरतां किंवा कांहीं अन्य कार्याकरतां रिकामी करून तें सर्व सामान आंतल्या खोलींत ठेवलें असेल, ह्या शंकेवर मोठ्या आशाभूत मुद्रेनें आंतलीही

खोली उघडून पाहिली; पण तिथेंही जेव्हां सर्वत्र शुकशुकाट पाहिला तेव्हां मात्र मीं अगदीं गलितधैर्य होऊन माझ्या डोळ्यांपुढें चक्कर आली व मी तेथेंच क्षणभर बसलों.

कांहीं वेळानें मी चांगला शुद्धीवर आलों. तरी पण ही मंडळी खरोखरच पळून गेली असतील अशी माझी खात्री होईना. लगेंच चाळीच्या भय्याला बोलावून आणलें व त्याला त्यांची हकीकत विचारली. त्याच्या सांगण्यांत असें आलें कीं, कालरात्रौ त्यांनीं आपलें सर्व भाडें चुकतें केलें व त्या गाडींत बसून निघून गेल्या. हा विषय मीं इथेंच आटपता घ्यावयास पाहिजे होता. परंतु आणखी एक मार्ग होता व तोही करून पहावा म्हणून मी दुटाकीवरील व्हिक्टोरिया-स्टँडवर गेलों. त्या ठिकाणीं असणाऱ्या व्हिक्टोरिया मधून कोणतींतून त्या निघून गेल्या असाव्यात ह्याचा कांहीं तपास लागतो काय म्हणून पाहूं लागलों. बऱ्याच वेळानें त्यांना घेऊन जाणारा व्हिक्टोरियावाला भेटला. पण त्यानें तरी काय " रात्रीं साडेआठ वाजतां दोन बाया भायखळ्याच्या स्टेशनावर नेऊन सोडल्या. " यापलीकडे कांहीं जास्त सांगितलें नाहीं. अथवा तो तरी काय जास्त सांगणार ? त्याला भाड्याशीं काम ? तें हातावर पडतांच उतारू कोठें जाणार ह्याची तो पंचाईत कशाला करतो ? ह्याप्रमाणें माझा आशावृक्ष बहुतेक तर ढासळून पडलाच होता; परंतु आतां शेवटचा एकच मार्ग होता व तोही करून टाकावा म्हणून मी भायखळ्याच्या स्टेशनावर गेलों आणि रात्रींच्या कलकत्ता मेलला कलकत्त्याचीं कांहीं तिकिटें गेलीं होतीं काय हणून तिकिटमास्तर जवळ शोध केला. त्यानें जेव्हां " नाहीं; कलकत्त्याचे फर्स्ट व सेकंडक्लासचे डबे बोरीबंदराहूनच रिझर्व

केलेले होते. अर्थात् हिकडे त्या वर्गाचें तर नाहींच; पण थर्डक्लास-चेंही तिकीट मुळींच खपलें नाहीं." सांगितलें. तेव्हां मात्र मी अगदीं साफ खचलों व जड पावलांनीं कसा बसा त्या कामाठीपुऱ्यांतल्या बिऱ्हाडीं आलों.

अरेरे ! काय ही आशा, आणि तिच्या मागोमाग लागलीच निराशा ! त्या स्त्रीचें—मालतीचें कलकत्त्यास प्रथम दर्शन झाल्यानें तिच्याविषयीं उत्पन्न झालेल्या प्रेमाचा अंकूर अगदीं वाळून जाण्याच्या बेतांत येतो न येतों तोंच तिच्या पुनर्दर्शनाच्या व मधुर भाषणाच्या सिंचनानें त्याला जीव देऊन त्याचा सुंदर वृक्ष बनला व आतां त्याचीं मधुर फळें थोड्याच अवकाशांत आपणास चाखावयास मिळणार असा मनाला धीर येतो न येतो तोंच त्यावर ही अशी वीज कशी पडली ! काल संध्याकाळीं त्या थेरडीनें " आज पत्र लिहिवतें " म्हणून मला नादीं काय लावलें ? व आज पहातों तों हा प्रकार ! खरोखर ! इतक्या दिवसांत कालच मला घरीं निजावयास जाण्याची कुठून दुष्ट बुद्धि झाली ! नाहींपेक्षां मी ह्या ठिकाणीं डोळ्यांत अगदीं तेल घालून बसलों असतों असें मला साफ फसविण्याचें धाडस त्यांच्यानें करवलें नसतें ! ती सटवी काल किती गोडगोड बोलली; पण अखेर आज मला चांगला पांचशें रुपयांचा गंडा घालून गेली ! आतां हिला मी कोठें शोधूं ! ह्या व अशाच अनेक विचारांनीं मी अगदीं गोंधळून गेलों. असाच आणखी कित्येक दिवस जरी मी तेथें बसलों असतों तरी मला त्यांचा काय पत्ता लागणार होता ? तात्पर्य, अपमान मनाला सांगावा म्हणतात त्याप्रमाणें माझें सर्व सामान तेथून काढून मला मुकाट्यानें घरीं यावें लागलें.

पण घरीं तरी काय ? तिथें मला काय सुख होतें ! पहिल्या खेपेला मालतीबद्दलचे माझे विचार माझ्या मनांतून लवकर गेले; पण ह्या खेपेस तिनें माझ्या हृदयावर इतका पगडा बसवला होता कीं, रात्रंदिवस मला तिच्याशिवाय विषयच नव्हता. मला दुकानांत जाणें, कोणाशीं बोलणें चालणें कांहीं एक नकोसें झालें व प्रत्येक वस्तूची चीड येऊं लागली. जगाचा पूर्ण वैताग आलेला व ह्या निस्सार जगावर लाथ मारलेला जसा एकादा योगी असतो त्याप्रमाणें मी अहोरात्र माझ्या खोलींत एकटाच बसून असे ! वाचकहो ! अशा स्थितींत जर माझे आणखी कांहीं दिवस जाते तर मी अगदीं वेडा बनलों असतों. परंतु ईश्वराच्या कृपेनें म्हणा अगर अवकृपेनें म्हणा मला एके दिवशीं एक पत्र आलें. तें कोणाचें होतें ह्याची तुम्हांस सहजच जिज्ञासा असणार ? हें जाणून मी तें पत्र जसेंच्या तसेंच खालीं देत आहें.

" **मुंबई.**

ता०--१८

कृ० सा० न० वि० वि० आपण माझी गाठ घेण्याची इच्छा दर्शविल्यावरून मी उद्ईक सायंकाळीं चार वाजतां आपणास भेटतों. तरी आपण त्यावेळीं घरीं असावें. कळावें, हीं विनंती.

आपला

**डॉ० शांताराम.** "

हें चिठीवजा पत्र पाहून हे डॉ० शांताराम कोण ? आणि मीं ह्यांना कधीं बोलावलें ह्याचा उलगडा होईना. खरोखर म्हटलें तर

मी जसा अलीकडे कोणाकडे गेलों नाहीं, तसें दुसऱ्या कोणास मला माझ्या घरीं भेटावयासही येऊं दिलें नाहीं. कारण, कोणाशीं नुसतें बोलण्याचाही मला कंटाळा आला होता. परंतु, म्हटलें जाऊं या; कोण आहे तो पाहूं व त्याची बोळवणही थोडक्यांतच करूं ह्मणजे झालें.

डॉ. शांताराम वेळेच्या बाबतींत अगदीं नियमित होते असें ह्मटलें पाहिजे. कारण दुसऱ्या दिवशीं बरोबर चार वाजतां सदर डॉक्टर बाहेर आले असल्याबद्दल नोकरानें मला येऊन सांगितलें; व "जा, त्यांना आंत घेऊन ये" म्हणून सांगून मीही पण तसाच बसलों. परंतु दार उघडून जेव्हां ते आंत आले तों काय—डॉक्टर शांताराम म्हणजे कोणी दुसरे तिसरे नसून, मालतीबरोबर कलकत्त्यास पाहिलेले ते वृद्ध गृहस्थ– मावशीनें ह्मटल्याप्रमाणें मालतीचे मामाच होते. त्यांना पहातांक्षणींच माझ्या वठलेल्या आशावृक्षाला पुनः पालवी फुटली व मावशीवर मी विनाकारण रागावलों, तिनें एवढ्या बाबतींत तरी आपलं वचन पाळलं, असें असून मीं तिला विनाकारण शिव्याशाप दिले याबद्दल मला वाईटही वाटलें. मीं ताबडतोब उठून त्यांना नमस्कार करून हातीं धरून मोठ्या सन्मानानें कोंचावर आणून बसवलें.

मुंबईच्या रिवाजाप्रमाणें लगेंच चहापानाचा समारंभ झाला व इकडचे तिकडचे कुशल प्रश्न झाल्यावर डॉक्टरनींच बोलावयास सुरूवात केली.

डॉक्टर:— माझी व तुमची भेट व्हावी अशी तुमची इच्छा दिसल्यावरून मी मुद्दाम आलों आहे, ही गोष्ट माझ्या पत्रावरून तुम्हाला समजलीच असेल.

मी:— हो, आणि त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें.

डॉक्टर:— अं:, त्यांत आभार कसचे. तें असो म्हणा ! पण मी आलों म्हणजे काय ! सर्व हातांतलीं कामें एकीकडे ठेवून आलों आहे. बाकीच्या गोष्टी मग पाहिजे तर फुरसतीनें बोलतां येतील. तूर्त आपण आपल्या कामाकडे वळूं या.

मला तरी तेंच पाहिजे होतें म्हणून " ठीक आहे. " एवढेंच म्हणून मी ते पुढें काय बोलतात तें मोठ्या आतुरतेनें ऐकूं लागलों.

डॉ०—मी कां आलों आहें हेंही तुम्हांला माहीत आहेच. अर्थात् आतां त्यासंबंधानें पुन: उल्लेख करून वेळ गमवावयास नको. आमच्या मालतीला तुम्हांसारखे थोर गृहस्थ पदरांत घ्यावयास तयार झाले ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे व हा तिच्या भाग्याचाच योग समजला पाहिजे. आतां आपल्या पद्धतीप्रमाणें पत्रिका वगैरे जुळवून पहाणें इत्यादि गोष्टी व्हावयास पाहिजे होत्या; पण त्या होत नाहींत म्हणून जरा दिलगिरी वाटते. खरोखर म्हटलें तर असल्या नसत्या गोष्टींत रिकामा वेळ घालविणें मला मनापासून आवडत नाहीं म्हणून म्हणा, अगर मला जी कांहीं तुम्हां उभयतांची हकीकत कळली आहे ती. वरून म्हणा, ह्या पत्रिका वगैरे न पाहणें हेंच मला एकअर्थीं बरें दिसतें. अर्थात् हा विवाह म्हणजे केवळ प्रीतिविवाह व्हावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. ही गोष्ट तुम्हासही कबूल आहे असें मला कळलें आहे. कां असेंच ना ?

हा प्रश्न ऐकून माझी स्थिति जरा चमत्कारिक झाली. कारण मालती माझी होणार खास ह्या कल्पनेनें जरी मला आंतल्या आंत आनंदाच्या उकळ्या येत होत्या तरी माझ्या पसंती नापसंतीसंबंधानें प्रत्यक्ष मालतीच्या मामाजवळ ' होय ' किंवा ' नाहीं ' असें इतक्या उघड

रीतीनें मला म्हणवेना. पण हा दोष माझा नव्हे. कारण आमच्या इकडे प्रौढविवाहाची पद्धत कितीही जोरांत आली तरी पण मुलाच्या अगर मुलीच्या विवाहासंबंधीं गोष्टी उभयतांच्या कोणी तरी वडिल माणसांनींच आपसांत ठरविल्या पाहिजेत हें आमच्या रक्तांत अगदीं तद्रूप झालेलें धर्माचें तत्व आमच्यांतून कसें नाहीसें होणार ! अर्थात् डॉक्टरांच्या " कां असेंच ना ? " ह्या प्रश्नाला उत्तरादाखल म्हणून मी मान खालीं घालून नुसता हंसलों इतकेंच.

डॉक्टरनीं माझ्या मनाची ही गोंधळलेली स्थिति ताबडतोब ताडली असावी. कारण ते पुढें म्हणतात, " हं ! समजलों ! पण इतका संकोच धरण्याचें कांहीं कारण नव्हतें. वधूवरांनीं एकमेकांचे स्वभाव ओळखले व त्यांचीं मनें जुळलीं म्हणजे तशा बाबतींत वडिलांनीं कधीं आड येऊं नये, असें मला वाटतें. व असेच विवाह परिणामीं सुखकर होतात, असें जाणून मी आपली उगाच तुमची संमती विचारली. बाकी तुम्हीं उभयतांनीं अमच्या विचाराचें कांहीं शिल्लक ठेवलें नव्हतेंच म्हणा ! असो. एकंदरींत मालतीचा अंगिकार करावयास तुम्हीं कबूल आहांत इथवर तर जुळलेंच. आतां मुद्याची गोष्ट म्हणजे अशी कीं, मालतीच्या जवळचा किंवा दूरचा असा नातलग काय तो मी व माझी स्थिति म्हणजे कांहीं फारशी बरी नाहीं. अर्थात् तुमच्या तोलाला साजेल असें मला कांहींच करणें शक्य नाहीं. अशा स्थितींतही तुम्ही तिला पदरांत घेत आहा तर मी मोठा अनुग्रहच समजतों. परंतु ती जशी आहे तशीच तुम्हाला पसंत आहे काय ? असें मला विचारलें पाहिजे ! कारण ह्या पडल्या जन्माच्या गोष्टी ! पुढें मागें घुसपूस न व्हावी म्हणून अगोदरच स्पष्ट असावें हें बरें. तेव्हां कसें ?

ह्याही प्रश्नाचें काय उत्तर द्यावें ह्याचें मला मोठें गूढ पडलें. कारण " मालती आहे तशी तुम्हांला कबूल आहे काय ? " ह्या प्रश्नाचा अर्थ तरी मीं काय समजावा ? लग्नामध्यें तिला अगदीं नुसती पिवळी करूनच दिली म्हणून मागाहून मी रुसेन फुगेन व तिला मजकडून जाच होईल अशी का शंका त्यांना आली होती ! अशी जर आली असेल तर ती व्यर्थ होती. कारण हिऱ्याच्या, मोत्यांच्या वाटेल त्या दागदागिन्यांनीं तिला मढवून काढावयास मी समर्थ होतों. तिच्याकडून मला एका तनसडीचीही इच्छा नव्हती ! केवळ ती एकदां माझी केव्हां होईल ह्याबद्दल आतुर झालेल्या मजकडून असें वर्तन कसें होईल ! मग ह्या प्रश्नाचा अर्थ तरी काय असावा म्हणून मी गोंधळांत पडलों.

परंतु डॉक्टरनीं ह्याहीवेळीं माझें हृद्गत ओळखून आपणच त्या प्रसंगाचा उलगडा केला ! ते म्हणाले " अहो, एवढ्या विचारांत कसल्या पडलांत ? माझ्या म्हणण्याचा अर्थ एवढाच होता कीं, कांहीं तरुण मंडळी पहिल्यानें अविचारानें केवळ सौंदर्यावर भुलून कार्यें करून टाकतात व पुढें जरासें बिनसलें म्हणजे मग सगळ्या दोषांचें खापर बिचाऱ्या मुलीच्या कपाळावर फुटतें. मग मुलीचा बापच कसा होता, तिची आईच कशी होती वगैरे चवकशा सुरू होतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, अखेर हे संबंध पश्चात्तापाला व मुलीच्या सर्वस्वी नुकसानीला कारणीभूत होतात. तसा प्रकार होऊं नये. बाकी तुम्ही तो होऊं देणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे म्हणा. पण आपलें सहज सुचविलें. त्यांत एवढें घोटाळ्यांत पडण्यासारखें कांहीं नव्हतें. असो, हीही गोष्ट तुम्हाला कबूल आहे असें तुमच्या स्मितयुक्त मुखावरून मी धरून चालतों. आतां दुसरी मुद्याची गोष्ट म्हणजे

विवाहाचा मुहूर्त. वास्तविक पहातां तुमचा हा पहिलाच संबंध, अर्थात् तुमच्या अनुकूलतेप्रमाणें तो मोठ्या थाटानें व्हावयास पाहिजे हें मीही जाणतों. परंतु— ”

इतकें ह्मणून डॉक्टर जेव्हां थांबले तेव्हां हा ‘ परंतु ’ आणखी कांहीं घोटाळा घालतो कीं काय, ह्मणून मी साशंक मुद्रेनें त्यांच्याकडे पाहूं लागलों. ह्या प्रसंगीं मला कांहींच बोलण्याचा योग येऊं देऊं नये असा जणूं त्यांचा निश्चयच झाला होता म्हणून ते आपणच पुढें बोलूं लागले.

डॉक्टरः---परंतु—म्हणजे इतकेंच कीं, अशी वास्तविक स्थिति असूनही मला तुमच्या सर्व थाटाचा किंचित् विरस करावा लागणार आहे सबब दिलगिरी वाटते. कारण माझा हा धंदा पडला चमत्कारिक ! एक क्षणभर सुद्धां जागेवरून हलतां येत नाहीं. तेव्हां मुहूर्त जेवढा जवळचा जमेल तेवढा बरा. फार कशाला, आज काय तृतीया ना ? हां, येत्या दशमीला मुहूर्त आहेच—ठीक आहे हाच कायम करावा म्हणजे झालें. असें केल्यानें मी मोकळा होईन. समारंभ काय मागून वाटेल तितके दिवस चालूं ठेवतां येईल व तो तुम्हीं ठेवालच. पण मला मात्र त्यांत वेळ घालवितां येत नाहीं. मी फक्त कन्यादान करून जाणार ! ह्मणूनच म्हणतों ही दशमी कायम करा—म्हणजे झालें.

हा अकल्पित योग पाहून मला आनंद तर झालाच परंतु ही इतकी गडबड मला पसंत नव्हती. कारण, कांहीं झालें तरी निदान ही गोष्ट काशीच्या सल्ल्यानेंच व्हावयास पाहिजे होती. शिवाय माझ्या थाटाप्रमाणें सर्व तयारी करण्यास मला ही मुदत फारच थोडी होती. बरें गडबड करूं ह्मटलें तर माझ्या तरी बरचें असें कोण होतें ! अर्थात्

" ह्याबद्दल मात्र जरा विचार करावा लागेल. " असें मीं जरा संकुचित् वृत्तीनें उत्तर दिलें; परंतु डाक्टरांची इच्छा एकाच बैठकींत सर्व निकाल करून टाकावयाचा अशी असल्यामुळें त्यांना हें उत्तर पटलें नाहीं. ते म्हणाले, " छे: छे: ह्या बाबतींत तर तुम्ही अडवूं नकाच ! कारण मला एक एक दिवस म्हणजे सोन्याचा आहे ! इतकेंही करून तुमची ही गोष्ट लांबणीवर टाकण्याची इच्छा असली तर नाइलाज आहे. मावशीला बरोबर देऊन मालतीला तुमच्या स्वाधीन करतों. माझ्या मतें हेंच कन्यादान होईल. शास्त्रोक्तरीतीनें तुम्ही पुढें सवडीनें समारंभ करून टाका. असा कांहीं तरी गौणपक्ष स्वीकारावा लागेल ! "

मला तरी स्वतःला तें लांबणीवर टाकण्याची कुठें इच्छा होती म्हणा; परंतु घरगुती अडचणीसाठीं म्हणून ही वरील सबब मीं पुढें केली होती. तीवर जेव्हां हें वरील उत्तर ऐकलें तेव्हां विचार केला कीं, ' शुभस्य शीघ्रं ! ' हो, नाहींतर ह्यांनीं तेवढ्या सबबीवर आणखी कांहीं घोटाळा केला तर पुनः पश्चात्तापाला कारण व्हायचें. अर्थात् त्यांना ' बरें आहे. ' असा जबाब द्यावा लागला.

डॉक्टर:– हा ! हा ! आतां कसें ठीक बोललांत ! बरें, बोलावयाच्या गोष्टी सर्व बोलून झाल्या ! आतां ठरलेंच तर. दशमीचा मुहूर्त. आम्ही अष्टमीला अस्तमानीं येथें हजर आहोंत. मात्र उतरावयाची वगैरे सोय आपण ठेवली म्हणजे झालें. ह्या पलीकडे आणखी काय बोलायचें ? आतां मला रजा द्या !

ते उठले त्यावेळीं त्यांनीं घरीं जेवावयास रहावें म्हणून मीं त्यांना पुष्कळ आग्रह केला; परंतु " ज्यांच्या घरीं आपण उतरलों आहोंत

त्यांचा आज फारच आग्रह आहे. शिवाय आतां पुढची सर्व तयारी करावयास मला आजच रात्रींच्या मेलनें कलकत्त्यास गेलें पाहिजे. यावेळीं मला माफ करा ! यापुढें प्रसंग आहेतच ! " असें सांगून ते जाऊं लागले. मी तरी यावर काय बोलणार ? यानंतरचें माझे काम म्हणजे त्यांना दरवाजापर्यंत पोंचवून ते माझें भावी मामेश्वशुर ह्या नात्यानें त्यांना एक नमस्कार ठोकणें एवढेंच होतें.

## प्रकरण आठवें

हा छोटासा पण महत्वाचा भाग खरोखर म्हटलें असतां मागल्या प्रकरणासच जोडून यावयाचा; परंतु ती मागील लांबच लांब हकीकत ऐकून वाचक कदाचित् कंटाळले असतील म्हणून थोड्याशा विश्रांतीकरितां हें प्रकरण नवीन घालणें भाग पडलें.

असो, एकंदरींत मालती आतां मात्र खास माझी अर्धांगी होणार अशी माझी खात्री झाली. कारण डॉक्टर शांताराम म्हणजे प्रत्यक्ष तिचे मामा व पालक इतक्या लांब येथें येऊन मला वचन देऊन गेले; तेव्हां त्यांत आतां शंका घेण्याचें कारणच राहिलें नव्हतें. विचार करावयाची म्हणजे एक गोष्ट होती, ती हीच कीं, त्या मावशी म्हणवणाऱ्या बाईला मजकडून चांगली पांचशें रुपयांची प्राप्ति झाली असूनही " हा नाद तुह्मी सोडून द्याल तर बरें ! " असें जी मला वरचेवर बजावून सांगत होती, त्याचा अर्थ काय ? शिवाय " मालती आहे तशीच तुम्हाला कबूल आहे काय ? " म्हणून जें डॉक्टरांनीं विचारलें त्याचा तरी अर्थ काय ? मालतीच्या अंगांत कांहीं व्यंग

होतें म्हणावें तर माझ्या जवळ जवळ एक महिन्याच्या सहवासांत मला तसें कांहींच आढळून आलें नाहीं. बरें, मी थोरामोठ्याचा मुलगा असल्याकारणानें हुंड्यापांड्याचें कसें जमेल ही शंका येऊन त्यांनीं त्या वाक्यांनीं तसें कांहीं सुचवलें असेल म्हणावें तर मला त्यांच्या एका सुतळीच्या तोड्याचीही अपेक्षा नसल्याचें मीं अगोदरच सुचविलें होतें. मग ह्या वाक्यांचा अर्थ काय ? खरोखर मीं या बाबतींत डोकें पुष्कळ चालवलें तथापि माझा कांहींच तर्क चालेना. शेवटीं अशी कल्पना बसविली कीं, मालतीचें कुल कदाचित् कमी दर्जाचें असेल व त्यामुळें कदाचित् मागाहून शंकाकुशंका निघतील आणि मग बिचाऱ्या मालतीचे हाल होतील, असें वाटूनच त्यांनीं मला असें सुचविलें असावें ! पण जर अशी त्यांची समजूत झाली असेल तर ती किती वेडगळ होती ! कारण मालतीचें कुळ कितीही कमी दर्जाचें असलें तरी एकदां माझ्याशीं संबंध होतांच तें माझ्या बरोबरीचेंच होणार होतें हें कसें त्यांना समजलें नाहीं ! मी जो तिच्याविषयीं इतका आतुर बनलों होतों, तो तिच्या कुळाकडे पाहून कीं रूपाला भुलून ! पण जाऊं द्या ! त्या वाक्यांचा कांहीं जरी अन्य अर्थ असता तरी त्याबद्दल विशेष विचार करावयास त्यावेळीं मला वेळ कुठें होता !

माझ्या लग्नाचें ठरलें हें ऐकून सुंदररावाला व विशेषतः काशीला फार आनंद झाला. परंतु तें इतक्या गडबडीनें ठरलें व त्याहीपेक्षां तें जास्त गडबडीनें व्हावयाचें हें मात्र काशीला पसंत पडलें नाहीं. याबद्दल माझ्यावरती फार रागावली. " तुम्हीं आतां मुखत्यार झालांत ! तुमचें हात××× पोंचले; आतां मला कशाला थेरडीला विचाराल ? " असें सुद्धां ती म्हणाली. मला ह्या भाषणाचें उलट कौतुकच वाटलें. कारण

हें भाषण रागाचें तर खरेंच; पण त्यांत नुसता रागच नसून पूर्ण अनुराग भरला होता. अर्थात् मीं तिची थोडीशी समजूत करतांच ती शांत झाली. ह्या माझ्या लग्नांत तिची कोण धांदल उडून गेली होती! सारी जबाबदारी तिच्यावरच. जो येणार तो हें कसें करूं, तें कुठें ठेवूं अशा सर्व गोष्टी तिलाच विचारणार. इतकी तिची तारंबळ उडत होती; पण बिचारी अहोरात्र एकसारखी खटपट करीत होती.

घरांत बायकांचें काम जसें सर्व काशीच्या स्वाधीन तसें पुरुषांचें काम बिचाऱ्या एकट्या सुंदररावावर पडलें होतें! माझ्या हातून कांहीं होईल म्हणावें तर एक तर मी आळशी व दुसरें असें कीं, आम्हीं पडलों नवरदेव. तेव्हां आम्हांला बसल्या जागेवरून कोण हलूं देतो. तात्पर्य, जवळ पैसा असूनही आपल्या मायेच्या माणसांचा तुटवडा असल्या कारणानें हे गडबडीचें लग्न काशीला व सुंदररावाला चांगलेंच जाणवलें.

ह्याप्रमाणें सर्व तयारी मोठ्या जारीनें चालली होती; पण मी मात्र असावा तसा आनंदी नव्हतों. कारण आतांपर्यंतच्या आयुष्यक्रमांत आशा व निराशा ह्यांच्या चढाओढींत जी माझी ओढाताण चालली होती, तीमुळें माझें मन तर थोडेंसें शंकित झालें होतेंच. त्यांतच मावशीच्या व डॉक्टरच्या त्या वाक्यांची भर पडून "कदाचित् ह्या वेळीं ही माझी निराशा तर होणार नाहींना?" असें मला राहून राहून वाटूं लागलें होतें. यामुळें, जरी मालतीसारख्या केवळ अमूल्य रत्नाचा लाभ होणार म्हणून मला आनंद होत होता; तरी पण तो ह्या भीतीनें केव्हां केव्हां नाहींसाही होत होता! तात्पर्य, मी एकसारखा दिवस मोजीत होतों.

माझी ही शंका व्यर्थ होती. कारण डॉक्टर अगदीं ठरल्याप्रमाणें वेळेवर आले; पण ह्यावेळीं मावशी त्यांच्याबरोबर नव्हती. सुंदररावानें त्यांच्याकरतां एका शेजारच्या घरांत कडेकोट तयारी करून ठेवली होती ती पाहून डॉक्टर फार खुष झाले. आतां फक्त काय तो एकच दिवस मध्यें होता. तो जातांच दुसऱ्या दिवशीं मालतीचा व माझा एक जीव व्हावयाचा होता ! मालती आतां तेथेंच असून व फक्त अट्ठेचाळीस तासच मला तिच्या विरहांत घालवावयाचे होते, अशीं जरी आतां माझी पक्की खात्री झाली होती, तरी पण ते तेवढेच तास मला कसे गेले त्याचें यथायोग्य वर्णन करणें निदान मला तरी अशक्य आहे. ज्यांना त्या स्थितीचा अनुभव असेल त्यांनींच तिची कल्पना करावी.

अखेर दशमीचा दिवस उजाडला. कोण ती त्या दिवसाची धांदल. मी त्या साऱ्या हकीकतीचें येथें वर्णन करीत बसत नाहीं. कारण एक तर ते सर्व प्रकार ह्मणजे नेहमींच्या रुढींतले होते व दुसरें असें कीं, आतां ते मला पुरतें आठवतही नाहींत. पण मी येथें एवढेंच सांगतों कीं, दिवसाच्या सर्व कवायतींतून पार पडून सायंकाळच्या शुभ गोरज मुहूर्तावर भटभिक्षुकांच्या व माझ्या आप्तइष्टांच्या " शुभलग्न सावधानाच्या " गजरांत मी चतुर्भुज झालों.

अहाहा ! काय तो आनंद ! मंगलाष्टकें संपून अंतरपाट दूर होतांच आम्हां उभयतांची जेव्हां एकदृष्टी झाली तेव्हां माझ्या इतक्या खटपटीचें आज श्रेय मिळालें असें मला वाटलें. लग्नसमारंभ म्हणजे सर्वत्र आनंदी आनंद असावयाचा व त्यांत जर तो समारंभ थोरामोठ्यांचा असेल तर तो आनंद म्हणजे अगदीं परमावधीला पोंचावयाचा. तीच स्थिति आमच्या घरीं झाली होती. सुंदर-

रावादि माझी मित्रमंडळी तर जणुं हीच वेळ साधून " अखेर वसंतराव, [ क्षमा करा वाचक ! माझ्या नांवाशीं परिचय करून द्याव-याचा हा पहिलाच प्रसंग. ] शिकार साधलीत आँ ? " असे म्हणून माझी परोपरीं थट्टा करीत होती. मीही मधून मधून मालतीकडे पहात त्यांच्या ह्या स्वागताचा साभार स्वीकार करीत होतों. अशा रीतीनें जिकडे तिकडे आनंद चालला होता; परंतु डॉक्टरनीं म्हणजे आतां माझ्या मामेश्वशुरांनीं त्याचा विरस करण्याची इच्छा दर्शविली. त्यांनीं मला क्षणमात्र एकीकडे बोलावून, " मी आताच्या गाडीनें जाणार ! " असें सांगितलें. " भलतेंच कांहीं-तरी ? फार नाहीं पण आजची रात्र राहिल्यानें कांहीं विशेषसें हें होत नाहि. तें कांहीं नाहीं, आज कांहीं आह्मीं जाऊं देत नाहीं ! " असें ह्मणून मीं व सुंदररावांनीं त्यांना राहण्याचा फार आग्रह केला व शेवटीं " निदान जेवून तरी जावें. " म्हणून विनंती केली.

त्यांनीं जेव्हां " छे: छे: माफ करा ! मीं त्या भानगडींत पडलों तर माझी गाडी चुकेल ! माझें काम किती महत्वाचें आहे तें मीं तुम्हाला काय सागूं ? मला आतां गेलेंच पाहिजे— बाकी असें करण्यांत तुमचा विरस होत आहे हें मीं जाणतों आहें—पण काय करूं ? नाइलाज आहे ! जेवणाचें काय मोठेंसें ? हं ! आतां जास्त काय सांगायचें ! माझा प्राण तुमच्या स्वाधीन केला आहे त्याला जपा. हं तुह्माला मीं काय सांगावें ? माझ्या वृद्धावस्थेंत तिचा विरह मला अत्यंत दुःखद होणार आहे ! परंतु, ही जनरूढी आहे ! तिच्या सुखाकडे लक्ष्य देऊन माझा मी विवेक करीन झालें ! ! " असें त्यांनीं निक्षून सांगितलें. तेव्हां आह्मीं तरी काय करणार ! लागलीच आम्हीं उभयतांनीं—मीं व मालतीनें—

त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें. त्यांचा मंगल आशिर्वाद घेतला– व त्यानंतर " येतों–मी—संभाळा " असें सद्गदित कंठानें सांगून व आमच्या आनंदाचा तात्पुरता भंग करून मामा मोठ्या कष्टानें निघून गेले.

---

## प्रकरण नववें.

माझ्या लग्नाची हकीकत मागील भागांत दिलीच; परंतु ती अगदीं तांत्रिक दिली म्हणून वाचकवर्ग माझ्यावर खप्पा होईल. त्यांना तसें होण्याचें कारणही आहे; परंतु माझ्या मतें मीं तीं देतांना फारसें कांहींच सोडलें नाहीं. कारण लग्नांतला मुख्य म्हणजे शास्त्रोक्त भाग जर बाजूला केला तर बाकीच्या भागांत म्हणजे निवळ स्त्रियांच्या हौसेचे प्रकार असतात. आणि माझ्या लग्नांत तर स्त्रियांचा मुळीं अभावच. कारण वधुपक्ष व वरपक्ष ह्यांकडे बायकांचा अगदींच तोटवडा. ज्या कांहीं होत्या त्या शिकल्या सवरलेल्या व अलीकडल्या मताच्या असल्यामुळें, पायघड्या, पदराला गांठी मारून नांवें घेणें, परस्परांचे ओंठ चावले जातील अशा रीतीनें लवंगांच्या विड्या तोडवणें, त्याचप्रमाणें विहिणीचें आंबोण वगैरे फाजील थट्टेच्या प्रकाराला अगदींच फांटा देण्यांत आला होता. अर्थात् बाकी राहिलेली शुष्क हकीकत अगदीं तांत्रिक आली ! असो.

मालतीचें प्रथम दर्शन झाल्यापासून तिच्या संबंधानें आशा व निराशा ह्यांची जी एकसारखी इतके दिवस परंपरा चालली होती तींतून अगदीं अकल्पित पार पडून अखेर मालती माझी झाली, ह्या आनंदांत व तिला

क्षणभरसुद्धां दुःख होऊं नये व तिला कशाचीही वाण भासूं नये, अशी तजवीज करण्यांत माझे कांहीं दिवस जातात तोंच आनंदाची दुसरी लाट आली. आतां ती काय होती, ते मीं प्रत्यक्ष सांगण्यापेक्षां इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, आह्मीं उभयतांही वयानें प्रौढ असल्यामुळें मालतीची आवडनिवड आतां मला तिला प्रत्यक्ष विचारतां येईल असाच योग घडून आला व तोही सोहळा फार थाटानें साजरा झाला.

ह्या नंतरचे माझे दिवस ह्मणजे मालतीच्या समागमसुखांत कसे हांहां म्हणतां जात होते! आज काय अमुक आणलें, उद्यां अमुक खरेदी केली, परवां शालूच घेतला असें रोज चाललें होतें. तात्पर्य, ज्या ज्या वस्तूंच्या योगानें म्हणून मालतीचें मन सुप्रसन्न राहील असें मला वाटे. ती ती वस्तू हजर होत होती. परंतु अद्याप मला दुर्दैवानें सोडलें नव्हतें! इतकेंच नव्हे तर माझ्या दैवदुर्विपाकाच्या अजब खेळांना इथूनच खरी सुरुवात व्हावयाची होती. कारण अलीकडे माझ्या प्रियेमध्यें मला एक विलक्षण फरक दिसूं लागला! मी प्रणयाचा भुकेलेला—अर्थात् तिच्याकडून मला योग्य मोबदला मिळावा एतदर्थ तिनें न सांगतां सुद्धां मीं तिच्या हौसेचा असा एकही जिन्नस कमी ठेवला नव्हता! स्वतः मी तर तिचा निवळ दास बनलों होतों; पण तिची मात्र वागणूक अगदींच चमत्कारिक दिसून येई. तिचें माझ्यावर प्रेम नव्हतें अशांतला भाग नव्हता. परंतु मला खेद होण्यासारखी मुख्य गोष्ट हीच कीं, ती विशेष बोलत नसे. एकांतांतही माझ्याशीं मन मोकळें करून प्रेमानें बोलावयास तिनें कां लाजावें ह्मणून मला पहिल्यानें थोडेंसें वाईट वाटलें. पण ती आपल्या मामाला सोडून एकदम आली व तिला ह्याठिकाणीं तिचें असें कोणी दिसत नसेल आणि ह्मणूनच तिला हा क्षणिक उदासपणा

आला असेल, अगर तिची अद्याप भीड चेपली नसेल ह्मणून ती फारसें बोलत नसेल ह्या कल्पनांवर मी तिकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं !

परंतु पुढें थोड्याच दिवसांत हा माझा भ्रम पार नाहींसा झाला ! ह्या माझ्या कल्पना निव्वळ वेडगळ ठरल्या. मालतीची ही वरील स्थिति इतकी वाढत चालली कीं, पुढें पुढें तर ती मुळींच बोलेनाशी झाली. माझ्यासंबंधानें तिचा आदर व पूज्यभाव यत्किंचितही कमी झाला नव्हता. परंतु माझ्याशीं भाषण करावयाचें म्हणजे तिच्या जिवावर येऊं लागलें. कोणत्याही गोष्टीसंबंधानें तिला जेव्हां परोपरीनें विचारून विचारून कंटाळावें तेव्हां कुठें ती एकदां " हं " ह्मणे. एकदां दोनदां विचारलेलें तर तिच्या मुळीं खिजगणतींतही नसे. जसुं कांहीं तिला ऐकूंच येत नव्हतें. जेवणाची वेळ झाली तरी कोणी तिला बोलवावयास आल्या-शिवाय आपण होऊन म्हणून उठून जाण्याची अगर कांहीं पाहिजे असल्याची ती कधींही इच्छा दर्शवीत नसे. सारांश, एक दोन महिन्यांत मालती म्हणजे भाषारहित, चलनवलनयुक्त असा एक हाडामासांचा पुतळा बनला.

हा काय प्रकार ! त्या दुटाकीवरील घरांत व त्याचप्रमाणें माझ्याशीं तिचा विवाह झाल्यानंतर कांहीं दिवसपर्यंत खुद्द माझ्या घरांत, आपल्या मधुर भाषणानें अमृताचा वर्षाव करणारी तीच ही मालती ! मग माझ्या व तिच्या भाषणाचा शास्त्रोक्त योग घडून आल्या दिवसापासून माझ्याशीं तिचें वर्तन असें कां ? माझ्या हातून तिचें कांहीं कमी पडलें व ह्मणून असें झालें म्हणावें तर—चेहरा ह्मणजे मनाचा आरसा—पण त्यावरही कांहीं तसा परिणाम दिसेना ! मग हिला झालें तरी काय ? वाचकहो, तिची ही अशी स्थिति पाहून मी तर अगदीं गोंधळून गेलों.

ही कांहीं व्याधिग्रस्त आहे, अगर हिला पिशाच्चबाधा आहे, कीं कांहीं मानसिक उपाधी आहे ह्याचा मला कांहींच उलगडा होईना ! मी तर अगदीं मूढ बनलों ! माझ्या प्रेमाचा मोबदला मला मिळेना ह्मणून मी रागावलों, गांजलों, ओरडलों, सर्व कांहीं केलें; परंतु तिच्या चेहऱ्यावर यापैकीं कशाचाही परिणाम झाला नाहीं. मग उत्तराचें तर नांवच नको ! हें पाहून, खरोखर सुंदर पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट पुढें घेऊन आतां त्याचा आस्वाद घेणार तोंच जसें तें अजिबात ओढून न्यावें तद्वत् माझी स्थिति झाली !

असा हा चमत्कारिक फरक दृष्टी पडतांच काशी घाबरून गेली. तिनें कितीतरी देवांना नवस केले, सत्यनारायण बोलली, अंगारे आणून लावूं लागली, गंडे बांधले, सर्व कांहीं केलें; परंतु मालतीला ह्यापैकीं एकाचाही गूण आला नाहीं. हा कांहीं विकार म्हणावा तर तिचें जेवण-खाण सुद्धां अगदीं हटलें होतें. पण तिच्या शरीरप्रकृतींत मात्र एका काडीचाही फरक झाला नव्हता ! अगर तिच्या सौंदर्याची टवटवी एक रतिमात्रही कमी झाली नव्हती ! वेड म्हणावें तर वेडेपणाचे चार तिच्या हातून बिलकुल होत नसत. भाषा तर तिनें अजिबात सोडलीच होती. इतकेंच नव्हे, तर ती एकाजागीं एकाद्या वस्तूकडे पहात बसली म्हणजे सहा सहा तास उठत नसे. व तिची दृष्टी त्या वस्तूवरून हलत नसे. हें खरोखरीच आश्चर्य नव्हे काय ?

शेवटीं अगदीं कंटाळून जाऊन मीं तिला चांगल्या चांगल्या डाक्तरांना दाखविलें. पण ते तरी काय करणार ? औषध म्हणून कांहींतरी पाणी बाटलींत भरून देत असत व मी तें तिला पाजीत असे. ह्या पलीकडे गुणाच्या नांवानें आंवळ्या एवढें ! ह्याप्रमाणें डाक्तरी

इलाजही आटपले. आतां पुढें काय करावें असा विचार करून एकदां पुष्कळशा विद्वान डॉक्टरांची सभा भरविली. कुणाचीं कांहीं तर कुणाचीं कांहीं अशीं त्यांच्यांत अनेक मतें पडलीं. अखेरीस सर्वानुमतें असें ठरलें कीं, हिला कांहींतरी जबर धक्का बसला असावा व त्यामुळेंच तिची ही वृत्ती अशी एकदम बदलली असावी !

काय, मालतीला जबर धक्का बसला असावा ! आणि तो कशाचा? निदान माझ्याशीं तिचा विवाह झाल्या दिवसापासून तरी तिला एका काडीचेंही दुःख झालें नव्हतें अशी माझी खात्री होती ! बरें, पूर्वी कांहीं झालें असेल म्हणावें तर त्या कामाठीपुऱ्यांतल्या त्या भिकारड्या खोलींत रहात असतांना तसें कांहींच झाल्याचें दिसत नव्हतें. मग हिच्या मनाला धक्का बसला केव्हां व तो कशाचा ? माझ्याशीं तिचा विवाह झाला–तोच तिला संमत नव्हता कीं काय ? आणि त्याचाच तिला धक्का बसला कीं काय ? किंवा मालतीच्या प्रेमाचा ओघ अगोदरच दुसऱ्या दिशेनें वहात असतांना तिच्या मामांनीं केवळ माझ्या थाटमाटाकडे पाहून तिच्या इच्छेविरुद्ध तो माझ्याकडे वळवला असेल काय ? अरेरे ! अशी जर वस्तुस्थिति असेल तर मग ह्या विवाहापासून मला काय सुख होणार होतें ? नको नको ते विचार ! त्यांनीं तर मी अगदीं वेडा पिसा बनलों. मला प्रत्येक वस्तूची चीड येऊं लागली व मी घराच्या बाहेर पडेनासा झालों. माझे स्नेही 'आतां तो कशाला बाहेर पडेल ? नव्या तरण्या सुंदर बायकोच्या विलासांत अगदीं गर्क होऊन आम्हांला साफ विसरला !' अशा अनेक चेष्टाप्रचुर वाग्बाणांनीं मला टोंचीत. पण हाय ! माझ्या हृद्रोगाची त्यांपैकीं एकाला तरी खरी कल्पना होती काय ?

असो, मालतीची ही स्थिति लक्षांत घेऊन व अनेक डॉक्टरांच्या नानाप्रकारच्या उपायांनीं तिला यत्किंचितही गुण येत नाहीं असें पाहून मी तर अगदीं निराश झालों. तथापि तिची साफ आशा कशी सुटावी? कारण जरी तिच्यासंबंधानें माझ्या मनांत नाहीं नाहीं त्या कल्पना येत व त्यामुळें मला तिचा तिटकारा येई तरी तिच्या त्या सुंदर मुख-कमलाकडे एकवार पाहतांच माझा सर्व राग व तिरस्कार पार नाहींसा होऊन उलट तिची कींव येऊं लागे. अखेर ज्या डॉक्टरांनीं तिच्या प्रकृतीचें हें वरील निदान केलें होतें त्यांनाच ह्यावर कांहीं इलाज सुच-विण्याची मीं विनंति केली. ते तरी काय सांगणार? कारण ही कांहीं शारीरिक व्याधि नव्हती! अर्थात् ह्याला उत्तम उपाय म्हणजे एकांत-वास! दूर एकीकडे ज्याठिकाणीं हवापाणी स्वच्छ असून शांतता असेल अशा ठिकाणीं कांहीं दिवस राहिल्यानें मनाला तेवढाच विसर पडून हा रोग साफ जरी नाहीं तरी बराच कमी होण्याचा संभव असतो, असें त्यांनीं सांगितलें. मला हा उपाय जरा सयुक्तिक वाटला म्हणून मी लागलींच दुसऱ्या दिवशीं मुंबईपासून जवळच समुद्रकांठीं एक लहानसा बंगला घेऊन त्याठिकाणीं मालतीची रहाण्याची सोय केली.

बंगला सुंदर, हवा समुद्रकांठची, मंडळीही बेताची, अशी सर्व सोय असतांना तिच्या जिवाला किंचित् तरी आराम वाटेल अशी मला फार आशा होती; परंतु ह्या ठिकाणीं चार महिने गेले तरी सुद्धां जेव्हां तिच्या प्रकृतींत काडीमात्र फरक दिसेना तेव्हां आतां पुढें काय करावें हें मला कांहींच सुचेना! ह्यावेळीं मात्र त्या थेरडीचें तें "तुम्हीं हा नाद सोडून द्या!" हें वाक्य मला चांगलेंच आठवूं लागलें. हें असें कांहीं तरी होणार हें तिला खात्रीनें माहीत असलें

पाहिजे व ह्मणूनच तिनें मला हा इषारा दिला असला पाहिजे ! पण ती बाई सुद्धां मोठी जहांबाज असली पाहिजे. कारण मजकडून पांचशें रुपयांचा ऐवज तिच्या हातीं पडतांच हें महाभयंकर गूढ मला सांगावें असें तिला वाटून त्याच्या प्रस्तावनेदाखल म्हणून तिनें हें वरील वाक्य उच्चारलें न उच्चारलें तोंच तिची बुद्धी पालटली व तिनें पुढें कांहींच सांगितलें नाहीं ! तसाच तो थेरडा डॉ० शांताराम ! "मालती आहे तशी तुझांस कबूल आहेना ?" असें त्यानें मला दोन वेळां विचारलें; परंतु किती मी मूर्ख, मला ह्यासंबंधानें एवढीशी सुद्धां शंका आली नाहीं ! लग्नाला मी अगदीं आतुर झालेला व मालतीच्या प्रेमपाशांत गुरफटलेला पाहून त्या उभयतांनीचांनीं माझा चांगलाच गळा कापला. आतां मला ह्या गडबडीच्या लग्नाचे परिणाम चांगलेच भोंवूं लागले. पण उपाय काय ? ही स्थिति कोणाजवळही बोलावयाची सुद्धां चोरी होती !

अहाहा ! ह्यावेळीं जर ती मावशी भेटती तर तिच्याकडून मात्र कांहीं जबर सुवर्णप्रयोगाच्या जोरावर ह्याचा खुलासा करून घेतां आला असता ! परंतु तिचें मला नुसतें नांवसुद्धां माहीत नव्हतें; मग पत्त्याची गोष्ट तर बाजूलाच राहिली. कदाचित् डॉ० शांतारामापासून सुद्धां हें काय आहे हें समजलें असतें; परंतु त्यांचेंही मला पुरतें नांव माहीत नव्हतें व ते गेल्यापासून मला त्यांचा कांहींच समाचार समजला नव्हता ! मालतीचीं नातलग माणसें म्हणजे काय तीं हीं दोघेंच. ह्यांच्याचपासून कांहींतरी माहिती मिळण्याचा संभव होता आणि त्यांची तर मला ही इतपत माहिती ! बरें, मालतीकडून ह्यांचा कांहीं पत्ता मिळेल ह्मणावें तर तिची ही अशी स्थिति ! तिला पंचवीस वेळ हाक मारावी

तेव्हां ती एकदां " हूं " करणार ! भाषेचें नांवच नको ! तात्पर्य, सर्व तऱ्हेनें माझा निरुपाय होता. केवढा मी मूर्ख, जिला मीं फक्त एकवार ओझरती पाहिली, तिचें पुरतें नांव, गांव वगैरे कांहींएक तपास न करतां केवळ तिच्या सौंदर्यावर भुलून जन्मभर दुःखांत पडण्याचा हा मार्ग माझा मीच करून घेतला !

वास्तविक पाहतां ह्या प्रसंगानें एकाद्या मनुष्याची कंबर साफ खचून जाऊन तो अगदीं वेडा बनता. मी ह्मणजे ह्या स्वभावाला अपवाद होतों असें नाहीं; परंतु अशा प्रसंगांत सुद्धां माझा दुराग्रही स्वभाव मला सहाय होताच ! मावशी नाहीं तर नाहीं पण निदान त्या डॉक्टर शांतारामला तरी आपण गाठूं व त्याकडून ह्याचा खुलासा करवून घेऊं, अशी मला जबर आशा वाटत होती. बाकी ही अगदीं निरर्थकच होती ह्मणा ! कारण कलकत्त्यासारख्या अफाट शहरांत डॉ० शांतारामचा शोध तरी कुठें करावा ! पण डॉ० शांतारामचा पत्ता लावणें हा एकच शेवटचा उपाय होता व तोही एकदां करून पहाण्याचा माझा निश्चय ठरला !

हा माझा बेत काशी, सुंदरराव वगैरे मंडळींना अर्थातच पसंत पडला नाहीं. त्यांनीं " वसंतराव, वेडा तर नाहींस तूं ! तुला त्याचा कांहीं तरी पत्ता माहीत आहे काय ? बस्स झाले ते तुझे उपाय ! एक झालें तें निस्तरतो आहेस आणि त्यांत तूंही जा कुठें तरी ह्मणजे चांगलें ! " वगैरे उपदेशांनीं मला ह्या माझ्या निश्चयापासून परावृत्त करण्याची पुष्कळ खटपट केली; परंतु माझा बेत कायम होता. काशीकडे मालतीची व्यवस्था सोंपवून व तिच्यावर सक्त नजर ठेवण्यास सुंदररावाला बजावून मीं त्याच दिवशीं रात्रीं कलकत्ता मेल गांठली !

## प्रकरण दहावें.

ह्यापूर्वींसुद्धां मी कलकत्त्यास एक वेळ आलों होतों; परंतु त्या वेळचा तो उल्हास कोणीकडे व आतांची खेदजनक स्थिति कोणीकडे ! अमुक पाहूं, अमुक खरेदी करूं वगैरे आनंदाच्या प्रसंगांनीं संस्मरणीय झालेला तो पहिला प्रवास कोणीकडे, नाहींतर हा आतांचा ! ह्यावेळीं मला एकच गोष्ट कर्तव्य होती. त्या व्यतिरिक्त मला सर्व कलकत्ता शहर शून्य होतें.

बिऱ्हाडाची सोय वगैरे लावून भोजनोत्तर मी माझ्या उद्योगाला लागलों. आज हा रस्ता, उद्या तो रस्ता ह्याप्रमाणें सर्व कलकत्ता शहर पालथें घातलें. आशा ही होती कीं, कुठें तरी डॉ. शांतारामाच्या नांवची पाटी दिसेल; परंतु हे माझे प्रयत्न सर्व निष्फळ झाले. नंतर डॉक्टरीचा धंदा करणाऱ्या पुष्कळशा लोकांजवळ त्याजबद्दल तपास केला; परंतु त्या धंद्यांत या नांवाचा कोणी इसम आपणास जोडीदार असल्याचें आपणास माहीत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. शेवटीं थॅकर कंपनीची डायरेक्टरी घेऊन त्यांत डॉ. शांतारामाचें नांव पाहिलें. परंतु त्यांत कांहींच पत्ता लागेना. तेव्हां मात्र निरुपाय झाला व त्या मावशीसारखा हा थेरडाही दुष्ट असावा असें मला वाटूं लागलें. त्याचें नांव जर खरोखरीच शांताराम असतें व तो जर खरोखरच धंद्यांत डाक्टर असता तर त्याचें नांव ह्या डायरेक्टरींत असलें पाहिजेच होतें. तेव्हां एक तर त्यानें आपलें नांव बदललें असलें पाहिजे किंवा तो ह्या गांवीं नेहमींचा रहाणारा तरी नसला पाहिजे, अशी मला शंका येऊं लागली. त्याची मुंबईस पहिल्यानें भेट झाल्यापासून

शेवटीं माझ्या लग्नाच्या दिवशीं तो निघून जाईपर्यंत होत असलेल्या त्याच्या एकंदर वर्तनाचा मी नीट विचार करूं लागलों तों माझा पहिला म्हणजे त्यानें नांव बदललें असावें हाच तर्क जास्त जास्त दृढ होत चालला !

ह्याप्रमाणें मालतीच्या संबंधानें उलगडा होण्याची आशा तर संप- लीच होती. अर्थात् आतां आपलें कलकत्त्यांत कांहीं काम उरलें नाहीं असें समजून रात्रीच्या गाडीनें परत मुंबईस येण्याचें मीं ठरविलें. इतक्या दूर येऊनही आशेचा हा असा भंग झाल्याच्या योगानें मनाची स्थिति द्विधा झाली व मुळींच चैन पडेना.

संध्याकाळीं कांहीं करमेना व तो वार अनायासें शुक्रवार असल्यानें सहज एकवार एडन गार्डनमध्यें तरी जाऊन यावें अशा उद्देशानें मी त्या बाजूला वळलों. तेथील फुलझाडांच्या शोभेनें, तसेंच इंग्रजी बँडच्या मधुर आला- पांनीं माझ्या खिन्न मनाला बरीच शांतता आली. शेवटीं आठ वाजण्याचा सुमार झाला. आतां गाडी चुकेल ह्या भीतीनें मी गडबडीनें घराकडे वळलों. ह्यावेळेस सुद्धां मी हायकोर्टवरूनच जात होतों व त्या कोपऱ्यावरूनच माझ्या बिऱ्हाडाकडे जाण्याचा रस्ता होता. ह्या कोपऱ्यावर येतांच मालतीच्या प्रथम दर्शनाची ती जागा पाहून माझ्या विचारांनीं पुनः उचल खाल्ली व जणुं कांहीं सर्व प्रकार ह्याचवेळीं डोळ्यासमोर घडत आहे कीं काय असें वाटून गोंधळून मी एक क्षणमात्र तेथेंच उभा राहिलों. पण हा सारा भ्रम आहे अशी खात्री झाल्यानें, अगदीं निराश होऊन, असा आतां घराकडे वळणार तों काय चमत्कार पहा, एक व्यक्ति माझ्या जवळून जातांना सहज माझी नजर तिकडे गेली. ह्यावेळीं त्या व्यक्तीनें वेषांतर केलें होतें. तरी पण मी तिला चांगलीच ओळखली. वाचकहो, ही

व्यक्ती म्हणजे मालतीच्या प्रथम दर्शनाचें वेळीं ज्याचें माझ्याशीं भांडण झालें होतें तोच हा गृहस्थ होता.

ह्याला पहातांच मालतीच्या संबंधाचा कांहीं खुलासा, निदान डाक्टरांचा पत्ता तरी ह्याजपासून खात्रीनें मिळेल अशी मला साहजिक आशा आली व मागें फिरून त्याच्या मागोमाग जाऊन " नमस्कार हो ! " म्हणून मीं त्याला हटकलें. महाराष्ट्रभाषेचा हा कलकत्त्यांत आलेला अकल्पित योग पाहून किंवा कांहीं अन्य कारणानें असेल—पण तो माझे हे शब्द ऐकून चपापला व मागें वळून " कोण आहे तें ? मलाच का हांक मारलीत आपण ? " असें विचारून उभा राहिला.

" हो ! मींच तुह्माला हाक मारली ती ! माझा तुमचा विशेष परिचय नाहीं खरा, तथापि मला वाटतें मीं तुह्माला चांगलें ओळखतों ! माझी ओळख आपण विसरणें मात्र साहजिक आहे. " असें मीं जरा हंसून उत्तर देतांच तो " आं ! कोण बुवा ! " असें ह्मणत चांगल्या उजेडांत आला व माझ्याकडे नीट पाहून किंचित् हंसून म्हणतो, " अस्सें अस्सें ! आतां ओळखलें. तुमची आमची ह्या इथेंच मागें एकदां गांठ पडली होती नव्हे ? "

" हो ! हो ! अगदीं बरोबर ! या, इथेंच जरा क्षणभर बसूं या. " असें ह्मणून मी जवळच्या दुकानाच्या पायऱ्यांकडे वळलों तसा तोही माझ्या मागून आला व आह्मीं पायऱ्यांवर बसलों. लागलींच त्यानें खिशांतून एक बिडी काढली व पेटवून धूर सोडीत सोडीत मला ह्मणतो, " पण कांहो ! तुह्मीं हिकडे कोणीकडे ? "

" सहज कांहीं काम होतें म्हणून आलों होतों. पण तें जमेना

ह्मणून हा आत्तांच्या गाडीनें जाणारही होतों. परंतु आतां अनायासें तुमची गांठ पडल्यानें माझें तें काम खात्रीनें होईल असें वाटतें ? ”

“ आं ! माझ्या हातून होईल असें वाटतें ? मोठेंच आश्चर्य बुवा ? असें काय आहे तें ? बोला तरी ! ”

“ काम इतकेंच कीं, डॉ० शांतारामांची मला भेट घ्यावयाची होती व त्याकरतांच मी इतक्या दूर आलों होतों. आज आठ दिवस झाले मी सारखा तपास करतों आहें; शेवटीं शोध लागेना म्हणून कंटाळून आज परतही जाणार होतों. परंतु आतां आपली भेट झाली, तेव्हां म्हटलें त्यांचा पत्ता मला तुमच्याजवळ मिळेल. ”

मी हें इतकें बोलत होतों परंतु त्याकडे त्याचें विशेषसें लक्ष नव्हतें असें मला वाटतें. कारण डॉ० शांताराम हें नांव माझ्या तोंडून निघतांच तो अगदीं कावराबावरा होऊन मजकडे पाहूं लागला. तो मोठा बिलंदर असावा. कारण हा फरक माझ्या नजरेस येतो न येतो तोंच चेहेऱ्याची सफाई करून तो मला म्हणतो—

“ अस्सं काय ? पण काहो, डाक्टरसाहेबांकडे असें काय तुमचें काम आहे बुवा ? ”

“ मला त्यांना मालतीबद्दल कांहीं विचारावयाचें आहे. ”

“ आं ! ह्मणजे मला तुम्ही जास्तच गूढांत ढकलतां अहांत ! तिच्याबद्दल काय विचारणार तुम्हीं ! पण आधीं तसें विचारण्याला तुमचा संबंध तरी काय पोंचतो ? ”

“ म्हणजे, तुम्हाला माहींतच नाहीं एकूण तर ! अहो, डॉक्टरसाहेब आतां माझे मामेसासरे झाले आहेत. ”

ह्यावेळेस मात्र त्याच्या चेहेऱ्यांत कांहीं विलक्षण फरक दृष्टीस

पडला. त्यांत आश्चर्य तर होतेंच पण रागही बराच होता. माझें वरील वाक्य पुरतें संपलें सुद्धां नाहीं तोंच तो एकदम ताडकन् उठून उभा राहिला व ह्मणाला, " ह्मणजे ! म्हणतां तरी काय तुह्मी ? मालतीचें व तुमचें लग्न तर झालें नाहींना ? "

मालतीचा विवाह माझ्याशीं झाला ह्यांत ह्याचें काय नुकसान झालें ? निदान इतकें आश्चर्य वाटण्यासारखें तरी त्यांत काय होतें, हें मला कांहींच समजेना; ह्मणून मींही उत्तर दिलें, " कां बरें ? त्यांत तुह्माला एवढें गौण तें काय वाटलें ? मालतीला मीं योग्य नाहीं असें का तुह्मीं म्हणता ? "

त्याचा राग तर मुळींच कमी झाला नव्हता; परंतु मनोवृत्तींचा जोर मनांतल्या मनांत दाबून तो खालीं बसला व किंचित् हंसून म्हणतो, " नाहींहो; तसें नाहीं मी म्हणत. पण—"

मला आलेला संशय खरा कीं, खोटा ह्याचा निकाल करून घ्यायचा होता म्हणून मींही मध्येंच त्याला विचारलें, " पण काय ? आणि असें संदिग्ध बोलून थांबतां कां ? "

" ह्मणजे इतकेंच कीं, तुमचें व मालतीचें लग्न झालें ही गोष्ट जर खरी धरली तर मी प्रत्यक्ष तिचा भाऊ असून मला हें कसें कळलें नाहीं ? "

हा मालतीचा भाऊ असून कळलें नाहीं ह्मणतो ह्यावर माझा तर विश्वास बसेना ! कारण अशी गोष्ट संभवेल कशी ? माझ्या मनांत त्याला चांगला आडवा तिडवा तपासावा असें आलें होतें. परंतु आतांपर्यंतच्या त्याच्या वर्तनावरून तो माझा प्रयत्न साफ निष्फळ झाला असता अशी माझी खात्री झाली. ह्मणून मींही आपले विकार दाबून त्याला

म्हटलें, " वा ! वा ! तर मग फारच चांगलें झालें ! तुम्ही प्रत्यक्ष तिचे बंधूच म्हणतां ? आतां माझें काम तुम्हीसुद्धां करूं शकाल ! "

" बोला, काय तुमचें काम आहे तें ? "

" काम हेंच कीं, मालतीचा व माझा विवाह झाला हें जें मीं तुम्हाला सांगितलें तें अगदीं खरें आहे. आतां मालतीसारख्या अनुपम रत्नाचा लाभ झाल्यानंतर वास्तविक पहातां मी अत्यंत सुखांत असावयास पाहिजे होतों व अर्थात् तुम्हीं पहिल्यानें म्हटल्याप्रमाणें माझा हिकडे येण्याचा संभवही नव्हता. परंतु— "

" कां ? परंतु कां ? तुमचें व तिचें इतक्यांत बिनसलें कीं काय ? "

" नाहीं हो ! तसें कांहीं नाहीं ! उलट तसें झालें असतें तरीही एकपरीं मी त्यांत सुखच मानिलें असतें. कारण त्यानें ती तरी सुखांत राहिली असती ! "

" मग ? आतां तिला काय झालें आहे ? ती आजारी तर नाहीं ? "

" नाहीं. पण नाहीं तरी कसें ह्मणूं ? तिला असा कांहीं विकार झाला आहे कीं, तो काय आहे ह्याचें मला वर्णनच करतां येत नाहीं. ती आजारी म्हटली तर आजारी आहे, आणि नाहीं म्हटली तर नाहींही ! "

" ह्मणजे, हें मोठेंच आश्चर्य म्हणावयाचें ! "

" अहो, आश्चर्य ह्मणून काय विचारतां ? अन्नपाणी तर तिचें जवळ जवळ सुटलेंच आहे; पण आजारीपणाचा अगर अशक्ततेचा लवलेशसुद्धां तिच्या प्रकृतीवरून दिसत नाहीं ! जें कांहीं बिघडलें आहे तें हेंच कीं, तिची भाषा अजिबात जात चालली आहे. " इं " आणि " अंहं " ह्या शिवाय ती एक शब्दही उच्चारीत नाहीं व

आतां पाहिलेलें मनुष्य तिला एका तासानेंही ओळखत नाहींसें झालें आहे. तेव्हां तुम्हीच सांगा ह्या विकाराला कोणता आजार ह्मणावा ?"

ह्या वेळेस तो पुनः थोडासा रागावला व ह्मणाला, "मला वाटलेंच होतें असें कांहीं तरी होईल ह्मणून !"

मला जास्त आशा लागली ह्मणून मीं म्हटलें, "काय ? हें असें होणार असें तुम्हाला वाटलेंच होतें ? तर मग हें काय आहे व त्याचें कारण काय हेंही तुम्हाला माहीत असलेंच पाहिजे !"

तो कांहीं तरी समर्पक उत्तर देईल म्हणून मी किती आशाभूत मुद्रेनें त्याच्याकडे पहात होतों; परंतु तो कसला लुच्चा ! त्यानें अगदीं शांतपणानें उत्तर दिलें, "मोठी दिलगिरीची गोष्ट आहे कीं, मला ह्यांतलें कांहींसुद्धां माहीत नाहीं; परंतु एवढें मात्र खरें कीं, त्या थेरड्यानें तुम्हाला साफ फसवलें !"

ह्या उडवाउडवीवरून त्याला खात्रीनें कांहीं तरी माहीत असलेंच पाहिजे होतें. तें तो सांगत नाहीं हें पाहून माझा तर अगदीं भडका झाला. परंतु करायचें काय ? सोईसोईनें कांहीं निघाल्यास पहावें म्हणून मीं त्याला पुनः ह्मटलें, "छे, छे, असें कां बरें म्हणतां ? अहो, मालतीच्या ह्या स्थितीनें माझी कशी कालवाकालव झाली आहे ह्याची जर तुह्माला यत्किंचितही कल्पना असती तर तुम्ही असें ह्मणतांना ! नका हो ! मला असें अगदींच निराश करूं नका ! तुम्हाला जर कांहीं माहीत असेल तर सांगून मला एकदांचा ह्या काळजींतून मुक्त करा !"

परंतु ह्या विनवणीचा कांहींही उपयोग झाला नाहीं. त्यानें "नाहीं हो, मला खरोखरीच कांहीं माहीत नाहीं व असलेंच तरी तें मी ह्यावेळीं तरी तुम्हाला सांगूं इच्छित नाहीं." एवढेंच उत्तर दिलें.

माझा प्रश्न त्यावर होताच. " तर मग तुह्मी सांगाल तरी कधीं ? "

" आधीं त्या नीच थेरड्याची गांठ घ्या, तो काय सांगतो तें पहा आणि तेवढ्यानें तुमचें समाधान झालें नाहीं तर मग मी आहेंच ! "

" पण त्यांची गांठ कुठें पडणार ? " असें मीं अगदीं निकरावर येऊन विचारलें.

" ते हल्लीं इथें नाहींत. बाहेर गांवीं गेले आहेत. आणखी दोन दिवसांनीं येतील. "

" बरें, मी तोंपर्यंत थांबलों तर तेव्हां तरी त्यांची गांठ कुठें पडणार ? त्यांचा पत्ता ? "

" हां ! तेवढें मात्र मी करीन ! ते येतांच त्यांची व तुमची मी जरूर गांठ घालून देईन. " असें ह्मणून त्यानें घड्याळ काढून पाहिलें व " अरे बापरे, फार वेळ झाला, बोलण्याच्या नादांत कांहींच समजलें नाहीं ! " असें ह्मणून तो उठला. अर्थात् मींही उठलों व " पण हें तरी खात्रीनें कराल ना ? " असें म्हणून त्याच्याबरोबर चालूं लागलों. जातां जातां मीं त्याचें नांव व पत्ता विचारला पण त्यानें तो न सांगतां माझा मात्र विचारून घेतला व " अगदीं खात्रीनें ! तुह्मी बेफिकीर असा. आतां मी जातों. नमस्कार. " गडबडीनें इतकें ह्मणून तो जात असलेल्या एका ट्रॅममध्यें बसून चालता झाला !

ह्यावर मी तरी जास्त काय करणार होतों ! झालेल्या प्रकाराबद्दल विचार करीत मलाही मुकाट्यानें मंद पावलांनीं घर गाठावें लागलें.

असो; त्या दिवशीं तर गाडी चुकल्यामुळें मुक्काम करावाच लागला; परंतु पुढचा विचार काय ? त्या गृहस्थानें दोन दिवसांनीं डॉ० शांताराम

भेटतील म्हणून सांगितलें. अर्थात् त्या भाषणावर विश्वास ठेवून दोन दिवस रहावें किंवा कसें हा मोठा प्रश्न येऊन पडला. कारण दोन दिवस ह्मणजे जरीं कांहीं विशेषशी बाब नव्हती, तरी पण त्यानंतर तरी माझ्या कामाचा काय निकाल लागणार होता हें मला उघड उघड दिसतच होतें. हा गृहस्थ ह्मणजे प्रत्यक्ष तिचा आपण भाऊ म्हणवतो. यावर जर विश्वास ठेवला तर मालतीचा माझा विवाह झाला हें याला कळूं सुद्धां नये काय? नसेल कदाचित् कळलें असें धरून चाललें तरी पण ह्यानें डॉक्टरची ह्मणजे आपल्या मामाची थेरडा, म्हातारडा वगैरे शब्दांनीं निंदा करण्याचें कारण काय असावें? ह्याचा मला कांहींच उलगडा होईना. शिवाय मालतीचें लग्न माझ्याशीं झालें हें ऐकतांच त्याला जो एवढा राग आला तो काय ह्मणून? खरोखर हें कांहीं तरी एक मोठें गूढ असलें पाहिजे व त्या कामांत डॉ. शांताराम हा गृहस्थ व फार काय मालतीसुद्धां, तशीच ती थेरडी मावशीसुद्धां सामील असलीं पाहिजेत व आतां एकदां मालतीची कशी तरी व्यवस्था लावल्यानंतर मला आपापल्या-परीं निव्वळ फसवीत असलीं पाहिजेत; अशीही माझी पुरी खात्री झाली. अर्थात् कुणाचा कुणाशीं कांहींच मेळ बसेना हें पाहून मी तर अगदीं गोंधळून गेलों. अशा या स्थितींत आणखी दिवस गमावून निराशेची परमावधी करून घेण्यापेक्षां घरीं निघून जावें असा सुद्धां माझा एकदां बेत ठरला. परंतु म्हटलें जाऊं द्या, एकदां काय सोक्षमोक्ष होतो तो होऊन जाऊं द्या! इतके गेले तसे आणखी दोन दिवस! शेवट काय होणार तें दिसतच आहे! असा विचार करून ते दोन दिवस काढण्याचें कायम केलें.

ह्या दोन दिवसांत कांहीं विशेष घडून आलें नाहीं. तिसऱ्या

दिवशीं मात्र दोन प्रहरीं त्या मनुष्याच्या भाषेंत कांहीं तरी सत्यपणा असल्याचें दिसूं लागलें. सुमारें दोन वाजतां एक गाडी माझ्या दरवाजाशीं येऊन उभी राहिली व एका मनुष्यानें तींतून उतरून एक पत्र माझ्या हातीं आणून दिलें. त्यांत " माझ्या भेटीकरतां तुम्ही आला आहांत असें ऐकून ही गाडी मुद्दाम पाठविली आहे. तरी ताबडतोब येण्याचें करावें. " असा डॉक्टरांनीं स्वदस्तुरनें मजकूर लिहिला होता. मी वाटच पहात होतों म्हणाना, म्हणून ताबडतोब कपडे करून गाडींत बसलों व गाडी चालूं लागली.

बऱ्याच गल्ल्या ओलांडून सुमारें अर्ध्यातासानें गाडी एका तिमजली घराजवळ येऊन उभी राहिली व कोचमनानें येऊन दरवाजा उघडतांच गाडींतून उतरून मी त्याबरोबर जिना चढूं लागलों. दोन जिने चढल्यावर एका दरवाजाजवळ येऊन तो मनुष्य " ह्या दरवाजाच्या आंतल्या दिवाणखान्यांत डॉक्टरसाहेब आपली वाट पहात बसले आहेत. दरवाजा उघडाच आहे. " एवढें सांगून खालीं चालता झाला.

अशा रीतीनें परक्या ठिकाणीं एकदम जावें कीं न जावें ह्याबद्दल एकदां मला शंका आली; परंतु माझा पक्का निश्चय झाला असल्यानें मीं दरवाजा उघडला व त्याचवेळीं डॉक्टरसाहेबांची व माझी दृष्टादृष्ट झाली. तो दिवाणखाना चांगला प्रशस्त असून त्याठिकाणीं खुर्च्या, मेजें, कोचें वगैरे सामानही बरेंच होतें. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एक वर्तुलाकार मेज असून त्यावर कांहीं पुस्तकें व वर्तमानपत्रें पडलीं होतीं. जवळच एका खुर्चीवर डॉक्टरसाहेब कांहीं वाचीत बसले होते. मला पाहतांच त्यांनीं किंचित् स्थानभ्रष्ट झाल्यासारखें केलें व पुढें होऊन नमस्कार चमत्कार वगैरे झाल्यावर मीं बसावें ह्या

उद्देशानें त्यांनीं शेजारच्या कोचाकडे बोट दाखविलें. कुशलप्रश्न वगैरे झाल्यावर मींच बोलावयास सुरुवात केली.

मी:— मी कां आलों होतों हें आपणांस कळलेंच असेल म्हणा !

डॉ०:— तुम्ही आलां आहांत व माझी भेट घेऊं इच्छितां इतकें मात्र कळलें; परंतु मला कारण समजलें नाहीं !

मी:— मोठ्या आश्चर्याचीच गोष्ट आहे. कारण मी आलों होतों हें ज्यानें तुम्हांला कळविलें त्यानें एवढेंच कसें सांगितलें नाहीं! तुम्हाला तरी मालतीच्या भावानेंच मी आलों आहे हें सांगितलें ना ?

डॉ०:— कोण मालतीचा भाऊ ? तो हणम्या, त्याला तुम्ही मालतीचा भाऊ समजतां कीं काय ?

मी:— ह्मणजे हा आहे तरी काय घोटाळा ? ज्याला तुम्ही आतां हणम्या म्हणालांत तो मालतीचा भाऊ असें खुद्द त्यानेंच मला दोन दिवसांपूर्वी सांगितलें ! आणि आतां तर तुम्ही नाहीं म्हणतां ?

डॉ०:— तो लुच्चा, चोर—हणम्या—त्यानें तुह्मांला — तुम्ही भोळे पाहून—चांगलेंच फसविलें. अहो, मालतीला मुळीं भाऊच नाहीं. ती आपल्या आईबापांना एकुलती एकच झाली.

मी:— मामासाहेब ! मला हा प्रकार कांहींच समजत नाहीं. पण जाऊं द्या, मला आतांच त्याच्याशीं कांहीं करावयाचें नाहीं. तूर्त आपल्या कामाकडे वळूं या.

यावर 'ठीक आहे' असें त्यांनीं ह्मटल्यावर मीं मालतीच्या स्थितीचें त्यांच्याजवळ सविस्तर वर्णन केलें. तें ऐकून त्यांना यत्किंचि-तही वाईट वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे तर ते अगदीं आश्चर्यचकित

होऊन मला म्हणतात, " छेः बुवा, हें मोठेंच आश्चर्य ! पण असें व्हावें तरी कशानें ? "

मीः– तेंच तर मला गूढ आहे, आणि तेंच तुम्हाला विचारण्याकरतां आलों.

डॉ०:– तें सर्व खरें; परंतु मला तरी काय ठाऊक आहे ? लग्न होण्याचे अगोदर तर तिला तुम्ही पाहिलीच होती ! बरें लग्न झालें तें सुद्धां तुमच्याच पसंतीनें झालें. मग आतां ह्याबद्दलची जबाबदारी माझ्यावरच कां बरें ? "

मला ह्या त्यांच्या भाषणाची खरोखर चीड आली; परंतु जर मीं ती दाखविली असती तर ते पुढें कांहींच बोलले नसते, असा मला त्यांचा रोंख दिसला. नंतर जरा गम खाऊन मीं त्यांना विचारलें, " मामासाहेब, असें कसें बरें म्हणतां ? अहो, जरी माझ्याशीं तिचें लग्न झालें तरी तेवढ्यानें तुमचा संबंध पार पुसून तर गेला नाहींना ? माझी ती जन्माची सोबतीण या नात्यानें मला तर दुःख जन्माचें आहेच; परंतु तुम्हाला तिचें कांहींच का वाटूं नये ? "

" अहो, वाटतें पुष्कळ; परंतु उपयोग काय ? तिला असें कां झालें व काय झालें तें मी तरी काय सांगूं ? शिवाय लग्न होण्याचे अगोदर ' ती जशी आहे तशी तुम्हाला कबूल आहेना ? ' असें मीं स्पष्ट विचारलेंही होतें ? कां खरें ना ? "

ह्या भाषणानें मात्र माझ्या डोळ्यापुढें लख्ख उजेड पडला. मालतीची ही स्थिति त्याला माहीत असूनही माझ्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्या नीचानें तिला माझ्या गळ्यांत बांधली, अशी आतां माझी पक्की खात्री झाली. अर्थात् ह्यावेळीं मात्र माझ्यानें राहवेना म्हणून

मीं समोरच्या टेबलावर जोरानें हात आपटून म्हटलें, "हो हो, अगदीं खरें ! आणि त्याला माझीं संमती मिळवून तुम्ही माझें सपशेल नुकसान केलेंत हेंही पण खरें ! "

यावर तोही जास्त जोरानें म्हणतो, "हां ! असे बेभान होऊं नका ! तुम्ही काय बोलतां ह्याचा कांहीं विचार केला का ? "

"केला केला, पुरता विचार केला ! आपण पक्कें समजा कीं, मी एवढ्यानेंच गप्प बसणार नाहीं ! माझें तर नुकसान झालेंच आहे; पण याबद्दल तुमची चार चौघांत चांगली—— "

मी पुढें बोलणार होतों; परंतु तेवढ्यांत त्यानें आपली वृत्ती बद्लून हंसत हंसत माझा हात धरला व म्हणतो, " अरे पण हो ! वसंतराव, असे एकेरीवर काय येतां ? नीट सामोपचारानें घेतलें तर ! बोला, काय म्हणतां तुम्ही ? "

माझी तामसवृत्ती पाहून तो खास घाबरला असें वाटून मीही जरा शांत झालों व म्हणालों, " मीं कांहीं पहिल्यानें माझी मर्यादा सोडली नव्हती ! पण तुम्ही कांहींच पत्ता लागूं देइना तेव्हां मी तरी काय करणार ? आतां तुम्ही सामोपचाराचा प्रश्न काढतां तर ठीक आहे. माझी कांहीं ना नाहीं. चालूंद्या. मला काय पाहिजे आहे तें तुम्हाला माहित आहेच ! "

डा०:— होय ! पण खरोखर म्हणाल तर मालतीला हें असें काय झालें तें मला शपथपूर्वक माहीत नाहीं आणि माझ्या ह्या सांगण्यावर तुमचा तर विश्वास बसत नाहीं.

मी:— कसा बसावा तुम्हीच सांगा ! पण जाऊं द्या, इतकें कशाला ? मीच तुम्हाला त्याची सुरुवात करून देतों ! मालतीच्या

प्रकृतीचें निदान करतांना एका डॉक्टरानें मला असें खात्रीपूर्वक सांगितलें आहे कीं, तिच्या मनावर कांहीं तरी जबर दुःखाचा परिणाम झाला आहे ! त्याचा धक्का बसून त्यामुळें तिची ही अशी स्थिति झाली आहे ! ह्या भाषणावर माझा आतांपर्यंत मुळींच विश्वास नव्हता; परंतु आतांच्या ह्या उडवाउडवीवरून माझी पक्की खात्री झाली आहे कीं, तसा प्रकार झाला असावा खास ! इतकेंच नव्हे तर त्याच्याशीं तुमचा अगदीं निकट संबंधही असला पाहिजे. तर तें दुःख काय व त्यावर इलाज काय तें समजल्याशिवाय मी इथून जाणार नाहीं—समजलांत ?

हें मी बोलत असतांना त्याचा चेहरा अगदीं कावराबावरा झाला होता. ह्यावरून त्याच्या अंतःकरणांत सांगूं कीं नको, ह्याबद्दल बरीच भवति न भवति होत असावी असें मला वाटलें. शेवटीं एक क्षणभर विचार करून एक उसासा टाकून तो म्हणाला, " वसंतराव, तर मग एकूण जी गोष्ट तुमच्यापासून गुप्त रहावी अशी मी इच्छा करीत होतों, ती काढून घेणारच तुम्ही ? खरोखर म्हटलें असतां तींत विशेष असें कांहींच नाहीं; परंतु तुमचा आग्रहच दिसतो तर मीं तरी काय म्हणून तुम्हाला नाखुष करूं ? ऐका तर. मालतीचा बाप वारला त्यावेळीं तिची आई—म्हणजे माझी बहीण तिला घेऊन माझ्याच घरीं आली. तिच्याजवळ कांहीं नाहीं म्हटलें तरी तीन लाखांची माया होती. मालतीची आई जिवंत असतांना ती फार सुखांत होती व माझ्या बहिणीच्या विनंतीप्रमाणें मी जर वागलों असतों तर आजही तिला कांहीं वाण नव्हती. परंतु माझी बहिण वारल्यानंतर तिनें आपल्या मुलीकरतां मजजवळ दिलेला सर्व पैसा

थोड्याच दिवसांत मीं उधळून टाकिला. तथापि मालतीच्या लग्नाचें ठरेपर्यंत मीं हें नुकसान तिला एक लवमात्रही भासूं दिलें नव्हतें. पुढें लग्नाच्या अगोदर हें सर्व तिला सांगणें भाग झालें. आतां तुम्हीच विचार करा, हा धक्का तिला कमी भासला असेल काय ? हेंच तें तिचें नुकसान व असला तर ह्याचाच धक्का तिला बसला असावा ! ह्या पलीकडे तिचें अन्य कोणत्याही प्रकारचें नुकसान झाल्याचें मला तरी निदान स्मरत नाहीं. आतां यावर इलाज विचारतां तर ही मानसिक व्याधी—तिचा विसर पडला म्हणजेच कमी होणार ! तेव्हां ती कशी व कधीं कमी होईल तें मी तरी काय बरें सांगूं ? ”

ह्या इतक्या लांबलचक भाषणाचा माझ्यावर व्हावा तसा परिणाम झाला नाहीं; कारण तिला झालेल्या दुःखाच्या मुळाशीं द्रव्यहानीच जर असेल तर तिचा तिला माझ्या घरीं कधींच विसर पडावयास पाहिजे होता ! माझ्या घरीं तिला कोणतीही ददात नव्हती. सर्व प्रकारें सुखच होतें. पण अशा स्थितींतही तिचें दुःख रोज वाढतच होतें. मग हें भाषण मला कितपत विश्वसनीय वाटावें बरें ? परंतु पुनः असें वाटलें कीं, हे म्हणतात त्याप्रमाणेंही असूं शकेल. कारण माझ्या घरीं जरी तिला सर्व कांहीं अनुकूल होतें, तरी पण ‘ शती सहस्रं इच्छति ’ ह्या मानवी स्वभावाला ती अपवाद कशी असेल. अर्थात् आपलें फार मोठें नुकसान झालें असें तिला वाटलेंच पाहिजे होतें. सारांश, हीच गोष्ट खरी असावी असें वाटून व ह्या पलीकडे आतां कांहीं ऐकावयाचें राहिलें नाहीं असें जाणून मी उठण्याच्याच बेतांत आलों व म्हणालों, “ हीच आणि एवढीच जर खरी हकीकत असेल तर माझा नाइलाज आहे. माझ्या नशीबीं असलेला दुःखाचा वाटा मला भोगलाच पाहिजे.

बरें, आतां एकच गोष्ट राहिली. तो हणमंतराव कोण ? तो खरोखरच तुमचा भाचाना ? "

ह्यावर तो रागावून ह्मणतो, " अहो, कुठला भाचा नी काय ? तो आमचा कोणीही नव्हे. "

" मग तो असें कां सांगतो ? "

" अहो, तो मोठा काफर आहे ! तो काय वाटेल तें बडबडेल. "

" तें खरें; पण तो तुमची निंदा करतो त्याचें तरी कारण काय ? "

" त्याचें कारण इतकेंच कीं, पहिल्यानें तो माझ्या धंद्यांत एक भागीदार असे. पुढें जेव्हां त्याच्या योगानें मी ठार बुडालों असें मला दिसून आलें तेव्हां त्याला काढून टाकलें. त्यामुळें तो अगदीं चिडल्यासारखा झाला आहे. कुणाजवळ काय वाटेल तें भकत असतो. बरें झालें कीं, त्यानें मालतीचा आपण भाऊ म्हणून तरी तुमच्याजवळ सांगितलें—हो नाहीं तर— ".

इतकें म्हणून मामा तर उठलेच ह्यावरून ह्यापुढें त्यांची बोलण्याची इच्छा नसावी असें मला वाटलें. मीही उठलों व माझी आजच जाण्याची इच्छा दर्शवून ह्यावर पुनः जरूर पडल्यास भेटीचा योग कुठें येईल म्हणून विचारलें. त्यावर ते एवढेंच म्हणाले, " हो, बरी आठवण केलीत. मी उद्ईक येथून जाणार आहें. अमुक ठिकाणीं मी अमुक वेळीं असेन हें मला आजच सांगतां येणार नाहीं. कारण माझा मुक्काम माझ्या कामावर अवलंबून असणार ! तथापि मी मधून मधून तुम्हाला माझा पत्ता कळवीत जाईन; पण आतां माझ्याकडे आणखी जास्त कांहीं राहिलें आहे असें मला तरी वाटत नाहीं. तरी

पण पत्रद्वारें आपण वरचेवर भेटत जाऊं म्हणजे झालें. बरें आहे, आतां मलाही थोडें काम आहे तेव्हां— ”

मीं त्यांचा आशय तेव्हांच ताडला. अर्थात् “ येतों तर मी ! ” असें म्हणून नमस्कार ठोकून खालीं उतरलों.

ह्या वेळेसही गाडी हजर होतीच. सबब मीं तिचा अनादर केला नाहीं. ह्यावेळेस सायंकाळची वेळ झाल्यानें मी अमुक रस्त्यांतून जात आहे हें मला बरोबर समजलें नाहीं. शिवाय झालेल्या एकंदर प्रकाराबद्दल माझें मन विचारांत गढून गेल्यामुळें माझें तिकडे विशेषसें लक्षही गेलें नाहीं. परंतु डॉ० शांतारामचें घर सोडून सुमारें दहा मिनिटें झालीं असतील तोंच गाडीचा वेग कमी झाला, असें वाटून सहज खिडकीकडे नजर केली तों हणमंतरावाची स्वारी हजर.

डॉ० शांतारामाच्या भाषणावर माझा थोडाबहुत विश्वास बसला होता. अर्थात् हणमंतरावाच्या संबंधानें त्यानें जें सांगितलें त्यामुळें त्याच्या विषयीं माझ्या मनांत थोडासा तिरस्कार उत्पन्न झाला होता. आतां त्याची गांठ घेऊं नये इतकेंच नव्हे तर त्याच्याकडे पाहूंसुद्धां नये, असें त्याला पहातांच मला वाटलें. म्हणून मीं माझें तोंड चटकन् दुसऱ्या खिडकीकडे वळविलें. परंतु तो तसा थोडाच ऐकणार होता ! त्यानें गाडी एकदम उभी करविली व पायऱ्यांवर चढून “ नमस्कार, वसंतराव, का पडली गांठ ? ” असें विचारलें. यामुळें नाखुषीनें कां होईना पण ‘ हो ’ म्हणणें मला भाग पडलें. मला वाटलें होतें कीं, आतां तरी तो जाईल; परंतु त्यानें दरवाजा उघडला व आंत येऊन बसून बोलूं लागला. गाडीही मग चालूं लागली. मला ही दांडगाई मनापासून पसंत नव्हती म्हणून मी त्याच्याशीं एक शब्दसुद्धां बोललों नाहीं. क्षणभरानें तो आपण होऊनच बोलूं लागला.

हण०:— या वेळचें माझें वर्तन तुमच्या इच्छेविरुद्ध होत आहे हें मी जाणतों. परंतु त्याबद्दल क्षमा करा. कदाचित् झाला तर माझ्यापासून तुमचा फायदाच होईल.

मी:— [ ज़रा हंसून ] नाहीं हो, तसें कांहीं नाहीं. मी आपला माझ्याच विचारांत गुंग असल्यामुळें फारसा बोललों नाहीं.

हण०:— समजलों. पण कांहो ? पडली कां गांठ ?

मी:— पडली, पण कांहीं व्हावें तसें समाधान झालें नाहीं.

हण०:— आणि हें तर मीं अगोदरच तुम्हाला सांगितलें होतें.

मी:— काय तुम्हीं सांगितलें होतेंत ? अहो, ते तुम्हाबद्दल काय म्हणतात तें आधीं ठाऊक आहे कां तुम्हाला ?

हण०:— वसंतराव ! त्यांतही कांहीं नवीन नाहीं. तो मला आपला भाचा नाहीं म्हणतो हेंच ना ? अहो, हें तर आज मी किती दिवस ऐकतों आहें. पण म्हणावें आतां हें चालायचें नाहीं ! आतां मी असा गप्प बसायचा नाहीं !

मी:— पण कांहो, ते ज़र तुमचे खरोखरच मामा आहेत तर तुमचें त्यांचें इतकें वाकडें कां ?

हण०:— अहो, ह्या सगळ्याच्या मुळाशीं पैसा आहे. एवढी गोष्ट ध्यानांत घेतलीत म्हणजे सर्व कांहीं तुमचें तुम्हालाच समजेल. अहो, यानें आमच्या बापाला फसवलें, आईला बुडवलें व शेवटीं आमच्याही डोक्यावर चांगलाच हात ठेवलान् ! कांहीं नाहीं म्हटलें तरी आमची इस्टेट तीन लाखांची होती. परंतु ह्यानें ती सर्व उधळून टाकून आज आम्हांला पैला महाग करून ठेवलें आहे. आणि आतां गांवांत नाहीं नाहीं तसल्या कंड्या उठवतो आहे. तुम्हाला एक सांग, त्याला एक सांग,

असें चालवलें आहे; मग कां बरें आग होणार नाहीं, तुम्हीच सांगा ? पण जाऊंद्या; तुम्हाला हा विषय अगदीं नवीनच असल्यामुळें जरा चमत्कारिक वाटला असेल. माझ्या तो अंगवळणी पडला आहे. बरें मग—मालतीच्या ह्या सध्याच्या स्थितीबद्दल काय सांगितलेंन् ?

मी:— दुसरें काय ? हेंच. आपण सर्व पैसा घालवून टाकला ही गोष्ट तिला लग्नाच्या ऐनवेळीं कळविल्यानें तिला धक्का बसला असावा असें सांगितलें.

हणमंत:— तर मग तुम्हाला त्यानें साफ फसविलें.

मला फारच आश्चर्य वाटलें व मीं " काय म्हणतां ? मालतीच्या दुःखाचें कारण ह्याशिवाय कांहीं तरी अन्य आहे, आणि तें तुम्हाला माहीत आहे ? तरमग हणमंतराव, कृपा करा, आणि तें मला सांगा हो ! म्हणजे माझ्या आत्म्याची शांतता तरी होईल ! " अशी त्याची मोठ्या काकळुतीनें प्रार्थना केली. त्यावर तो म्हणाला, " होय मला माहीतही आहे आणि तें मी तुम्हाला सांगेनही—पण आज नाहीं ! "

मी:— [ उत्कंठेनें ] कां बरें ?

हणमंत:— इतकेंच कीं, कोणतीही गोष्ट जरा दमानें घेतली पाहिजे म्हणून ! मलाही त्याला चांगला चार चौघांत ओढायचाच आहे, पण त्याला फार नाहीं, आठ दिवसांचा अवकाश आहे तोंपर्यंत दम धरा !

" पण या आठ दिवसांत माझें काय होईल ? " मी एक निराशेचा सुस्कारा सोडून म्हटलें.

हण०:— त्याला माझा नाइलाज आहे !

मी:— पण मला आतां इथें जास्त दिवस रहातां येत नाहीं. मला आ च गेलें पाहिजे ! म्हणून म्हणतों— आजच कायतें—

हण०:– तें सर्व खरें; पण नाइलाज आहे. तुह्मी आज जाणार असलांत तर खुशाल जा ! आजपासून बरोबर आठ दिवसांनीं मी मुंबईत हजर आहें. मला तुमचा पत्ता द्या ह्मणजे झालें. मी बरोबर त्या दिवशीं येतों. त्यावेळीं सर्व कांहीं सांगेन ! अरे–पण हो, हें पहा तुमचें घरही आलें.

गाडी उभी राहिली व पहातों तों ती अगदीं माझ्या घरासमोर उभी राहिली. त्या सरसा मीं उतरून त्यालाही माझ्याबरोबर वर चलण्याचा आग्रह केला; परंतु तो येईना. अर्थात् त्यानें मागितल्याप्रमाणें माझ्या नांवचें पत्त्यासह छापील कार्ड त्याच्या स्वाधीन केलें व “ हणमंतराव, पहा, तुमच्या भरंवशावर रहातों ! माझी तर साफ निराशा झालीच आहे; पण त्यांतल्या त्यांत तुह्मी तिचें किंचित् पुनरुज्जीवन करीत आहां ! आतां मला तारा, मारा काय वाटेल तें करा ! मी सर्वस्वी तुमच्या आधीन आहें ” असें म्हटलें.

त्यावर तोही “ तुह्मी अगदीं बेफिकीर असा. आजपासून बरोबर आठव्या दिवशीं मी मुंबईत ठेवलेला आहें. बरें आहे, येतों मी आतां, संभाळून जा–मालतीला नीट जपा—नमस्कार. ” असें म्हणून चालूं लागला.

मीं सुद्धां “ बरें आहे–नमस्कार ! विसरूं नका हो–पण हें पहा मुंबईत याल ते उतरायलाच आमच्या इथें या. ” असें सांगून व “ ठीक आहे ” असें त्याचें उत्तर ऐकून माडीवर गेलों. घड्याळांत पाहिलें तों अद्याप गाडी सुटावयास चांगला एक तास होता. अजूनही गाडी साधेल असा विचार करून व कलकत्त्यांत आतां माझें कांहींच काम उरलें नव्हतें ह्मणून गडबडीनें सामान आवरलें व एक गाडी बोलावून

कसाबसा गाडी सुटावयास दहा मिनिटें असतांना स्टेशनावर येऊन धडकलों. ताबडतोब एक फर्स्टक्लासचें तिकिट काढलें व आधीं डब्यांत घुसलों. सामानसुमान लावून बेडिंग वगैरे पसरतों तों घंटा होऊन गाडी मोठ्या झपाट्यानें मला मुंबईकडे ओढूं सुद्धां लागली !

## प्रकरण अकरावें.

गाडींतले तास कसेबसे संपून मी एकदांचा घरीं येऊन पोंचलों; पण तिथें तरी काय सुख होतें ! ह्या गेल्या दहाबारा दिवसांत मालतीची प्रकृती इतकी बेताल झाली होती कीं, तिला माझी ओळख पटावयासच मुळीं दोन तास लागले. बाकीचें सर्व पूर्वीप्रमाणेंच होतें. कलकत्त्याहून येतांना मी ह्या सर्व प्रकरणाचा उलगडा करून आलों असेन व आतां मालतीची प्रकृती हां हां ह्मणतां सुधरेल अशी काशीला व सुंदररावाला किती तरी आशा होती, पण हाय ! मी सर्व हकीकत सांगतांच ती पार मावळून गेली. बरोबरच आहे, मी कांहीं कलत्त्याला एखादी जडीबुट्टी आणण्याकरतां गेलों नव्हतों, कीं जिच्या योगानें मालतीला क्षणार्धांत बरी केली असती ! मला समजलेली हकीकत हेंच तिच्या दुखाचें कारण असावें असें तूर्त समजून त्याचा तिला विसर कसा पडेल हाच विचार आह्मांला करावयाचा होता व त्याप्रमाणें आमचे उपचार सुरू होतेच. शेवटीं आला गूण तर आला नाहींतर आपण आशा सोडलीच आहे असा विचार करून मी स्वस्थ होतों.

आतां यांत एक उगीच अंधुक आशा होती कीं, तो हणमंतराव एकदां काय येऊन सांगतों तें पहायचें. पण त्याच्यावरसुद्धां माझा

विश्वास तात्पुरतांच होता ! कारण, जर कांहीं तसेंच महत्वाचें कारण असतें तर निदान माझ्या स्थितीकडे पाहून त्यानें तें मला तेव्हांच सांगावयाला पाहिजे होतें. मग त्यानें असा वायदा कां केला ? बरें त्या मामाकडे पहावें तर तो अगदींच काफर ! चांगली जरब दिली तेव्हां कुठें ताळ्यावर आला. पुढें बोलला—पण तें तरी किती धरसोडीचें ? अर्थात् जणुं कांहीं त्याची माझी भेटच झाली नाहीं अशांतलाच जवळ जवळ प्रकार होता. तात्पर्य, माझ्या दुराग्रही स्वभावाची केवळ हौस फेडण्याकरितांच पुष्कळसा खर्च करून आणखी वर ही एक काळजी लावून घेतली. ह्या पलीकडे ह्या प्रवासांत कांहीं निष्पन्न झालें नाहीं अशीच मनाशीं मला गांठ घालावी लागली. असो.

पण अशा दुःखद स्थितींतही मला किंचित् सुख व्हावें म्हणूनच कीं काय, हणमंतराव अगदीं बरोबर आठव्या दिवशीं हजर झाला. तो उतरावयास कांहीं आमच्याकडे आला नाहीं. रात्रौ भोजनोत्तर भेटावयास मात्र आला. त्या रात्रीं आमची ह्या विषयावर कांहींच भाषा झाली नाहीं. त्यानें माझा अजून मुक्काम आहे असें सांगितलें ह्मणून मीं मुद्दाम तो विषयच काढला नाहीं.

याप्रमाणें तो रोज सकाळीं व सायंकाळीं नेमानें येत असे. मी त्याला तें सांगण्याबद्दल आग्रह करीत असे तरी तो रोज कांहीं तरी नवी सबब काढून टाळीत असे. परंतु त्याच्या ह्या मुक्कामांत विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, तो आल्या दिवसापासून मालतीच्या प्रकृतींत एक चमत्कारिक फरक दिसूं लागला. तो असला ह्मणजे ती त्याच्याकडे केव्हां सारखी टक लावून पहात बसे, कधीं हंसे तर कधीं एकदम रागावल्यासारखें करून कपाळाला आंठ्या घाली. असे कांहीं चमत्कारिक प्रकार

करी. वास्तविक पहातां हा फरक म्हणजे कांहीं विशेषसा आशाजनक नव्हताच. कारण इतकें झालें तरी तिच्या तोंडून शब्द तर मुळींच नव्हता. परंतु अगदींच जी काष्ठवत् असायची ती हालचाल तरी करूं लागली. कदाचित् पुढें ती सुधारेल या आशेवर मला तात्पुरता तरी आनंद मानावयास जागा होती. इतकेंच केवळ नव्हे तर त्या शांतारामानें आपणास साफ फसविलें व मालतीची प्रकृती सुधारण्याचें जर कांहीं साधन असेल तर तें हणमंतराव ह्मणजे तिचा भाऊच होय अशीही माझी खात्री होत चालली होती.

क्रमाक्रमानें हणमंतराव अगदीं आमच्या घरच्यापैकींच एक बनून गेला. तो वाटेल तेव्हां येत असे व कधीं जेवायलाही रहात असे. माझ्या त्याच्या रोज गप्पा होत असत. विषय बहुतेक मालतीचाच असे. मीही त्याला आग्रह करी व तोही उद्यांवर ढकली. अशारीतीनें ती गोष्ट मात्र निश्चित नसे. केव्हां केव्हां मालतीही आमच्यांत येऊन बसत असे. तात्पर्य, पहिल्यापेक्षां दिवस जरा बरे जाऊं लागले होते !

याप्रमाणें एके दिवशीं रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर आम्हीं आमच्या दिवाणखान्यांत गप्पा मारीत बसलों होतों. त्याच दिवशीं " महाराष्ट्र राज्यस्थापक श्रीशिवछत्रपती यांचें चरित्र " ह्या नांवचें एक पुस्तक मजकडे आलें होतें. अर्थात् सदर पुस्तकाला अनुसरूनच आमच्या गप्पांचा ओघ होता. एका ग्रंथकारानें म्हटल्या प्रमाणें शिवाजी खरोखरच लुटारू होता, कीं दुसऱ्या एका चरित्र-काराच्या मताप्रमाणें तो डोंगरका चुव्हा होता, कीं प्रस्तुत ग्रंथकारानें वर्णन केल्याप्रमाणें खरोखरच त्याच्या अंगीं अपूर्व गुण होते ह्याचे विवेचन करण्यांत आमचा मोठा कडाक्याचा वाद चालला

होता. मालतीही जवळच एका कोचावर शाल पांघरून बसली होती. व आनंदाची गोष्ट ही कीं, हें सर्व लक्ष्य लावून ती ऐकते आहे असें तिच्या मुद्रेवरून दिसत होतें. हणमंतरावाच्या भाषणशैलीवरून व विषयप्रतिपादनावरून तो चांगला बहुश्रुत असावा व त्यांतल्यात्यांत त्याला इतिहासाचें चांगलेंच ज्ञान असावें असें दिसून आलें.

असो; बोलतां बोलतां आमचा विषय अफझुलखानाच्या वधाकडे फिरला. अफझुलखानाचा नीचपणा, शिवाजी महाराजांचें प्रसंगावधान व त्यांचा दूरदर्शीपणा ह्यांचें हणमंतरावानें इतकें बहारीचें वर्णन केलें कीं, तें ऐकून मी तर अगदीं तल्लीन होऊन गेलों. परंतु ह्याहून खरा बहारीचा प्रसंग तर पुढेंच होता. तें चरित्र ह्मणजे निव्वळ निबंध नसून त्यांत प्रसंगविशेषीं भाषणेंही घातलीं होतीं. तीं वाचतांना तर हणमंतरावानें कमालच केली. आवेशपर भाषणें वाचावयाचे वेळीं योग्य ठिकाणीं जोर देणें, तसेंच तेते अभिनय करून ठसवून देणें–वगैरे गोष्टी ज्या एकाद्या उत्तम नटाला सुद्धां साधावयाच्या नाहींत त्या त्या सर्व हणमंतरावाजवळ जणूं पूर्ण भरल्या होत्या. शेवटीं जेव्हां प्रत्यक्ष वधाच्या वर्णनापर्यंत गोष्ट येऊन पोंचली तेव्हां तर तो उठूनही उभा राहिला. त्यावेळीं तो छत्रपतीचें भाषण वाचीत होता ! अहाहा ! काय तो आवेश, काय ती वाचनाची शैली, मला तर असें वाटलें कीं, प्रत्यक्ष छत्रपतीच ह्यावेळीं माझ्यासमोर उभे आहेत. अशा रीतीनें वाचतां वाचतां तो अगदीं वधाच्या वेळच्या भाषणावर येऊन ठेपला. तें वाचतांना ज्याप्रमाणें छत्रपतींनीं अफझुलखानाचा कावा ओळखून त्याच्या पोटांत आपलीं वाघनखें खुपसून त्याला कबरस्थानीं पोंचविला, त्याप्रमाणें हाताच्या मुठी आवळून मोठ्या आवेशानें समो-

च्या खुर्चीला अफजुलखानच कल्पून जेव्हां त्यानें ताडकन् प्रहार केला त्यावेळीं तर माझ्या अंगावर शहारे आले व मी तात्पुरता आपल्या स्वतःला विसरलों.

पण याचवेळीं माझ्या मालतीची काय अवस्था झाली होती ? ती आमचें भाषण कुठपर्यंत ऐकत होती, हिकडे तर माझें ध्यान नव्हतेंच; परंतु तो शेवटचा प्रकार ह्मणजे अफझुलखानाच्या वधाचा भाग ऐकून माझें सर्व लक्ष तिजकडे ओढलें जात आहे तोंच तिनें हात पाय वाकडे करून एकदम मोठ्यानें किंकाळी मारली. झालें. तावडतोब आम्हीं उभयतांही स्तब्ध व आश्चर्यचकित् होऊन एकदम तिच्याकडे धावलों व कोंचावरून खालीं पडत असतांना तिला मोठ्या कष्टानें सांवरून धरलें.

मला तर ह्यावेळीं कांहींच सुचेना. हा प्रकार काय झाला हें कांहींच न समजून भीतीनें हातपाय लटलटां कांपूं लागले. परंतु तितक्यांत काशीनें थोडें थंडपाणी तिच्या तोंडावर शिंपडलें. हणमंतरावानें खिशांतली अमोनियाची बाटली काढून तिच्या नाकाजवळ धरली, असे जेव्हां अनेक उपचार होऊन तिनें बऱ्याच वेळानें डोळे उघडले तेव्हां कुठें माझ्या जिवांत जीव आला. नंतर ती त्या भयंकर मूर्च्छेतून सावध होतांच आह्मीं तिला तशीच उचलून आंतल्या पलंगावर नेऊन ठेवली.

हणमंतराव मात्र यानंतर थांबला नाहीं. मालतीला खोलींत पलंगावर निजविल्यावर तो " वसंतराव, केवढी चूक झाली होती माझ्या हातून ! तिच्या बिघडलेल्या मेंदूवर एवढासाही ताण बसेल अशी गोष्ट तिच्या समोर करतां कामा नये हें मी अगदींच कसें विसरलों ? वाचण्याच्या व बोलण्याच्या नादांत तें शेवटचें शिवाजीचें भाषण कसें नडलें तें

पाहिलेंत ना ? पण असो. आतां तरी नीट खबरदारी घ्या. तिच्या-जवळ अगदीं गडबड होऊं देऊं नका. नाहींतर पुन्हा उलटायचें ! मी आतां जातों. उद्यां सकाळींच येईन. " असें ह्मणून खालीं उतरला व मलासुद्धां मालतीजवळ जावयाचें असल्यानें " बरें आहे " असें ह्मणून त्याला गडबडीनें मीं निरोप दिला व लागलीच खोलींत आलों.

या वेळेस मालतीनें डोळे उघडले होते खरे; तथापि ती अद्यापि चांगली शुद्धीवर नव्हती. काशीचे घरगुती उपचार सुरू होतेच. डॉक्टराला बोलावून आणावें म्हटलें तर अपरात्र झालेली व इतकेंही करून आणावें तर तेही जास्त काय सांगणार ? काय झालें होतें तें आमचें आम्हांला दिसतच होतें. अर्थात् यावर उपाय असा कांहींच नव्हता. जिवाला स्वस्थता वाटून तिची तीच उठेल तेव्हां खरें असें समजून मी तिच्या उशाशीं स्वस्थ बसलों होतों.

परंतु कांहीं वेळानें तिनें डोळे उघडून एकदां माझ्याकडे पाहिलें. त्या वेळेस मात्र तिच्या अंतःकरणांत कांहीं विलक्षण विचार सुरू असावेत असें वाटलें. तिच्या त्या दृष्टींत राग इतका पूर्ण दिसत होता कीं, जशु कांहीं तिच्या नेत्रांतून रक्ताच्या ठिणग्या पडत होत्या. ही तिची दृष्टी ह्यावेळेस इतकी सक्त होती कीं, तिची पापणी लवमात्रही हलली नाहीं. मला तर हें पाहून जास्तच भीति वाटली व हा राग कदाचित् माझ्यावरच असेल असें समजून मी क्षणमात्र तिच्यापासून दूर झालों. पण ही तिची नजर कोणाही एकाद्या विशिष्ट व्यक्तीला उद्देशून होती असें नाहीं. काशीनें " तुला कुणी दिसतें काय ? तुला कशाची भीति वाटते आहे ? " म्हणून परोपरीनें विचारलें; पण एक ना दोन. अखेर सुमारें १० मिनिटांनीं

तिनें डोळे मिटले ते बराच वेळपर्यंत उघडले नाहींत. तेव्हां हिला झोंप लागली असेल असें समजून काशी व इतर मंडळी निघून गेली व मींही तिथेंच जरा आडवा झालों !

मला झोंप तर आलीच नाहीं, पण उगच गुंगी येत होती. माझें सारें लक्ष्य तिच्याकडे होतें. सुमारें अर्ध्या तासानें तिची हालचाल सुरू झाली म्हणून मी असा उठून तिच्या जवळ जाणार तों तीही एकदम उठून उभी राहिली. यावेळेस ती एकसारखी टक लावून माझ्याकडे पहात होती. त्यावेळच्या तिच्या मुद्रेंत पूर्ण तिरस्कार दिसत होता. मीं पुढें होऊन तिचा हात धरला व तिला खालीं बसवूं लागलों. पण माझ्या हाताला तिनें असा जोरानें एक हिसडा दिला कीं, माझा हात आपोआप सुटून मी एका कोंपऱ्यांत कोलमडलों. हा प्रकार पाहून मी फार घाबरलों व ही कांहीं भूतचेष्टा तर नव्हेना असा विचार करून पुनः काशीला हांक मारायची तयारी करणार तों ती एकदम पुढें सरकली व खुंटीवरील शाल घेऊन खोलीबाहेर पडून झपाझप जिना उतरूं लागली. काशीला बोलावण्याचे माझे सर्व विचार जागच्याजागीं राहून मीं अगदीं शून्य बनलों व ही करते तरी काय हें पहाण्याकरतां डोक्यावर टोपी ठेवून व गडबडीनें कोट हातांतच घेऊन तिच्या मागोमाग जिना उतरलों. पण ह्यावेळीं तिच्या अंगांत कसला संचार झाला होता कोणास ठाऊक ! मी जिन्याखालीं उतरेपर्यंत ती चौक ओलांडून थोरला दरवाजा उघडून बाहेर रस्त्यावरही पोंचली व मला पाहतांच झपाट्यानें चालूं लागली. यावेळेस कोणाला हाक मारीन तर विनाकारण वेळ जाणार म्हणून काय होईल तें होवो पण आजचा एकंदर प्रकार कांहीं बरोबर नाहीं असा

विचार करून दैवावर हवाला ठेवून मीही शुद्ध वेड्यासारखा तिच्या मागोमाग चालूं लागलों.

माझी दृष्टी तिच्याकडे होती व पाय तिच्या मागून कोणी ओढीत नेल्यासारखे चालले होते; परंतु हृदयांत मात्र नुसती धडकी भरली होती. कारण जी सहासहा तासपर्यंत बसल्या जाग्यावरून एक घांसभर अन्न खाण्यास सुद्धां उठावयाची नाहीं तीच मालती आज इतक्या जलदीनें चालली होती कीं, मी पुरुषासारखा पुरुष असून मला तिच्या बरोबर वेग ठेवावयास पळावें लागत होतें. शिवाय एवढ्या अपरात्रीं ही एकटी चालली तरी कुणीकडे ह्मणून भीति वाटत होती ती निराळीच. परंतु माझ्या स्थितीची तिला यत्किंचितही कल्पना नव्हती. ता आपली सरळ भराभर चाललीच होती.

चालतां चालतां आह्मीं नळबाजार ओलांडून डंकनरोडवर आलों व तेथून दुटाकीवर आलों. तेव्हां मात्र मला असें वाटलें कीं, हिला ह्या भ्रमांत पूर्वींच्या बिऱ्हाडाची व मावशीची आठवण झाली असेल व म्हणून ती तिकडे चालली असेल. अर्थात् मी तिला मुळींच आडकाठी केली नाहीं; परंतु हा माझा भ्रम तावडतोब दूर झाला. कारण तोही रस्ता मागें टाकून ती दुसऱ्याच एका बोळांत शिरली. ह्या बोळांत व त्यांत असलेल्या अनेक पोटगल्ल्यांत निव्वळ हलकट लोकांची वस्ती होती हें मला ठाऊक होतें. ह्या वेळीं अशा रस्त्यांतून जाणें बरें नव्हे असें समजून मीं तिला अडविण्याचा प्रयत्न केला; पण मला न जुमानतां ती ह्या गल्लींतून त्या गल्लींत तेथून दुसऱ्या, पुढें तिसऱ्या अशा पांच सहा गल्ल्या ओलांडून शेवटीं एका दुमजली घराजवळ येऊन उभी राहिली व तो उघडण्याकरतां जोरानें ढकलूं लागली.

ह्या गल्लींत अंधार तर इतका होता कीं, डोळ्यांत बोट घातलें तरी सुद्धां समजावयाचें नाहीं. अशा या भयंकर ठिकाणीं हिचें काय काम! आतां हिला परतवलेंच पाहिजे नाहीं तर एखादा भलताच अनर्थ गुदरायचा अशी भीति वाटून " मालती, असें काय बरें करतेंस तूं ? अग, हें कुणाचें घर आणि तें उघडून तुला काय फायदा ? तुझ्या ओळखीचें कां कुणीं राहतें इथें ? तसें असेल तर आपण उद्यां इथें यऊं मग तर झालेंना ? पण आतां घरीं चल. " असें म्हणून तिला मी परतवूं लागलों. पण इतक्या सगळ्याला उत्तर म्हणजे जोरानें माझ्या हाताला एक हिसडा मिळाला. व ती दरवाजा पहिल्यापेक्षां जास्त जोरानें ठोठावूं लागली.

यापेक्षां एखादा जास्त सक्तीचा उपाय करून तिला परतवण्याची खटपट करून ती परतली तर ठीक आणि भलतेंच एखादें झालें तर पुनः पंचाईत व्हावयाची, त्यापेक्षां यावेळेस तिच्या इच्छेप्रमाणेंच होऊं दिल्यानें तिला तरी समाधान वाटेल असा विचार करून मीं तिच्या बरोबरच दरवाजा ठोकूं लागलों. " कुणी आहे काहो घरांत ? अहो, कडी काढा कडी. " म्हणून मोठमोठ्यानें मी हांका मारूं लागलों. पण आंतून " ओ कसची येते ? दरवाजाला बाहेरूनच मुळीं कुलूप होतें. काडी ओढून पाहतां त्यावर " To be let " म्हणजे " भाड्यानें द्यावयाचें आहे " अशीं अक्षरें दिसलीं.

घरांत कोणी नाहीं, दरवाजाला कुलूप व घर भाड्यानें द्यावयाचें अशा स्थितींत आह्मीं सकाळपर्यंत दरवाजा ठोकीत राहिलों असतों म्हणून काय फायदा होणार होता! सबब " मालती, तूंच पहा, दरवाजाला कुलूप आहे, आंत कोणी नाहीं, असें असतां तूं किती वेळ

इथें उभी रहाणार ? तुझें जर ह्याच घरांत कांहीं काम असेल तर आपण उद्यां येऊं म्हणून सांगतोंना ! " असें सांगून तिची पुष्कळ समजूत केली; परंतु तिनें हूं कीं चूं न करतां आपलाच क्रम सुरू ठेवला.

हा तिचा निश्चय ढळेना ! ज्याअर्थीं तिच्या प्रकृतींत आज हा इतका फरक दिसत आहे त्याअर्थीं कदाचित् दरवाजा उघडल्यानेंच तिला बरें वाटेल; पण तसें न झालें तर ह्या गोष्टीनें तो वाढेलही असें मला सुद्धां वाटत होतें. पण तो उघडावा कसा ? मालकाजवळून किल्ली आणून उघडावा तर मालक वाळकेश्वरीं असल्याचें समजलें. बरें, एवढ्या अपरात्रीं तो तरी ही गोष्ट कशी कबूल करणार. शिवाय तोंपर्यंत मालतीचें इथें काय होईल, हीही भीति होतीच. सबब कुलूप मोडल्याशिवाय तो उघडणें शक्य नव्हतेंच. पण माझ्या लाडक्या मालतीची हौस पुरी करण्याकरतां ही प्रत्यक्ष घरफोडी करण्याचें धाडस करावयासही मी तयार झालों. कुलूप फोडावयाचें असा एकदा निश्चय झाल्यावर मग काय—काढी ओढून एक दगड घेतला व तो आतां जोरानें कुलुपावर घालणार तोंच मला आठवण झाली कीं, माझ्या खिशांत बऱ्याचशा किल्ल्या होत्या त्या आधीं चालवून पहाव्यात. नच चालल्या तर तो शेवटचा मार्ग होताच. म्हणून दगड बाजूला ठेवून किल्ल्या चालवूं लागलों. त्या बहुतेक सर्व निरुपयोगीं ठरल्या; पण मोठी आश्चर्याची गोष्ट कीं, अखेर एक किल्ली लागली—आणि तीही कोणती तर—माझ्याच स्वतःच्या खोलीची जोड किल्ली ! !

किल्ली चालली व कुलूप उघडलें. अर्थात् एकदांचें मालतीच्या मनाप्रमाणें घडून आलें ह्मणून मला आनंद झाला ! परंतु ' माझी

किल्ली चालली ' ह्या एवढ्याशा गोष्टीनें माझ्या अंतःकरणाची जी स्थिति झाली तिचें वर्णन करणें अशक्य आहे. कारण माझ्या जवळच्या किल्लीच्या जोडीच्या किल्लीनें असाच मागें एकदां दरवाजा उघडला होता. तो प्रसंग आतां माझ्या डोळ्यांसमोर येऊन उभा राहिला. खरोखर तेंच जर हें घर असेल तर मात्र परिणाम बरा नव्हे असें वाटून भीतीनें माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. अंगाला दरदरून घामही सुटला. वास्तविक पहातां ही माझी भीति निष्कारण होती. कारण कुलुपासारखीं कुलुपें पुष्कळ असतील—परंतु काय असेल तें असो–त्यावेळीं ह्या कथानकाच्या आरंभीं दिलेला तो भयकारक प्रसंग एकदम माझ्या मनांत आला व मी अगदीं गांगरून गेलों.

पण मालतीची मात्र तशी स्थिति नव्हती. दरवाजा उघडतांच आंत अत्यंत अंधार असतांनाही ती जणुं तेथल्या एखाद्या माहितगार माणसासारखी आंत केव्हां व कुठें गेली तें मला समजलें सुद्धां नाहीं. मला सुद्धां ह्याचें मोठें आश्चर्यच वाटलें. ह्यावेळीं काय वाटेल तें झालें तरी बेहत्तर, पण तिच्या इच्छेबाहेर जावयाचें नाहीं असा माझा निश्चय झाला असल्याकारणानें त्या घरांत मला माझा मार्ग शोधावा लागला.

अशा अंधेऱ्या रात्रीं व त्या बिनवस्तीच्या घरांत मालती एकटी कशी गेली असेल कोण जाणे ! मला तर नुसत्या जिन्याच्या पायऱ्या पहावयासच चार काड्या ओढाव्या लागल्या. काडीच्या अंधुक व क्षणोक्षणीं वाऱ्याच्या झुळुकीबरोबर कमी जास्ती होणाऱ्या उजेडांत मला तर त्या घराच्या तळमजल्याला एकच दालन असावें असें दिसलें. अर्थात् त्या ठिकाणीं जेव्हां मालती दिसेना तेव्हां थेट माडीवर गेलों तों पहिल्याच खोलीच्या दरवाजाशीं ती उभी असलेली माझ्या दृष्टीस

पडली. माझ्या हातांत काडीचा उजेड पाहतांच ती एकदम त्या खोलींत शिरली व ज्याप्रमाणें आपण एकादी गहाळ झालेली वस्तू शोधतों त्याप्रमाणें ती ह्या कोंपऱ्यांतून त्या कोंपऱ्यांत कांहीं तरी शोधल्यासारखें करूं लागली. मला ह्याचा कांहीं अर्थ समजेना व तिला विचारलें तरी ती बोलेना. मींही तिचा क्षणभर पाठलाग सोडून देऊन त्या घरांत कांहीं दिव्याचें साधन असल्यास पाहूं लागलों. माझ्या सुदैवानें त्या खोलींत तर नाहींच पण पलीकडील खोलींत एका कोनाड्यांत एक मेणबत्तीचा तुकडा सांपडला. तो घेऊन मीं लावून आतां बाहेर येणार तोंच मालतीही माझ्या मागोमाग येऊन तेथील कोंचावर बसली.

मालती येऊन बसल्यानंतर मी त्या खोलींत पाहूं लागलों तों त्या ठिकाणीं दोन कोचें, चार खुर्च्या व एक जुनी धुळीनें भरलेली बाजाची पेटी इतकें सामान होतें. ह्या खोलींतूनच एक रस्ता असून त्यांतून पलीकडे असलेल्या एका खोलींत जावयास मार्ग होता. त्या खोलींत फक्त एक मेज असून खालीं एक फाटकें तरट होतें. भिंतीवर जिकडे तिकडे काळसर रंगाचे डाग होते व केर तर मनस्वी सांठलेला होता. त्याचप्रमाणें कसलीशी एक प्रकारची कुजट घाणही सुटली होती, यावरून त्या घरांत बरेच दिवसांपासून कोणी राहिलें नसावें असें वाटलें.

ह्या मधल्याखोलींत आल्यावरही मालती घटकेंत उठून तर घटकेंत बसून अत्यंत चौकस मुद्रेनें सर्वत्र पाहत होती. हें असें ही काय करीत होती, तसेंच हा एवढा फरक होण्याचें कारण तरी काय होतें तें मला समजण्यास मुळींच मार्ग नव्हता म्हणून व एकसारखें तिच्या-कडे टक लावून पहात बसण्याचा मला कंटाळा आला म्हणून मी

सहज त्या वाजाच्या पेटीकडे वळलों. एकाच पायानें भाता दाबून पट्यांवर बोटें फिरवून चार वेडेवाकडे सूर काढतों तों काय चमत्कार पहा कीं, त्या त्या पेटींतून सूर निघूं लागतांच मालती तडक उठून पलीकडे असलेल्या खुर्चीवर येऊन बसली व आपण स्वतः पेटी वाजवूं लागली. मी तर हें पाहून अगदींच आश्चर्यचकित् झालों. कारण माझ्या घरांत ह्यापेक्षांही सुंदर पेटी असतांना तिच्याकडे एक दिवस सुद्धां ढुंकून पाहण्याची जिला इच्छा झाली नाहीं तीच मालती ही मोडकी पेटी आज वाजवावयास बसते ह्यावरून आज कांहीं तरी विलक्षण प्रसंग गुदरणार खास असें मला वाटलें. मग मी तिला जागा देऊन तिच्या समोर येऊन उभा राहिलों.

मालती हार्मोनियमवादनांत फारच कुशल होती असें मला तावडतोब दिसून आलें. तिनें जेव्हां एकापेक्षां एक सरस पदें वाजवावयास सुरुवात केली त्यावेळेस मी अगदीं तल्लीन झालों. परंतु आज मालतीच्या मनांत माझा आनंद परमावधीलाच पोंचवावयाचा होता कीं काय कोण जाणे, ती पेटीच्या सुरांत जेव्हां गाऊं लागली तेव्हां मात्र मी देहभान विसरलों म्हटलें तरी चालेल.

अहाहा ! जी मालती आज इतके दिवस मला अगदीं शून्य दिसत होती व जिच्या तोंडांतून एक तरी प्रेमाचा शब्द पडेल काय म्हणून मीं मोठ्या उत्कंठेनें रात्रीच्या रात्री जागून काढल्या त्याच मालतीचे हे मधुर आलाप ऐकून मला किती आनंद झाला तो मीं काय सांगूं! कांहीं वेळानें जेव्हां ती गात असलेल्या पद्यांकडे माझें लक्ष्य गेलें तेव्हां एकाएकीं माझ्या सर्वांगाला विजेचा झटका बसल्यासारखा होऊन रोमांच उभे राहिले. ह्या घरांत शिरतांना मला प्रारंभीं आलेला

संशय दुणावूं लागला व मीं अंधळा असतांना चुकून ज्या घरांत आलों होतों तेंच तर हें घर नसेल ना ? असें मला वरचेवर वाटूं लागलें. जसजशी ती गात होती तसतसा माझा संशय जास्त जास्त वाढत होता. त्यादिवशीं रात्रीं त्या दुष्टांनीं ज्या स्त्रीला बांधून ठेवलें होतें व जिचा अंत झाला असें समजून माझ्या मनांत कितीतरी दिवस घोळत असलेली ती गोष्ट मीं अजिबात विसरून गेलों होतों. ती स्त्री— माझी सांप्रतची अर्धांगी— मालती तर नसेलना, असें मला क्षणोक्षणीं वाटत होतें. तात्पर्य, गाण्याच्या आनंदाच्या भरांत माझा देह मात्र तल्लीन होता; पण अंतःकरणांत ह्या वरील विचारांनीं जणुं काहूरच माजविलें होतें.

अशारीतीनें ती गाण्याच्या अगदीं ऐन रंगांत असतांना तिचें एक पद संपून तिनें दुसऱ्या पदास सुरुवात केली. तें पद माझ्या चांगलेंच ओळखीचें होतें. कारण त्या दिवशीं रात्रीं त्या स्त्रीचें गाणें ह्याच पदांत एकदम बंद झाल्याचें मला चांगलें आठवत होतें म्हणून माझ्या संशयानें जास्तच उचल खाल्ली व मालती ही जर तीच स्त्री असेल तर आतां आपल्याला कांहीं तरी चमत्कारिक प्रकार पहावयास खास सापडेल असा माझ्या मनाचा पक्का ग्रह होऊन मीं मालतीकडे व विशेषतः तिच्या चलनवलनाकडे अगदीं बारकाईनें पहात राहिलों. पण त्या पदाचे फार तर चार चरण झाले असतील इतक्यांत तिनें मोठ्यानें एक किंकाळी मारली व ती धाडकन् खालीं पडली !

हें असें कांहीं तरी होणार असें मला पूर्वीं वाटलेंच होतें व त्याप्रमाणें मी सावधही होतोंच. सबब ती खालीं पडत आहे असें पहातांच मीं झटकन् पुढें झालों व ती बेशुद्ध स्थितींत असतांनाच तिला कोंचावर आणून स्वस्थ निजविलें. तिला जबर मूर्छा आली होती,

पण तींतून तिला सावध करण्याचें साधन जवळपास कांहींच दिसेना. मी अत्यंत खिन्न झालों व भीतीनें तर माझी नुसती त्रेधा उडवली. शेवटीं जवळच्या हातरुमालानेंच तिला वारा घालूं लागलों.

सुमारें दहा मिनिटांनीं ती शुद्धीवर आली व तिनें अंगाला आळे-पिळे देऊन आपले विशाल नेत्र उघडून एकदां मजकडे पाहिलें. वाचकहो, ही तिची दृष्टी इतकी क्रूर होती कीं, तिची माझी नजरानजर होतांच मी तर अगदीं भेदरून गेलों. तिच्या दृष्टींत मूर्तिमान् क्रोध भरलेला असून सूड घेण्याची प्रबळ इच्छा महातेजानें चमकत होती. ती माझ्याकडे एकसारखी पहात होती; पण माझ्यानें तिच्या नजरेस नजर देववेना. मीं नुस्ता तिचा हात माझ्या हातांत धरला व सहज बाजूला म्हणून नजर फेंकली तों त्या पलीकडच्या खोलींत मला कांहीं हलल्यासारखा भास झाला. म्हणून मुद्दाम तिकडेच नजर फेकली तों त्याठिकाणीं जो एक भयंकर चमत्कार नजरेस पडला त्यानें माझी गाळणच उडाली. माझ्या अंगांत कांपरें भरलें. घामानें सर्वांग भिजून भीतीनें माझे डोळेच मिटले ! !

वाचकहो ! तो प्रकार काय होता तें क्रमानें येईलच; पण सध्यां मीं तो लिहीतों आहे तरी सुद्धां तेवढ्यानेंच जणुं कांहीं तो मी आतांही पहातों आहे असें वाटून माझ्या हाताची गति आकुंठित होत आहे ! भीतीनें सर्वांग इतकें कांपत आहे कीं, तो भाग पुढील प्रकरणावर ठेवून मी सध्या कांहींवेळ विश्रांति घेतों.

---

## प्रकरण बारावें.

तो भयंकर देखावा काय होता हें जाणण्याची जशी सांगत वाचकांना जिज्ञासा झाली असेल, त्याचप्रमाणें मलाही त्यावेळीं तो काय होता तें पहाण्याची झाली. मी त्या पलीकडल्या खोलीकडे नीट लक्ष देऊन पाहूं लागलों तों माझ्या दृष्टीस तीन चार मनुष्यें पडलीं. माझ्या खोलींत जळत असलेल्या मेणबत्तीचा प्रकाश माझ्याच खोलींत पुरेसा नव्हता मग तो त्या खोलींत कितीसा जाणार ? तथापि त्या अंधुक उजेडांतही त्यांपैकीं एक दोन व्यक्त्या मी चांगल्याच ओळखल्या. भिंतीजवळ एक मेज होतें असें मीं पूर्वींच सांगितलें आहे. त्या मेजासमोर भिंतीकडे पाठ करून तीन इसम उभे होते. त्यांपैकीं मध्यभागीं असलेली व्यक्ती म्हणजे माझे मामेश्वशुर शांताराम डाक्टर होत, त्यांच्या उजव्या बाजूला एक उंचसा इसम उभा होता; परंतु तो कुठें पाहिला असल्याचें मला आठवेना ! त्याचप्रमाणें त्यांच्या डाव्या हाताशीं एक लठसा इसम उभा होता. तो गोरा असून मला वाटतें एका डोळ्यानें अंधळा असावा. परंतु हा सुद्धां कधींही माझ्या पहाण्यांत नव्हता. ह्या तिघांच्याही चेहऱ्यावर भीति व आश्चर्य स्वच्छ दिसत होतें. तिघेही जण एकदम अगदीं टक लावून कशाकडे तरी पहात असावेत असें दिसत होतें. त्या तिघांपैकीं एकजण नुसता खिशांत हात घालून भीतीनें गर्भगळित असा उभा होता. डाक्टर व तो दुसरा लठ इसम मात्र हात वर करून जणुं कांहीं कुणाला तरी थांबवीत असावेत असें दिसत होतें.

वाचकहो, हे इतक्या उत्कंठेनें कुणाकडे बरें पहात असावेत व त्यांना आश्चर्य वाटण्याजोगें असें तेथें काय बरें चाललें असावें ? पण तुम्हांला

त्याची फारशी चौकशी करावयास नको. तुमची दृष्टी त्या लोकांच्या समोर फिरवा म्हणजे टेबलाच्या पलीकडे काय चाललें आहे तें आपोआपच दिसून येईल.

तो पहा, पलीकडे हणमंत उभा आहे. त्यानें अस्तन्या वर सारल्या असून डोळे इंगळासारखे लाल केले आहेत ! कुणावर बरें एवढा तो रागावला असेल ? पण तें पहा, त्याच्या उगारलेल्या हातांत तुम्हांला कांहीं दिसतें काय ? अरेरे–तो पहा त्यानें जंबिया उगारून समोर असलेल्या इसमाच्या छातींत भोंसकला ! ! कोण राक्षसी कृत्य हें ! किती नीच हा हणमंतराव ! इतक्या लोकांमध्यें प्रत्यक्ष खुनासारखें अंगावर शहारे आणणारें कृत्य करावयास त्याचा हात धजला तरी कसा ! इतका प्रकार पाहून माझ्या अंगांत भीतीनें कांपरें भरलें व माझे डोळे मिटले.

कांहीं वेळानें माझी नजर सहज त्या खोलीकडे गेली तरी सुद्धां तो देखावा तसाच दिसत होता. ह्यावेळेस मला त्या ठिकाणीं आणखी एक नवी व्यक्ती दिसत होती. ही तर माझ्या चांगलीच ओळखीची होती; कारण ती व्यक्ती म्हणजे दुसरें कोणी नसून माझी स्वतःचीच मूर्ती मला दिसत होती !

वाचकहो, आतांपर्यंत मला क्षणांत त्या खोलींत खरोखरच खून होत असावा असें वाटलें, क्षणांत मला तो निवळ भ्रम असावा असें वाटलें, क्षणांत तो कांहींतरी पिशाच्चाचा खेळ असावा असें वाटलें पण नाहीं ! माझे ते सर्व तर्क चुकीचे होते. ह्या शेवटच्या गोष्टीनें माझ्या डोळ्यांपुढें लख्ख उजेड पडला ! हा काय प्रकार होता तें आतां मला स्वच्छ कळून आलें ! त्यादिवशीं रात्रीं माझ्या अंधावस्थेंत

जी गोष्ट मीं अनुभविली– तो प्रसंग काय होता तें आतां मला साफ पहावयास सांपडलें ! अरेरे ! कोण निर्दयपणा हा !

इतक्या गोष्टी मला समजल्यानंतर त्यावेळीं ज्या स्त्रीचें त्यांनीं तोंड दाबून ठेवलें व जिचा आतांपर्यंत केव्हांच अंतही होऊन गेला असेल असें मला वाटत होतें. ती सुकुमार स्त्री म्हणजे दुसरी कोणी नसून माझी प्रिया मालतीच होती ह्याबद्दल तर मला काडीमात्र शंका उरली नाहीं ! हा खून हाच तिला झालेला शोक ! त्याचाच धक्का तिला बसून तिची प्रकृती बेताल झाली होती यांत शंका नाहीं, अशी माझी पक्की खात्री झाली. परंतु ज्याचा खून झाला तो कोण होता ? खात्रीनें तिचा व त्याचा कांहींतरी तसाच नाजुक संबंध असला पाहिजे. नाहींपेक्षां त्याच्यासाठीं हिची अशी अवस्था झाली नसती. तो मनुष्य आतांपर्यंत मला नीटसा दिसला नव्हता. त्याच्या छातींत तें दुष्ट हत्यार अर्धें अधिक घुसलें असल्यानें त्याचे प्राण त्याला सोडून जाण्याच्या तयारींत होते व बिचाऱ्याचें मस्तक निर्जीव होऊन खालीं छातीवर आलें होतें. अशा स्थितींत मला त्याचा चेहेरा दिसेना म्हणून मी मोठें धैर्य धरून पुनः एकदां तिकडे पाहिलें. तों काय चमत्कार ! तो देखावा नाहींसा झाला ! माझी उत्कंठा ह्याहीवेळीं जागच्याजागींच दडपून गेली ! !

हा प्रकार काय असावा ह्याची मला कांहींच कल्पना होईना. हा भ्रम म्हणावा तर तो प्रकार इतका वेळ टिकला कसा ? मालतीच्या अंगांतली ही अद्भुत शक्ती म्हणावी तर ती इतके दिवस अशी मुग्ध कां होती ? कांहीं पिशाच्चाचा खेळ म्हणावा तर तो आम्हां उभयतांनाच दिसावा असा त्याचा योग होता कीं, काय ह्याबद्दल माझा कांहींच

तर्क चालेना. ह्या गोष्टीला तुम्हीं कांहींही म्हणा; पण मी तर ह्याबद्दल मालतीचेच आभार मानतों. कारण अशा अपरात्रीं ह्या ठिकाणीं येऊन जी भयंकर गोष्ट मीं प्रत्यक्ष अनुभवली असून व त्यावेळीं ह्या खुनाचा सूड खात्रीनें उगवीन अशी शपथ घेतली असूनही ती मी इतके दिवस अजिबात विसरून गेलों होतों ती गोष्ट आज माझ्या मालतीनें प्रत्यक्ष दाखवून माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें ही कांहीं लहान सहान का गोष्ट होती ! प्रिये मालती, धन्य आहे तुझी. त्यावेळीं तुझे चाललेले ते हाल प्रत्यक्ष माझ्या हृदयांत सारखे घोळत असूनही मी मूर्ख इतके दिवस गप्प बसलों ह्याची क्षमा कर. आतां मात्र त्या चांडाळांचा पक्का सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीं—ह्याबद्दल फार काय पण तुझीच शपथ मी वाहतों.

ह्याप्रमाणें माझ्या मनांत अनेक तर्क चालले होते. तथापि मधून मधून मी त्या खोलीकडे पहात होतेंच. परंतु त्या ठिकाणीं मला पुनः कांहींही दिसलें नाहीं. त्या अधमांच्या नीच वृत्तीला बळी पडलेला तो बिचारा दुर्दैवी प्राणी कोण होता हें जाणण्याची मला फार इच्छा होती; परंतु ती सफल होण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. शेवटीं कंटाळून मी मालतीला शुद्धीवर आणण्याच्या खटपटीला लागलों. परंतु तिनें डोळे मुळींच उघडले नाहींत अगर हातपायही हालविले नाहींत ती स्वस्थ निश्चेष्ट पडली होती आणि दीर्घ व ऊष्ण श्वासोश्वास टाकीत होती. असो. आतां ह्यापेक्षां कांहींही जास्त समजण्याचा तर मार्गच नव्हता म्हणून निराश होऊन मीं मोठ्या कष्टानें तिला उचलून घेतलें व हातांत मेणबत्ती धरून एकदांचा कसा बसा खालीं आलों.

बराच वेळ झाला तरी त्या रस्त्यानें कोणी जागारा येणारा दिसेना.

तेव्हां अशा स्थितींत येथें कितीवेळ बसावयाचें असा विचार येऊन मी तर अगदीं जेरीला आलों होतों. थोड्यावेळानें दूरच्या एका चौकीवरून चार ठोके वाजल्याचा आवाज ऐकूं आला तेव्हां कुठें मला जरा हुषारी आली. अंमळशानें त्या गल्लींत बायकांची चाहूल सुरू होऊन जातीं वाजूं लागलीं. इतक्यांत त्या रस्त्यांत एक व्हिक्टोरियाही येत असल्यासारखी दिसली. ती जवळ येतांच पाहिलें तों ती रिकामी होती. मग काय, तिला एकदम उभी करवून मालतीला मोठ्या सावधगिरीनें तींत निजविलें व तें घर वगैरे नीट लक्षांत ठेवून तडक घरीं आलों.

घरीं येऊन पहातों तों तेथें सुंदराव, काशी वगैरे मंडळीची मारे धांदल उडून गेली होती. माझी व मालतीची एकसारखी चवकशी सुरू होती. जिकडे तिकडे तपासासाठीं माणसें पाठविलीं होतीं. एकंदरींत सारा गोंधळ उडून गेला होता. पण आम्हीं अगदीं वेळेवर गेल्यानें पुनः थोड्याच वेळांत स्थिरस्थावर झालें.

मालतीला घरीं आणल्यावर थोडीशी झोंप लागून ती पुनः सात वाजण्याच्या सुमारास जागी झाली. ह्या रात्रीच्या प्रकारानें तिच्या प्रकृतींत कांहीं तरी चांगला परिणाम झाला असेल अशी मला फार आशा होती; पण ती सर्व व्यर्थ गेली ! इतकेंच नव्हें, तर ती उलट जास्त बिघडली. आतां ती निजलेल्या जाग्यावरून मुळींच हालेना. भाषा तर बंद होतीच व आतांपर्यंत जें तिच्या डोळ्यांत एक प्रकारचें तेज होतें तें जाऊन मुद्रेंत वेडेपणाची झांक मारूं लागली. असो.

दोन प्रहरीं जेवणखाण झाल्यावर किंचित् विश्रांतीकरतां म्हणून मी वर दिवाणखान्यांत गेलों तों नित्याप्रमाणें हणमंतराव हजर झाला.

त्याला पाहतांच माझ्या डोळ्या समोर तो रात्रीचा प्रकार उभा राहिला व त्या योगानें मला त्याचा इतका त्वेष आला कीं, मी देहभान विसरण्याच्या अगदीं बेतांत होतों. पण मला त्या खुनासंबंधानें महत्वाचा भाग तो अद्याप समजायचाच होता व तो समजावयास हणमंतरावच कायतो एक मार्ग होता ही गोष्ट माझ्या तात्पडतोब ध्यानांत आली. अर्थात् मला माझा त्वेष तसाच गिळावा लागला व त्याच्याशीं नित्याप्रमाणें वागणूक ठेवावी लागली. त्यानें येतांच प्रथम " मालतीचें कसें काय आहे ? " ह्मणून विचारलें. ह्या नंतर हिकडच्या तिकडच्या सुमारें एक तासभर गप्पा होऊन त्यानें जाण्याची इच्छा दर्शविली. जातांना त्यानें त्याच रात्रीं कलत्त्यास परत जाणार असल्याचेंही सांगितलें. मीं त्याला पुनः पूर्ववत् मालतीबद्दल विचारलेंच; परंतु त्यानें ह्यावेळींही वायदाच केला. आपण पुनः लवकरच येणार असल्याचें निमित्त सांगून जाण्याकरतां तो उठला सुद्धां.

ही शिकार हातची गेली असतां पुढें पश्चात्ताप होईल सबब आतां उपेक्षा करूं नये. काय होईल तें होवो पण ह्याच बैठकीला सोक्षमोक्ष करून टाकला पाहिजे असा माझा निश्चय ठरला व मीं त्याला आणखी थोडावेळ बसण्याचा आग्रह केला. परंतु त्यालाही न जुमानतां जेव्हां तो जाऊं लागला तेव्हां मात्र मला राजरोस व्हावें लागलें. मीं त्याचा हात धरून " तुम्हाला बसलेंच पाहिजे ! " असें सांगितलें.

माझ्या वृत्तींतला हा चमत्कारिक फरक पाहून तोही जरासा चपापला; पण क्षणार्धांत हंसून म्हणतो, " वसंतराव, भलत्याच वेळीं काय ही थट्टा ! सोडा, जाऊंद्या मला ! अद्याप मला बरींच कामें आहेत ! "

ह्यावेळेस हा लघळपणा मला काय कामाचा होता ! मींही त्याचा

हात तसाच धरून, " हणमंतराव, आतांपर्यंत झाली ती सर्व थट्टाच झाली; पण आतां माझ्याशीं गांठ आहे. म्हणून म्हणतों कीं, माझ्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हाला सरळ सरळ द्यायचीं आहेत कीं कसें ? " असें जरा दरडावून म्हटलें.

हा प्रश्न तर त्याला झोंबलाच पण त्यानें तेवढ्यांत आपली मुद्रा पालटली व म्हणतो, " छे छे ! शर्थ झाली बोवा तुमची. बोला, काय ह्मणतां तरीं काय तुम्ही ? "

मी:– हणमंतराव, आतां हे लपंडाव पुरे करा ! बोला, मालतीबद्दल आणखी काय माहिती आहे तुम्हाला ?

हण०:– अहो, खरोखरच कांहीं नाहीं ! असती तर मीं तुम्हाला ती सांगितली नसती का ?

मी:– पहा, नीट विचार करा ! अखेर फार जड जाईल, म्हणून पुन: एकदां सांगतों.

ह्यावेळेस मात्र त्याची चर्या जरा कावरीबावरी झाली. तो हिकडे तिकडे गोंधळल्यासारखा पाहूं लागला व कांहीं वेळ विचार केल्यासारखें करून जरा रागानें ह्मणाला, " कां करें ? फार दरडावूनसें विचारतां ? "

मी:–[ रागानें ] अलबत्, मला तसें करण्याचा पूर्ण हक्क आहे, पण जाऊंद्या–माहिती आहे कीं नाहीं बोला !

हण०–[ निश्चयानें ] नाहीं; मला कांहीं माहित नाहीं !

मीं:—असें आहे, तर मग ऐका. मीच सांगतों ती तुम्हाला ! पण आधीं असें सांगा कीं, तुह्मीं ···तारखेला कामाठी पुऱ्यांतल्या एका तुमजली घरांत दोघेचवघे मिळून एका निरपराध मनुष्याचा जो खून केलांत तो काय म्हणून ?

'खून' हीं अक्षरें माझ्या तोंडून निघतांच तो एकदम उठून उभा राहिला व आश्चर्यचकित मुद्रा करून म्हणतो, "काय ? खून ? आणि मीं केला ! पण वसंतराव ! असला घाणेरडा आरोप माझ्यावर करतांना तुम्हीं शुद्धीवर आहांत काय ? बस्स करा ! असली थट्टा माझ्या कामीं पडायची नाहीं !"

तो पुनः जाण्याच्या बेतांत आहे असें पाहून तो कदाचित् आपल्या स्वभावावर जाऊन गडबड करील म्हणून मीं त्याचे दोन्ही हात धरले व जोरानें त्याला रेटीत मागें आणलें आणि माझ्यासमोर उभें करून म्हटलें, "हणमंतराव, आतां हे लपंडाव पुरे करा. तुम्ही केलेल्या खुनाच पत्ता मला पूर्ण लागला आहे. तुम्ही कबूल झाला नाहीं तर ज्यांच्या-समोर तुम्ही कबूल कराल अशांच्या स्वाधीन तुम्हास केल्याशिवाय मी राहणार नाहीं. पण इतक्या थरावर जाण्याचा प्रसंग तुम्ही आणला नाहींत तर त्यांत तुमचेंच कल्याण आहे. मग कसें ?"

त्याचा चेहरा अगदींच फिक्का पडला. अपराध तर त्याच्या तोंडा-वर साफ साफ दिसूं लागला. तथापि त्याच्या मनांत अद्याप कांहींतरी उडवाउडव करावयाची होती असें दिसलें. कारण तो बराच वेळ विचार करून म्हणाला, "वसंतराव, मी तुमच्या घरांत इतका वेळ बसलों, ही माझी चूक तर खरीच; पण तीबद्दल ही शिक्षा फार जबर आहे. खरोखर माझ्या हातून खुनासारखें नीच कृत्य झालें असेल अशी तुम्हाला शंका तरी कशी आली ?"

मला तर त्याची जास्तच चीड आली. कारण चोर तो चोर आणि वर शिरजोर ! म्हणून मीं त्याचे दोन्ही हात घट्ट धरून त्याला जोरानें हलवला व म्हणालों "शंकाच कशाला ? प्रत्यक्ष पुरावा देतों पाहिजे

तर. त्या वेळेस तुमचे ते डाक्टर शांताराम असे मधोमध उभे होते. त्यांच्या दोन्ही बाजूंना दुसरे दोघे इसम उभे होते व तुम्हींच एका जंबियानें तुमच्या समोर उभा असलेल्या बिचाऱ्या एका निरपराध मनुष्याचा खून केलांत ! का, हें खरेंना ? कीं आणखी कांहीं जास्त पुरावा पाहिजे ? "

ह्या भाषणानें दुसऱ्या एखाद्या अर्धवट अपराध्याची तर गाळणच उडाली असती; पण हणमंतराव पक्का बेरड असल्या कारणानें त्याच्या अंगीं उलट जास्त धैर्य आलें. तो रागानें सोडवून घेण्यासाठीं धडपड करूं लागला; पण असें तो करील हीं शंका मला पूर्वींच आली असल्यानें माझी अगोदर पासूनच तयारी होती. शिवाय मीही त्याच्यापेक्षां चांगला सशक्त होतों; म्हणून त्याला चांगला दाबून, ठेवून, " हां! असे बेभान होऊं नका ! लक्ष्यांत असूं द्या कीं, तुम्ही कलकत्त्यांत नसून ह्या मुंबईत–माझ्या घरांत आहांत! " अशी चांगली जरब दाखविली तेव्हां तो किंचित् नरम आला. त्याची धडपड कमी झाली तरी पण मीं त्याला सोडलें नव्हतें. तो आवेशानें म्हणाला, " होय, केला, केला, मींच तो खून केला ? आणि तसें करण्याला मला कारणही पण तसेंच होतें! पण हें सर्व तुम्हाला सांगितलें कुणी ? त्या कार्टीनें–मालतीनें — "

माझ्या स्त्रीची ही नालस्ती मला कशी खपणार ! मीं लागलीच त्याला आणखी एक हिसका देऊन म्हटलें " खबरदार ! तिचा तुम्हाला संशय घेण्याचें बिलकुल कारण नाहीं ! हणमंतराव, हा खून झाला त्यावेळीं मीं स्वतः हजर होतों– समजलांत ? "

ह्या भाषणानें त्याला आश्चर्य वाटणें साहजिक होतें. तो चकित्

होऊन एकदम दचकला व “ काय म्हणतां तरी काय तुम्ही ? ” असें म्हणाला.

“ पहा, माझ्याकडे नीट पहा म्हणजे तुम्हालाच दिसून येईल मी तेथें होतों कीं नाहीं तें ! हणमंतराव, ज्याचा तुम्हीं गळा दाबलात, ‘ पिस्तुलानें मेंदू उडवून देईन ’ म्हणून भीति घातलीत व ज्याला अखेरीस भयंकर अंमली पदार्थ पाजून अंगावरचे कपडे वगैरे फाडून घेऊन दूर नेऊन एका गटारांत फेंकून दिलेंत तो अंधळा मीच बरें काय ? त्यावेळीं मी अंधळा होतों पण आतां मला दृष्टी आली आहे. कां ? आतां तरी ओळख पटते की नाहीं ? ”

माझ्या भाषणांतील प्रत्येक शब्दाला तो दचकत होता. क्षणांत त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य, तर क्षणांत भीती, तर क्षणांत सूड घेण्याबद्दल आवेश असे नानाप्रकारचे विकार दिसत होते. त्याला हें माझें सांगणें अगदीं खोटें वाटलें म्हणून कीं काय, त्यानें दोनतीन वेळ नीट निरखून पाहिलें व मींच तो अशी जणूं त्याची खात्री झाल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन, तो अगदीं गळून गेला व एका खुर्चीवर मूर्च्छा येऊन पडला. कांहीं वेळानें जरा अंग झाडून डोळे पुसून तो मला ह्मणतो, “ तरी मला शंका आली होती, पण काय करूं ! त्या नीचांनीं घात केला ! जाऊंद्या, त्यांचे ते भोगतीलच. बरें तर मग आतां माझ्याकडून तुम्हाला काय माहिती पाहिजे आहे बोला ? बहुतेक सर्व तुम्हाला समजलेंच आहे म्हणा ! ”

“ आतां कुठें तुह्मी वळणावर आलांत आं ? मला काय माहिती पाहिजे आहे ती मी इतके दिवस तुह्माला एकसारखी विचारीत असतांना तुह्माला ती आतांपर्यंत आठवेनाशी व्हावी हें मोठेंच आश्चर्य ! तरी कांहीं हरकत नाहीं, मी पुनः सांगतों. मालतीची प्रकृती ही अशारीतीनें बिघड-

ण्यास कारण ह्मणजे तो खूनच. ही तर आतां माझी पक्की खात्री झाली आहे. परंतु जें कांहीं पाहिजे आहे तें हेंच कीं, ज्याचा खून झाला तो मनुष्य कोण व त्याचा व मालतीचा संबंध काय हें समजलें पाहिजे. ”

हण०:—वसंतराव, जरा शांत व्हा ! आह्मीं—नाहीं मीं एकट्यानें तो खून केला ही गोष्ट खरी व त्याचें प्रायश्चित्त भोगण्यास मी केव्हांही तयार आहें. तो इतर कुणालाही समजता तरी हरकत नव्हती; परंतु तो तुह्माला कळला ही फार वाईट गोष्ट झाली ! ती हकीकत तुम्हाला न सांगतां कांहीं अन्य तऱ्हेनें जर मालतीची प्रकृती सुधरेल तर पहावें म्हणून मी इतके दिवस उडवाउडवी करीत होतों; परंतु अखेर ती हकीकत तुम्हाला कळलीच. ”

मी:— कां बरें ? सगळ्या जगाला कळली तरी हरकत नाहीं ! आणि मलाच तेवढी ती हकीकत कां कळूं नये बोवा ? एका निरपराध मनुष्याचा खून आणि मला तो कां कळूं नये ?

हण०:—अहो, निरपराध ! राव तुम्हाला माहित नाहीं ! त्याचे अपराध इतके होते कीं, त्याच्या एकेक अपराधाच्या एकेक अंशागणिक त्याचा एकेक वेळ खून झाला असता तरी हरकत नव्हती ! काय करूं हो ! त्याला देह एकच पडला ! नाहींतर—पण जाऊंद्या ! आतां तुह्माला कां कळूं नये म्हणून विचाराल तर त्यालाही तशींच कारणें होतीं. तीं तुम्हाला सांगावयास माझी छाती होत नाहीं !

मी:—कां बरें ?

हण०:—तुम्हाला तीं समजलीं तर तुम्हाला उलट त्रास होणार व मालतीबद्दलच्या तुमच्या दुःखांत आणखी भर पडणार म्हणून !

मी:—तर मग मला तीं समजलींच पाहिजेत.

हण०:—पहा ! नीट विचार करा—एकदां माझ्या तोंडतून शब्द बाहेर

गेल्यावर मग ते माझे नव्हत ! म्हणून सांगतों कीं पहा ! अजून तरी हा विषय एवढ्यावरच आटपतां घ्या.

हा ज्याअर्थीं एवढा बजावून सांगतो त्याअर्थीं ज्यायोगानें मालती-बद्दल माझें मन कलुषित होईल असें तर हा कांहीं सांगणार नाहींना ? अशी मला शंका येऊन एकवार त्याला तेवढ्यावरच सोडून द्यावा असें वाटलें. परंतु पुनः असा विचार केला कीं, कांहीं का असेना. एकवार खुलासा झाल्याशिवाय तसें करणें बरें होणार नाहीं. म्हणून मीं त्याला म्हटलें, " केला, पुरता विचार केला. तुम्ही कांहींही सांगा, त्यांत माझें कसलेंही व कितीही नुकसान असो, मला पत्करलें. पण मला तें सर्व समजलेंच पाहिजे ! "

हणमंतरावानें सुमारें दोन मिनिटें विचार करून उत्तर दिलें. " नाहीं, तुम्ही ऐकणार नाहीं अशी माझी पक्की खात्री होती. ही गोष्ट तुम्हा-पासून गुप्त राहती तर बरें होतें. परंतु तुमचा आग्रहच असेल तर ऐका. पण मग माझ्यावर दोष नसावा म्हणून– "

" हा चारगटपणा नको, काय असेल तें एकदां स्पष्ट बोला ! " असें मीं जरा त्रासून म्हटलें.

हण०:– ठीक आहे. वसंतराव, त्या मनुष्याचा व मालतीचा तसाच कांहीं नाजुक संबंध होता–तो आम्हांस पसंत नव्हता —म्हणून–

ह्या पुढचे त्याचे शब्द माझ्यानें ऐकवले नाहींत. त्याच्या ह्या एवढ्याच शब्दांनीं माझ्या सर्वांगांत विष भिनल्याप्रमाणें होऊन माझ्या अंगाची आग उठून गेली. क्रोधानें माझें सर्वांग कांपूं लागलें व संतापातिरेकानें मला चक्कर येऊन मीं धाडकन् पडलों ! त्या अवधींत संधी साधून तो केव्हां गेला हें मला समजलें सुद्धां नाहीं.

---

## प्रकरण तेरावें.

कांहीं वेळानें मी चांगला देहभानावर आलों व पहातों तों हणमंतराव तें वाग्विष माझ्या कानांत ओतून निघून गेला होता. किती तरी तें विष जालीम! त्यानें माझ्या सर्वांगाचा नुसता डोंब उडवून दिला होता. अशावेळीं तो माझ्या दृष्टीआड झाला हेंही एका अर्थीं बरेंच झालें. नाहींपेक्षां बिचारा माझ्या संतापाग्नीला फुकट बळी पडला असता !

असो. मालतीची स्थिति मात्र ह्यानंतर अगदींच चमत्कारिक झाली. ती दिवसभर डोळे मिटून पडलेली असे. तिचें खाणें पिणें सर्व कांहीं बंद होतें. मधून मधून ती एकदम हसे व जणुं कांहीं तिच्या प्रेमाचा विषय तिच्या जवळ उभा आहे असा तिला भास होऊन ती आपले दोन्ही हात पुढें करून कांहीं बोलावयाचा प्रयत्न करी. ह्या वेळचे तिचे शब्द अगदीं अस्पष्ट असल्यामुळें केवळ आवाजापेक्षां त्यांतून अर्थनिष्पत्ती अशी मुळींच होत नसे. कांहीं वेळानें लगेंच तो विषय दूर झाला असें वाटून ती एकदम मोठमोठे हुंदके देऊन रडूं लागे. त्यावेळचे तिचे ते आळेपिळे व अंगविक्षेप पाहिले म्हणजे तिला कांहीं तरी जबर अंतस्थ वेदना होत असल्या पाहिजेत अशी माझी खात्री होई; आणि ज्याअर्थी ह्या सर्वांचें मूळ म्हणजे तो खून व तोही त्या सुंदर तरुण मनुष्याचा—हें आतां मला माहीत होतें त्याअर्थीं तो मनुष्य म्हणजे केवळ माझा प्रतिस्पर्धीच असावा अशी माझी खात्री होई ! अर्थात् मालतीच्या प्रेमाचा विषय असा जबरदस्तीनें जगांतून नाहींसा केल्यामुळें तिची प्रकृती बिघडली खास

असें मला वाटे ! अरेरे, किती नीच तो थेरडा शांताराम ! मालती उपभुक्त आहे. तिच्या प्रेमाचा ओघ पूर्वींच दुसऱ्यावर असून व तो अशा रीतीनें छिन्नभिन्न झाला ही गोष्ट पुरी माहीत असूनही त्या अधमानें तिला माझ्या गळ्यांत बांधून माझ्या साऱ्या जन्माचें मातेरें करण्यांत असा काय त्यानें स्वार्थ साधिला ! ती थेरडी मावशी—तिलाही हें सारें माहित असलेंच पाहिजे ! नाहींपेक्षां द्रव्याच्या लालचीनें कां होईना; पण "तुम्हीं हा नाद सोडून द्या" असा संदिग्ध इषारा देण्याची तिला बुद्धी झाली नसती ! हाय ! पण मी तरी त्यावेळीं मालतीच्या केवळ सौंदर्यानें कसा अंधळा बनलों होतों ! संशयाला असा जबरदस्त पुरावा असतांही तो अगदींच झुगारून देऊन, तिची जात, कुल, शील, फार काय नुसतें नांवही काय आहे ह्याची मुळींच चवकशी न करतां एकदम आपण होऊन ही घोरपड गळ्यांत बांधून घेतली. पण आतां त्याचा उपयोग काय ! तिच्या प्रेमाचा ओघ जबरदस्तीनें छाटला गेला ह्मणून होत असलेले तिच्या मनाचे व देहाचे हाल मीं पहावें—इतकेंच नव्हे तर ते पाहून माझी अत्यंत शोचनीय स्थिति माझ्या डोळ्यापुढें उभी राहून त्यामुळें माझ्या अंतःकरणाचे शतशः तुकडे व्हावेत हेंच त्यावेळीं माझ्या नशिबीं आलें होतें ! ! त्या खुनाचा तर प्रतिज्ञा केल्याप्रमाणें मीं तपास लावला. पण हायरे दुर्दैवा, त्या तपासाचा काय हा भयंकर परिणाम ! अर्थात् ह्याउपर मालतीपासून आपणाला काडीमात्र सुद्धां सुखाची आशा नाहीं ! व जरी ती असती तरी मला तें मुळींच नको होतें. कारण जी प्रत्यक्ष दुसऱ्यानें उपभुक्त असें जें मला समजलें होतें तिच्यापासून मला सुखाची अपेक्षा कशी होणार ! तात्पर्य, हा वरील प्रकार

झाल्यानंतर मी तर तिची बहुतेक आशाच सोडून दिली होती. मात्र ती कशी झाली तरी मनुष्य आहे, इतकेंच पुढें ठेवून त्याप्रमाणें तिच्याकडे माझी दृष्टी होती !

परंतु इतकें झालें होतें तरी मालतीसंबंधानें थोडीशी आशा करावयास एक गोष्ट कारणीभूत होती. कारण मालतीच्या अंगच्या त्या दिवशींच्या अद्भुत सामर्थ्यामुळें मला दिसलेला तो विलक्षण देखावा व त्यानंतर घरांत वरचेवर दृष्टीस पडणारे तिचे चाळे एवढ्यावरून जरी हणमंतरावानें सांगितलेला मजकूरच सर्वथैव खरा ठरत होता, तरी पण त्यांतही एक जबर शंका निघत होतीच. मालतीचा व त्या मृत मनुष्याचा तसाच कांहीं तरी निंद्य संबंध होता व म्हणूनच हणमंतरावानें म्हणजे तिच्या भावानें संतापातिरेकांत त्याचा खून केला. अर्थात् तो मनुष्यच तिच्या सर्व प्रेमाचें एकस्थान असल्यानें तिची ही अशी दशा झाली. पण असें जरी सर्वथा समजून चाललें तरी त्या मनुष्याचा खून झाल्यानंतर मालतीच्या मनावर हा परिणाम होईपर्यंत मध्यंतरीं जो काळ लोटला त्याची वाट काय ? दुःखाचें कारण आज घडावें व त्याचें दुःख मात्र सावकाश कालांतरानें व्हावें असें कसें होईल ? मालतीचें प्रथम दर्शन झालें तेंही खुनानंतरच. त्यावेळीं तिची स्थिती अशी नव्हती. शिवाय त्यानंतर किती तरी दिवसांनीं ती व मी त्या टुटाकीवरील घरांत सुमारें एक महिनाभर होतों. परंतु त्या अवधींत मला तसें कांहींच दिसलें नाहीं ! मग हा प्रकार काय ? खरोखर ही शंका कांहीं लहान सहान नव्हती ! कदाचित् ह्या शंकेच्या समाधानानें सर्व भाग उलटण्याचाही संभव होता. ह्मणून मीं त्याबद्दल पुष्कळ विचार केला, पण त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं, उलट

रागाच्या आवेशांत व संतापाच्या भरांत हणमंतरावाला आपण विनाकारण तसाच सोडला ही मोठी चूक केली असें मला आतां वाटूं लागलें.

पण आतां त्याचा काय उपयोग होता! ह्या शंकेनें माझ्या मनांत पुनः दोन विचार उत्पन्न झाले. एक तर हणमंतरावानें माझी आधींच क्षुब्ध झालेली चित्तवृत्ति जास्तच चेतवून कशी तरी आपली सुटका करून घ्यावी एतदर्थ कांहीं तरी खोटी बातमी सांगितली असावी किंवा ही गोष्ट खरी असेल असें धरून चाललें तर खून झाल्यानंतर मालतीचा माझ्याशीं विवाह झाल्यानें कदाचित् ती माझ्याकडून त्याचा तपास करवील व मग सर्व गोष्ट उघडकीस येईल, ह्या भीतीनें त्या चोरांनीं तिच्यावर कांहीं तरी जबरदस्त जादूटोणा केला असावा. त्याशिवाय तिच्या प्रकृतींत लग्न होतांच हा फरक पडावयास दुसरें कारण नव्हतें. या दोन विचारांनीं माझी चित्तवृत्ती द्विधा झाली. ह्यांपैकीं पहिला तर्क जास्त विचाराअंतीं जवळ जवळ चुकीचा ठरला. कारण त्यानें कांहींतरी खोटेंच सांगितलें म्हणावें तर मालतीचे ते हातवारे, तें हसणें, हुंदके देऊन रडणें वगैरेचा मेळ कसा घालावयाचा! अर्थात् त्यानें अगदींच खोटें सांगितलें नव्हतें खास. राहतां राहिला दुसरा तर्क व त्याची शहानिशा होण्यावरच माझा पुढील आयुष्यक्रम अवलंबून होता.

परंतु हा निर्णय आतां व्हावा कसा ही मोठीच पंचाईत होती. कारण हणमंतराव आयता हातांत आलेला निसटला. मावशीनें तर चांगला पांचशेंचा गंडा घालून अगोदरच पोबारा केला होता. राहतां राहिले ह्या कपट नाटकाचे सूत्रधार डॉ. शांताराम. त्यांनीं तर " ह्या नंतर तुमची आमची बहुतेक पुनः भेट होणार नाहीं. " म्हणून मागल्या

खेपेसच सांगून टाकलें होतें. तात्पर्य, या गोष्टीचा पत्ता लागण्याचा कांहींच मार्ग नव्हता. मालतीविषयीं माझें मन अलीकडे इतकें कलुषित झालें होतें कीं, तिच्यासंबंधानें हणमंतरावानें सांगितलेल्या ह्या अत्यंत निंद्य मजकुराचा कायतो एकदां पक्का खुलासा झाल्याशिवाय मला तिच्याकडे नुसतें पाहण्याचीसुद्धां इच्छा होईना; मग प्रेमाची गोष्ट तर बाजूलाच राहिली. अर्थात् काय होईल तें होवो, परंतु तिच्यावरील हा आरोप दूर होऊन ती निर्दोषी आहे अशीच हकीकत जर समजेल तरच परत यावयाचें नाहींपेक्षां घरादाराला व ऐषआरामाला हा शेवटचा रामराम ! असा संकल्प करून मीं पुनः एकवार कलकत्त्यास जावयाचा निश्चय केला. असें करतांना मला साहजिकच पुष्कळ अडचणी आल्या; परंतु माझ्या मनःसंतापापुढें मला त्या दूर साराव्या लागल्या व मी एकेदिवशीं तात्पुरती निरवानिरव करून खिन्न मनानें स्टेशनावर आलों. वाचकहो, यापूर्वीं मी दोन वेळ कलकत्त्याला जाण्यास असाच आलों होतों; परंतु त्यावेळचा तो उल्हास कोणीकडे आणि आतांचा हा संशयकल्लोलानें उडवून दिलेला भडका कोणीकडे ! यावेळेस माझा देह मात्र प्रवास करीत होता; अंतःकरण मुंबईत होतें आणि आतां मीं खुद्द देहभानावर आहे कीं नाहीं ह्याचीच मला भ्रांती होती. अर्थात् अशा स्थितींत घंटा होऊन गाडी केव्हां सुटली व पोंचवावयास आलेल्या माझ्या प्रेमळ सुंदररावानें " नीट जपून रहा, उगच आतताईपणा करूं नको, काय होईल ती हकीकत वरचेवर कळवीत जा. " वगैरे आणखी किती तरी गोष्टी अगदीं डोळ्यांत आसवें आणून मोठ्या कळकळीनें सांगितल्या तिकडे माझें मुळींच लक्ष्य नव्हतें यांत नवल तें काय !

---

## प्रकरण चवदावें.

कलकत्त्यांत पोंचतांच बिऱ्हाडाची वगैरे सोय लावून नंतर ज्या घरांत माडीवर डाक्टर शांतारामची व माझी मागल्या खेपस भेट झाली होती, तें घर महाप्रयासानें शोधून काढलें; पण शोधाअंतीं असें समजलें कीं, डाक्टरांचा व त्या घराचा अर्थाअर्थी कांहींएक संबंध नसून त्यांनीं त्या वेळेपुरती ती जागा भाड्यानें घेतली होती. त्यांचें काम आटपतांच ते तेथून निघून गेले. घरवाल्यास त्यांचा पत्ता वगैरे कांहींच माहीत असण्याचा संभव नव्हता.

ह्याप्रमाणें डाक्टरांचा पत्ता लागण्याचा जो कांहीं थोडा बहुत आधार होता त्याचा तर निकाल लागलाच. त्यांचा धंदा काय होता तें त्यांनीं आपल्या दोन्ही भेटींत अगर हणमंतरावानें मला मुळींच सांगितलें नव्हतें. मिळून त्यांच्या धंद्यावरूनही त्यांचा पत्ता लागण्याची यत्किंचितही आशा नव्हती. एवंच ह्या वेळची सफर म्हणजे अगदीं निष्कारणच होती म्हटलें तरी चालेल.

असें जरी होतें तरी माझे प्रयत्न कमी झाले होते असें नाहीं. मी सारा दिवसभर भटकत असे. निरनिराळ्या धंद्याच्या माणसांजवळ त्यांचा तपास करीत असे. बहुतेक रोज एकदां वेड्यासारखा हायकोर्टच्या बाजूला एक फेरी करीत असे. पण इतकेंही करून रोज निराश होऊन मला घरीं परत यावें लागे. याप्रमाणें सुमारें तीन आठवडे गेल्यावर एके दिवशीं सकाळीं फिरत फिरत जात असतां पोलिसकचेरी जवळ बरीचशी गर्दी जमलेली माझ्या दृष्टीस पडली. सहज काय आहे

म्हणून पाहूं लागलों तों दरवाजावर एक चौकट लावलेली असून ती पहावयास लोकांची मारे गर्दी जमली होती, असें समजलें.

अशी ही चवकट ह्मणजे आहे तरी कशाची हें जाणण्याची मला साहजिक इच्छा उत्पन्न झाली व मीही त्या गर्दींत मिसळलों. धक्काबुक्की करीत एकदांचा त्या चवकटीजवळ येऊन पोंचलों आणि पहातों तों वर कांहीं कैद्यांच्या तसबिरी चिकटवल्या होत्या व त्या पहावयास हा घोळका होता. यःकश्चित कैद्यांच्या तसबिरी पहाण्याकरतां आपण सुद्धां एकाद्या गांवढळासारखे 'आ' पसरून पुढें आलों ह्याबद्दल माझा मलाच विषाद होऊन मीं त्या तसबिरींकडे पाहिलें न पाहिलेंसें करून अगदीं परतावयाच्या विचारांत होतों; पण तेवढ्यांत त्या तसबिरींमध्यें एक चेहरा माझ्या ओळखीचा असावा असा संशय आला ह्मणून परत फिरून मी तो चेहरा नीट पाहूं लागलों.

तो कैद्याचा विचित्र पोषाख, बोट बोट लांब हजामत वाढलेली व काळजीनें व अन्य त्रासानें चेहऱ्यावर आलेला एक प्रकारचा भेसूरपणा ह्या योगानें तो चेहरा साधारण एकाद्या मनुष्यास ओळखावयास कठीण पडला असता; परंतु मी जरी तो फक्त तीनदांच पाहिला होता, तथापि अलीकडे तो चेहरा एकसारखा माझ्या अंतःकरणांत घोळत असल्या कारणानें ती व्यक्ती ह्मणजे आमचे डा॰ शांताराम हें मीं ताबडतोब ओळखलें. ही ओळख पटतांच मामासाहेब अशा स्थितींत कां ह्याबद्दल मला आश्चर्य वाटून मी दचकलों. परंतु वास्तविक पहातां मला आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. कारण प्रत्यक्ष खुनासारख्या नीच कृत्यांत सामील असणाऱ्या मनुष्याचा परिणाम असा न व्हावा तर तो कसा असावा ? परंतु कसे झाले तरी ते

मालतीचे मामा एवढ्याचकरतां त्यांना—म्हणजे तूर्त त्यांच्या तसबि- रीला—बंदिवासाच्या पोषाखांत पाहून मी जरासा कचरलों इतकेंच ! !

ती तसबीर डा० शांतारामाची हें मीं पक्कें ओळखल्यावर माझ्यानें तेथून कसें जावबेल ? पण सर्व गर्दी मोडेपर्यंत माझ्यानें वाट पहावेना. मीं तावडतोब पहाऱ्यावरील शिपायाला विचारून पोलिस सुपरिन्टेंडेंटची भेट घेतली व कांहीं जरूरीच्या कामाकरितां डा० शांतारामाची भेट घेण्याची इच्छा दर्शविली. डा० मजकूर हे कैदी असून बाहेरच्या चवकटींत त्यांची तसबीर आहे इतका मजकूर मीं सांगितला व त्यांनीं आपलें नोटबुक काढून पाहिलें. तथापि डा० शांताराम म्हणजे अमुक गृहस्थ हीं त्यांना ओळख पटेना. शेवटीं त्यांनीं ती चवकट आंत मागविली व मीं त्यांना ती विशिष्ट तसबीर दाखविली. तेव्हां ते मोठ्या आश्चर्ययुक्त मुद्रेनें " ह्यांचें नांव डा० शांताराम हें तुम्हांला कोणी सांगितलें ? आमच्या डायरींत तर ह्याचें नांव ... असें सांगितलें आहे. " असें विचारूं लागले.

मालतीच्या मामानें डा० शांताराम हें कांहीं तरी खोटेंच नांव सांगि- तलें अशी मला पहिल्यानेंच शंका आली होती व ती ह्या गोष्टीनें आतां खरीही ठरली होती. अर्थात् मला त्यांच्या संबंधानें जी कांहीं माहिती होती ती सर्व साहेबांना इत्थंभूत सांगून टाकावी असें मला प्रथम वाटलें; परंतु पुनः मनांत त्यांच्या संबंधानें किंचित् दया उत्पन्न झाल्यामुळें " असेल कदाचित् तेंही नांव असेल ! आमच्या लोकांत एकाद्या मनु- ष्याचीं दोनदोनही नांवें असूं शकतात. मला त्यांचें हें दुसरें नांव माहीत नसल्यानें मीं त्यांचा त्या नांवानें शोध केला. " असें मी म्हणालों.

असो. ह्या नंतर साहेबांचें व माझें बराच वेळपर्यंत संभाषण झालें.

त्यांत डा० शांताराम— वाचकहो, आतां त्यांचें खरें नांव काय होतें तें मला समजलें आहे; परंतु ज्याअर्थीं त्यांनीं तें इतकें गुप्त ठेवलें होतें, व तसें करण्यांतच त्यांना इतिकर्तव्यता वाटत होती त्याअर्थीं मी तरी थोडक्याकरितां त्यांच्या इच्छेआड कां जाऊं ! —हे एका महाभयंकर खटल्यांत सांपडले असून त्यांजवर अपराध शाबीत झाल्यामुळें त्यांना काळेपाण्याची शिक्षा झाली होती. तसबिरींत त्यांच्या शेजारीं असलेले लोक त्यांचे साथीदार होते व त्यांसह ते सुमारें तीन चार दिवसांत आपल्या अपराधाचीं फळें भोगावयास अंदमानास रवाना व्हावयाचे होते— इतका मजकूर मला कळला.

डॉक्टरांची ही शोचनीय स्थिति ऐकून मला अत्यंत वाईट वाटलें. परंतु ही वेळ शोक करीत बसण्याची नव्हती; इतकेंच नव्हे तर आपण अगदीं ऐन वेळेवर येऊन पोंचलों याबद्दल आनंद मानून आपलें काम करून घेण्याची तजवीज काढण्याची होती. त्याप्रमाणें ही माहिती दिल्याबद्दल साहेबांचे मीं फार फार आभार मानले व कसेंही करून त्यांची एकवार गांठ पडेल अशी व्यवस्था केल्यास मजवर फार उपकार होतील. अशी साहेबांची प्रार्थना केली. प्रथम तर त्यांनीं मला साफ नकार दर्शविलाच; परंतु माझ्या कामाचें महत्व जेव्हां मी अत्यंत दीनवाणीनें सांगून अगदीं त्यांच्या हातांपायां पडलों तेव्हां थोडा वेळ विचार करून त्यांनीं "हो" म्हटलें व मजकडून एक अर्ज लिहून घेऊन दुसऱ्या दिवशीं दहा वाजतां आपणांस येऊन भेटावयास सांगितलें. मी ही मग त्या ठिकाणीं जास्त वेळ बसलों नाहीं. "होईल तेवढी खटपट करून परवानगी आणवाच." अशी पुन्हा एकदां विनंति करून सलाम करून मी आपल्या घरीं निघून गेलों.

त्या रात्रीं अर्थातच मला झोंप आली नाहीं. सारी रात्र डाक्टर, हणमंतराव व त्यांचें नीच कृत्य डोळ्यासमोर दिसत होतें. त्यांतल्यात्यांत सुखाची गोष्ट इतकीच होती कीं, जातां जातां पोलिस आफिसाकडे जाण्याची सुबुद्धि मला अगदीं ऐनवेळीं झाली; नाहींतर जर आणखी दोनच दिवस जाते तर माझी सर्व आशा निष्फळ होणार होती.

असो. दुसऱ्या दिवशीं बरोबर दहा वाजतां मी पोलिस कचेरींत हजर होऊन साहेबांकडे कर्दी पोंचविली. लगेच त्यांनीं मला आंत बोलावून आपल्या जवळ बसावयास खुर्ची दिली व परवानगी आल्याचें सांगितलें. परंतु त्या बरोबरच तुरुंगाच्या कायद्याप्रमाणें त्यांनीं कैद्याची भेट घेण्याच्या ज्या अटी सांगितल्या त्या मात्र जराशा कडक होत्या. " कैदी गजाच्या पलीकडे उभा राहील; त्याच्या समोर उघड्या हवेंत तुह्मांस जातां येणार नाहीं; कैद्याशीं तुम्हांस एक तासापेक्षां जास्त-वेळ बोलतां येणार नाहीं; तुमचें जें कांहीं भाषण व्हावयाचें असेल तें सर्व आमच्या अधिकाऱ्यासमोर झालें पाहिजे व तें भाषण आमच्या अधिकाऱ्याला समजेल अशाच भाषेंत असलें पाहिजे. " अशा त्या अटी होत्या. ह्यांत कोणत्याही तऱ्हेचा फेरफार होणें शक्य नव्हतें. अर्थात् त्या ऐकून " मला मान्य आहेत " असेंच उत्तर देणें भाग पडलें. अटींवर माझी सही होतांच एका जमादारास बरोबर देऊन मला डाक्टरांकडे पाठविण्यांत आलें.

डॉ० शांताराम व त्यांच्या जोडीचे इतर सरकारचे पाहुणे त्या पोलीस चौकींत नसल्या कारणानें जमादार व मी गाडींत बसून निघालों व सुमारें पाउण तासानें एका मोठ्या भव्य इमारतीपाशीं येऊन पोंचलों. तिची ती सबंद दगडी भिंत, तिला समोर एकच दर-

वाजा व कोणी येणारा जाणाराकरितां अर्धवट उघडणारें त्याचें एकच फाटक आणि त्याजवळ उभा राहिलेला तो सशस्त्र रक्षक ह्या गोष्टींवरून ती इमारत म्हणजे तुरुंग होता हें सहज समजून येत होतें. दरवाजाजवळ जातांच जमादारानें मला दूर उभें करून आपण एकटाच पुढें होऊन तो परवानगीचा हुकूम तेथील रक्षकास दाखविला व त्यानें तो वाचून पाहून फाटक उघडल्यावर मला हांक मारली. त्यांनीं माझें नांव गांव सर्व त्या ठिकाणीं लिहिल्यावर जमादार व मी आंत गेलों. तेथून कांहीं अंतरावर आणखी एक दरवाजा लागला. ह्या ठिकाणीं कांहीं विशेष पंचाईत पडली नाहीं. पण ह्या ठिकाणीं जमादाराची व माझी जोडी फुटून मजबरोबर दुसराच एक मनुष्य देण्यांत आला. ह्या दरवाजांतून आंत गेल्यावर मात्र आम्हीं उघड्या पटांगणांत आलों. ह्या पटांगणाच्या दोहों बाजूंना चाळीसारख्या खोल्या असून त्यांपैकीं कांहीं उघड्या तर कांहीं बंद होत्या. त्या खोल्या ओलांडून पुढें आह्मीं दुसऱ्या एका पटांगणांत आलों. ह्या ठिकाणीं सुद्धां खोल्या होत्याच. परंतु ही जागा ह्मणजे कैदी लोकांची काम करण्याची असल्यानें त्याठिकाणीं कांहीं कैदी दळीत होते, कांहीं भांडीं घांसत होते तर कांहीं विणकाम करीत होते. ह्या ठिकाणीं पाऊल टाकण्याच्या अगोदर मला असें वाटत होतें कीं, मनुष्याला कारागृहवास आला ह्मणजे त्याची चित्तवृत्ति चमत्कारिक होऊन तो सारा दिवस अगदीं खिन्न असा बसत असेल; परंतु प्रत्यक्ष तो प्रकार पाहतांच माझा तो भ्रम साफ दूर झाला. ह्याठिकाणीं ते लोक आपापलीं कामें इतक्या खुषीनें व आनंदानें करीत होते कीं, जणुं कांहीं तो आयुष्यक्रम ह्मणजे त्यांना नैसर्गिकच वाटत होता! काय हा संवयीचा जबरदस्त परिणाम! असो; ह्या पटांगणांतून निघून आह्मीं

एका दरवाजावर आलों. त्या ठिकाणीं पुनः एकदां माझें नांव गांव टिपून घेण्याचा समारंभ होऊन आम्हास पलीकडे सोडण्यांत आलें व ह्यानंतर मात्र पटांगण वगैरे कांहीं नसून नुसत्या दूर दूर अंतरावर सात खोल्या होत्या. त्यांपैकीं एका खोलीजवळ आणून त्या मनुष्यानें मला उभें केलें व " हा पहा तुमचा मनुष्य. बोला तुम्हाला काय बोलायचें असेल तें. पण जें बोलावयचें असेल तें मात्र माझ्या समोर बोललें पाहिजे व एक तासानें तुम्हाला माझ्याबरोबर पुन्हा निघालें पाहिजे, हें तुमच्या लक्षांत असेलच. " असें सांगून तो घड्याळ हातांत घेऊन तेथेंच बसला.

त्या खोलींत सर्वत्र अंधार दिसत होता. मला तर डाक्टर त्या खोलींत कुठें आहेत हें दिसतसुद्धां नव्हतें; परंतु आपल्या खोलीजवळ कोणी तरी आलें आहे, असें पाहून तेच हळूहळू पुढें आले व त्यांची माझी नजरानजर झाली. त्यांचें उतारवय, हजामत वाढलेली, अंगावरचा विचित्र पोषाख व हातापायांत घातलेले ते लोखंडी दागिने पाहून मला तर त्यांची कींव आली व त्यांच्याशीं भाषण कसें सुरू करावें हेंच सुचेना ! परंतु डाक्टरांचें काळीज खरोखरच दगडी म्हटलें पाहिजे. कारण तशा स्थितींतही त्यांना किमपि खेद न होतां ते तसेच दरवाजाकडे आले व माझ्याकडे निरखून पाहून ह्मणतात, " कोण बसंतराव ! तुह्मी इथें सुद्धां येऊन पोंचलांत आं ! "

मलाही ह्यावेळीं निर्भीड बनावें लागलें. " होय ! आज तुमची इथें तरी भेट झाली हें मीं माझें सुदैवच समजतों. कारण जर आणखी एकादा दिवस जातां तर तुम्ही म्हटल्याप्रमाणें तुमची माझी पुनः गांठ पडण्याचा कधींही संभव नव्हता ! "

" हो ! असें आहे खरें ! पण आतां पुनः माझी भेट तुह्माला

कशा करतां पाहिजे आहे ? मला जें कांहीं माहीत होतें तें मी तुह्माला मागल्या खेपेसच सांगून चुकलों आहे. ”

ह्या वेळेस एक एक क्षण ह्मणजे सोन्यापेक्षांही मौल्यवान होता. कारण मला फक्त एकाच तासाची परवानगी होती; अर्थात् त्यांच्या प्रश्नांना उत्तरें देत बसून रिकामा वादविवाद करणें शक्य नव्हतें ह्मणून मी एकदम मुद्यावर आलों.

मी:— मामासाहेब, सांप्रतची ही तुमची स्थिति एकाद्या दगडाला सुद्धां पाझर फोडील अशी असून तिचा तुमच्या मनावर मुळींच परिणाम होत नाहीं हें पाहून मला खरोखरीच वाईट वाटतें ! स्वातंत्र्यापरीं स्वातंत्र्य, सुखापरीं सुख, देशापरीं देश या सर्वांना तुह्मी कायमचे आंचवलांत ! तुमच्या प्रकृतीकडे पाहिलें तर जीविताचा सुद्धां संशय येतो. सारांश, मृत्यूच्या अगदीं दरवाजांत येऊन पोंचलांत तथापि तुमचा पीळ अद्याप कायम आहे हें मोठेंच आश्चर्य ! असो; तुमची अजूनही खरें सांगण्याची इच्छा नाहीं तर ऐका मी सांगतों. ”

ह्या नंतर मालतीच्या अद्भुत शक्तीनें मीं जो त्यारात्रीं भयंकर देखावा पाहिला होता त्याची हकीकत त्यांना सांगितली व “ जो मारला गेला तो मनुष्य कोण तो सांगा म्हणजे माझ्या भेटीचें काम झालें. ” असें त्यांना विचारलें.

खुनाची हकीकत ऐकतांच मात्र त्याची कंबर खचली व तो अगदीं पिसाळल्यासारखा होऊन हातपाय झाडूं लागला. परंतु करतो काय, नाइलाज झाला ह्मणून अगदीं हतवीर्य होऊन तो मटकन् खालीं बसला व एकदम, “ अरेरे, त्या हणम्यानें अखेर घात केला आं ! ” असें उसासा टाकून म्हणाला.

मी:— नाहीं त्यानें मुळींच सांगितलें नाहीं.

डॉ०:- तर मग त्या कारटीनें माझा गळा कापला काय !

मी:— नाहीं, आणि ती सांगणार तरी कशी ? तिच्या तोंडून एक अवाक्षरही निघूं नये असा तर तुह्मीच कडेकोट बंदोबस्त केला आहे !

डॉ०:— मग हें तुम्हाला कसें कळलें ! ती थेरडी—

मी:— मामासाहेब, तुमच्या सर्व शंका व्यर्थ आहेत. थोडक्यांत सांगायचें म्हणजे तुम्ही एकदां माझ्याकडे नीट पहा ! व तो निंद्य खून चालला असतांना तुह्मांपुढें त्यावेळीं जो एक आंधळा होता तोच हा सांप्रतचा दुर्दैवी वसंतराव होय अशी आपली खात्री करून द्या ह्मणजे सर्व उलगडा होईल !

हे शब्द ऐकतांच तो ताडकन् उठून उभा राहिला व माझ्याकडे एकसारखा टक लावून पाहूं लागला. कांहीं वेळानें जणुं कांहीं खात्री झाली असें दाखवून तो म्हणाला, " अस्सें, तरी मला त्याचवेळीं शंका आली होती—पण जाऊंद्या—मग काय हो, तुम्हाला तर सर्व कांहीं समजलेंच म्हणायचें ! आतां माझी जरूर ती कुठे राहिली ? "

मी:— हां ! आणि तीच तर मोठी महत्वाची आहे !

डॉ०— मला नाहीं वाटत आतां कांहीं महत्वाचें बाकी राहिलें असें !

मी:- मामासाहेब, अजून तुमचा दुराग्रही स्वभाव तुम्हाला सोडीत नाहीं हें मोठेंच आश्चर्य ! असो. सर्व गोष्टी माझ्याच तोंडून वदविण्याची तुमची इच्छा दिसते एकूण ! तर माझीही कांहीं हरकत नाहीं. मामासाहेब, मालतीची व माझी जन्माची गांठ तुम्ही जी घालून दिलीत ती उभयतांना सुख व्हावें ह्मणून ना ? मग मालतीचा पूर्वेतिहास असा

निंद्य आहे हें जर तुम्हाला पुरतेपणीं माहीत होतें तर मुद्दाम जाणून बुजून माझा गळा कां कापलांत ?

डॉ:— पण मालतीबद्दल अशी हकीकत तुम्हाला कोणीं सांगितली ? कोण म्हणतो तिचा पूर्वेतिहास निंद्य होता म्हणून ?

मी:— तसें जर कांहीं नव्हतें तर मग तो खून कां केलांत ?

यावेळेस त्याच्या चेहेऱ्यावर राग व आश्चर्य स्पष्ट दिसूं लागून तो म्हणाला, " म्हणजे त्या मृत मनुष्यासंबंधानें तुमची कांहीं विपरीत कल्पना झाली आहे कीं काय ! "

मी:— होय मला तसा संशय आला व तो हणमंतरावानें जास्त वाढविला. त्यानें त्यासंबंधानें मला जें कांहीं सांगितलें तें इतकें हिडिस आहे कीं, तोंडांतून उच्चार करावयास सुद्धां शरम वाटते. तर मामासाहेब, आतां कृपा करा आणि तो मनुष्य कोण होता, तसेंच हणमंतराव म्हणतो त्याप्रमाणें खरोखरच मालतीचा व त्याचा कांहीं निंद्य संबंध होता कीं काय तें एकदां स्पष्ट सांगून या संशयांतून मला मोकळा करा. माझ्यानें ह्या असह्य वेदना याउप्पर सहन करवत नाहींत. शिवाय ह्या गोष्टीचा उलगडा माझ्या मनाप्रमाणें झाला नाहीं तर पुनश्च घराचें तोंड पहावयाचें नाहीं असा संकल्प करून मी बाहेर पडलों आहें. तेव्हां एकदां काय तो सोक्षमोक्ष करून टाका; म्हणजे मला एकदांचा राख फांसून जावयास बरें पडेल.

ह्या माझ्या भाषणाचा मात्र डाक्टरांवर खरोखरच कांहीं तरी विलक्षण परिणाम झाला असला पाहिजे. कारण हें मीं बोलत असतांनाच त्यांचा चेहरा आश्चर्य व क्रोध ह्या मनोविकारांनीं व्याप्त होऊन त्यांचें पर्यवसान शेवटीं शोकांत झालें. आतां तर त्यांच्या डोळ्यांतून

एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. मला ह्याचा अर्थ कांहींच समजेना व मीं आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे पहात राहिलों. परंतु त्यांनीं मला फारवेळ संशयांत ठेवलें नाहीं! लागलींच त्यांनीं आपले डोळे पुसले व ते बोलूं लागले—

"क्षमा करा वसंतराव! आतां माझ्या डोळ्यांपुढें चांगलाच प्रकाश पडला. खरोखरच मी तुमचा महान् अपराधी आहें. माझ्या पापाचें प्रायश्चित्त मी आतांपर्यंत भोगलें व तें पुरें झालें नाहीं म्हणूनच कीं काय, सांप्रत मी ही स्थिति अनुभवीत आहें. माझे असंख्य अपराध व विशेषतः मालतीच्या संबंधानें तुम्हाला मुग्ध ठेवून तिला व तुम्हाला निष्कारण भोगावयास लावलेल्या यातना अलीकडे कित्येक दिवस माझ्या काळजाला सारख्या टोंचीत असत, व एकवार तें सर्व तुम्हाला सांगून टाकावें असें सुद्धां कित्येक वेळां माझ्या मनांत येई; पण माझा दुराग्रही स्वभाव—अरेरे—पण हें असें काय होतें मला? हें डोळ्यांपुढें काय दिसूं लागलें."

इतके शब्द बोलून त्यांनीं डोकें खालीं टेंकलें. त्यांना कृतापराधाचा ह्यावेळीं पूर्ण पश्चात्ताप झाला असून त्याचाच हा परिणाम होता; पण मला त्यांची फार भीती वाटली. कारण आधींच ते अशक्त, त्यांतून त्यांच्यावर हा सांप्रतचा प्रसंग, अशा स्थितींत त्यांचें जर कांहीं बरें वाईट झालें तर ते बिचारे जीविताला मुकून माझे हेतू तसेच राहिले असते. परंतु लागलींच सुमारें दोन मिनिटांत ते पुनः स्मृतीवर येऊन बोलूं लागले—

"हें अलीकडे असें होऊं लागलें आहे. कांहीं तरी विलक्षण प्रकार डोळ्यांपुढें दिसतो व त्यानें ही अशी चक्कर

येते; पण तुम्ही तेवढ्यानें घाबरण्याचें कारण नाहीं. असो; ही माझी कर्मकटकट ऐकावयास लावून मी तुमचा वेळ फुकट घालवूं इच्छित नाहीं. आतां आपण मुख्य विषयाकडे वळूं या. पहिल्यानें तुमची मला अशी खात्री करून द्यावयाची आहे कीं, त्या नीच हणम्यानें तुम्हाला जें कांहीं सांगितलें तें निवळ खोटें आहे. तो मालतीचा, अर्थात् आमचा कोणी नव्हे इतकेंच नव्हे तर खरें पाहिलें असतां त्याची जात सुद्धां आमच्या बरोबरीची नव्हे. पण मी मूर्ख, पेंचांत सांपडल्यामुळें– त्याला जवळ केला– व त्याचा हा असा परिणाम झाला.' काय करूं हो, तो जर ह्यावेळीं माझ्या समोर येता तर अशाही स्थितींत मीं त्याच्या नरडीचा घोट घेतला असता ! ”

ह्या नंतर ते कांहीं वेळ थांबले; पण त्यांना यावेळीं इतका त्वेष चढला होता कीं, त्यांचे केश ताठ उभे राहिले होते व ते स्वतः आवेशानें थरथर कांपत होते. ह्या त्यांच्या बोलण्यानें हणमंतरावाचा नीचपणा मला चांगलाच कळून आला. मीं त्यांना “ शांत व्हा ” म्हणून सांगणार होतों; परंतु तेच पुढें बोलूं लागले.—

“ वसंतराव, मालती ही माझी भाची हें मीं तुम्हाला पूर्वीं सांगितलेंच होतें; पण मालतीला एक भाऊ होता हें सांगितलें नव्हतें.— ”

“ तर मग ज्याचा खून झाला तो तिचा भाऊ तर नव्हेना ? ” मीं मोठ्या उत्कंठेनें मध्येंच विचारलें. त्यांच्या डोळ्यांतून पुनः अश्रुधारा वाहूं लागल्या व ते सद्गदित कंठानें म्हणाले “ होय ! तोच तो बिचारा दुर्दैवी प्राणी ! आणि तीच हकीकत मी तुम्हाला आतां सांगणार होतों. त्या उभयतांचा बाप वारला त्यावेळीं त्यांचीं वयें सुमारें चार आणि दोन अशीं होतीं. बिचाऱ्यानें मरतांना जवळ

सुमारें तीन चार लाखांची इस्टेट केली होती. ती घेऊन ह्या मुलांसह माझी बहीण मजजवळ येऊन राहिली. आज ती स्वतः हजर असती तर हा प्रसंग कशाला येता ? पण त्या उभयतांच्या व माझ्या दुर्दैवानें तीही बिचारी पुढें दोन वर्षांनीं आम्हाला सोडून गेली व हीं मुलें पोरकीं झालीं. मरतांना तिनें सर्व इस्टेट माझ्या स्वाधीन केली व हीं मुलें माझ्या हातीं देऊन " ह्यांचा नीट संभाळ करा, ह्यांना आतां तुम्हीच बाप व्हा. " म्हणून डोळ्यांत पाणी आणून सांगितलें व " तसें करीन. " असें माझें वचन घेतल्यावर मग प्राण सोडला ! पण मी नीच ! तिला पुरते पंधरा दिवसही झाले नाहींत तोंच माझें वचन मी साफ विसरलों व ज्या द्रव्याच्या जोरावर आज त्या उभयतांना वाटेल तें सुख भोगतां आलें असतें त्या द्रव्याचा हवातसा दुरुपयोग करूं लागलों. व्यवस्थित रीतीनें एकादा व्यापार केला असता व त्यांत जरी एकादेवेळीं नुकसान आलें असतें तरी सुद्धां आज हा प्रसंग आला नसता. पण माझा धंदाच अति निंद्य—त्यांतच मी आज हा असा धुळीस मिळालों. असो; माझी बहीण वारल्यावर माझें स्वतःचें बिऱ्हाड वगैरे कांहींच नसल्यानें मीं मालतीच्या भावाला दक्षिणेंत पुण्यास शिकावयास ठेवलें. त्यावेळेस तो लहान होता म्हणून एका गृहस्थाच्या घरीं त्याची सोय केली व त्याच्याकडे दरमहा खर्चाकरितां नियमितपणें रक्कम पाठवीत होतों. असें करण्यांत पहिल्यानें माझा उद्देश वाईट नव्हता. त्याला चांगलें शिक्षण मिळून तो हुषार व्हावा असाच होता; परंतु पुढें मी जसजसा द्रव्याच्या बाबतींत खालावत चाललों तसतसा त्याला हिकडे आणूं नये व होतां होईल तों त्याच्या बापाच्या द्रव्यासंबंधानें मुग्ध ठेवावें असें मला वाटूं लागलें. पुढें पुढें तर दरमहा

सुद्धां नियमित जाईभासा झाला. हिकडे तो जसजसा मोठा होऊं लागला, तसतशी त्याला आमचेकडे येण्याची साहजिकच उत्कंठा उत्पन्न झाली; व ती मी दाबण्याचा प्रयत्न करीत आहें हें पाहून तर त्याला मजसंबंधानें शंका येऊं लागली, त्याच संधीस त्याला त्याच्या बापाच्या इस्टेटीसंबंधानें हकीकतही समजली. आपल्या बापाचा पुष्कळ पैसा असून आपण अशा हीन स्थितींत कां ह्याबद्दल त्याला वाईट वाटून त्यानें मला त्याप्रमाणें बरींच पत्रें पाठविलीं. परंतु मजकडून त्याला जेव्हां उडवाउडवीचीं उत्तरें गेलीं तेव्हां एके दिवशीं तो मजकडे निघून आला. नंतर सुमारें दोन वर्षें तो मजजवळ होता, बरेच दिवसपर्यंत त्याच्यानें मला उघड असे कांहींच विचारवलें नाहीं. परंतु एक दिवस त्यानें तो विषय मजजवळ काढला. माझ्या मनांत त्याला बुडवावयाचें नव्हतें; परंतु माझी सांपत्तिक स्थिति बरी नसल्या कारणानें मीं जरी साफ नकार दर्शवला नाहीं तरीपण ती गोष्ट चालढकलीवर घालविली. ह्याच सुमारास मालतीही उपवर झाली होती. अर्थात् तिच्याही लग्नाचा मजवर बोजा होताच. तिची कुठें तरी सुस्थळीं योजना करून मग जवळचें कांहीं खिडूकमिडूक होतें त्याची विल्हेवाट करावी व "फूल नाहीं पाकळी" ह्या न्यायानें त्याची कांहीं तोड करावी असा माझा विचार होता. हणमंतराव माझ्या धंद्यांतला साथीदार होता व माझा सर्व पैसा पर्यायानें त्याच्याच घशांत उतरला असल्या कारणानें ह्या कामांत त्याच्या कडून कांहीं मदत होईल ह्या आशेवर मी सहज ही गोष्ट त्याच्याजवळ काढली; परंतु त्या नीचानें पैशाच्या बदली मालतीची मागणी केली. मला ही गोष्ट कशी पसंत पडणार ! अर्थात् मी त्याला झिटकारला तथापि मी सर्वस्वी

त्याच्या अधीन झालों असल्यानें मला त्याला साफ दूर करवेना. पुढें पुढें जेव्हां माझ्या भाच्यानें पैशाबद्दल जास्त तगादा लावला तेव्हां ह्याचा एकदां कायमचा निकाल लावण्याकरतां ह्मणून आम्ही मुंबईस आलों. आमच्याबरोबर हणमंतरावही होताच. आम्ही दिवसभर कामाच्या निमित्तानें बाहेर असूं तेवढ्या वेळांत भाऊबहिणीची वरचेवर गांठ पडल्यानें हणमंतरावासंबंधानें माझ्या भाच्याच्या मनांत बराच तिरस्कार उत्पन्न झाला होता. अशाच स्थितींत एके दिवशीं आह्मीं सर्वजण बसून पैशाची काय तजवीज करावी ह्याबद्दल विचार करीत होतो. हणमंतराव पैसे द्यावयास कबूल झाला; परंतु त्यानें ती आपली दुष्ट अट पुढें आणली. माझ्या भाच्याला राग येऊन त्यानें हणमंतरावाचें मागणें साफ खोडून काढलें. हणमंतराव स्वभावानें तापट व माझा भाचा तरुण असून त्याचें रक्त ताजें असल्यानें उभयतांही अगदीं थोड्या वेळांत हातघाईवर आले. दोघेहीजण मोठमोठ्यानें भांडूं लागले. शेवटीं त्यांचें गालिप्रदान सुरू झालें व आतां कोणी मध्यें गेला नाहीं तर प्रसंग फार वाईट येणार असें वाटूं लागलें. हा विषय वाढून इतक्या विकोपाला जावा अशी माझी इच्छा नव्हती, ह्मणून मी दोघांनाही सामोपचाराच्या गोष्टी सांगूं लागलों; परंतु तेवढ्यांत माझ्या भाच्याच्या तोंडून कांहीं अपशब्द पडतांच हणमंतराव खवळून त्याच्या अंगावर धावला व आम्हीं त्याला आवरणार व दूर करणार तोंच त्या अधमानें यःकश्चित् क्षुल्लक कारणासाठीं— कमरेचा जंबिया काढून— आपल्या क्रूरपणाची कमाल केली ! झालें— याप्रमाणें— बिचारा माधव— माझा भाचा— माझ्या डोळ्यांसमोर विनाकारण बळी पडला ! आणि या सर्वांना कारण माझा मीच अधम चांडाळ!"

इतकें बोलत असतांना व विशेषतः ती शेवटचीं वाक्यें उच्चारतांना त्याचे डोळे पाण्यानें भरून आले होते व भाषण संपल्यावर तर त्याला तें दुःख अनावर होऊन त्यानें पुनः एकदां डोकें खालीं टेकलें. हा हृदयद्रावक मजकूर ऐकून माझ्या तर अंगावर शहारे आले; परंतु ह्या हकीकतीनें माझा संशय अजिबात दूर होऊन—माझ्या प्रेमळ पत्नी-विषयीं—तिची खरी स्थिति न समजून—घेतलेल्या अनेक शंका आतां मला डाचूं लागल्या. असो; ह्याप्रमाणें एका गोष्टीचा तर उलगडा झालाच. राहतां राहिला एक प्रश्न आणि तोही मालतीच्या प्रकृती-बद्दलचा. अर्थात् त्याचाही उलगडा करण्याच्या उद्देशानें त्यांना मी विचारण्याच्या बेतांत होतों तों तेच पुनः डोळे पुसून बोलूं लागले.

" असो ! हा प्रसंग गुदरल्यावर मी व मालती कलकत्त्याला आलों व त्याच ठिकाणीं तुमची व आमची एकदां गांठही पडली होती. हणमंतराव कांहीं दिवसपर्यंत आमचेकडे येत जात नव्हता; पण पुढें पुढें तो येऊं लागला. मी तर धंद्याच्या निमित्तानें त्याच्या हातांत अडकलेला, तेव्हां माझ्यानें त्याला नको ह्मणवेना; पण त्याच्या येण्यानें मालतीला त्रास होऊं लागला व ती दिवसांमुदिवस अगदीं क्षीण होत चालली. सबब मावशीला बरोबर देऊन चार दिवस हवा पालटण्याकरतां ह्मणून तिला मीं मुंबईस पाठविली. मला तिच्या लग्नाची मोठी काळजी होती; तितक्यांत तुमच्यासंबंधानेंही मजकूर कळला. ही गोष्ट मोठ्या आनंदाची खरी; परंतु मालतीचें लग्न झाल्यावर तिच्या तोंडून ही खुनाची हकीकत बाहेर न पडेल अशी कांहीं तरी तजवीज करणें अवश्य होतें व यासंबंधानें मावशीची व माझी खटपट सुरू होती. म्हणूनच तुम्हाला तिनें " हा नाद सोडून द्या ! " म्हणून

सांगितलें. परंतु पुढें जेव्हां तुम्हीं उघड उघड लग्नाबद्दल गोष्ट काढलीत व माझी व तुमची भेट होऊन लग्नाचें जुळलें तेव्हां आम्हांस दुसरा कांहींच मार्ग साधेना. शेवटीं बिचाऱ्या मालतीवर जादूचा प्रयोग करून तिची ही दशा करावी लागली ! पुढची हकीकत तुम्हाला माहीत आहेच. याप्रमाणें मी दोन्ही काळज्यांतून मुक्त झालों होतों; परंतु माझ्या अत्यंत निंद्य धंद्याच्या संबंधांत एकादें सरकारी किटाळ येऊं नये म्हणून इतके दिवस मी चुकवाचुकवी करीत होतों. अशाच प्रसं-गांत तुमची एकदां भेट झाली तेव्हां तुम्हालाही याचसाठीं कांहीं तरी खोटेनाटें सांगितलें. परंतु आतां अगदीं कळस झाला व जो खून मी पचला म्हणून समाधान मानीत होतों त्यालाही वाचा फुटून तुम्हाला सर्व हकीकत समजली. तेव्हां आतां तुम्हाला तरी कां दुःख भोगावयास लावूं ! ही घ्या; हीच ती भारलेली आंगठी ! हिचा तुम्हाला अगर मालतीला स्पर्श होतांच तिची प्रकृती दुरुस्त झाली पाहिजे, असा हिचा धर्म आहे. आजवर मीं ती जपून ठेवली पण आतां ती मी तुमच्या स्वाधीन करतों. ही घ्या. ”

इतकें बोलून डाक्टरांनीं एक मळकट अशी हाडाची आंगठी गजांतून मजकडे टाकली. ती अत्यंत महत्वाची मुद्रिका उचलून घेतांना मला कितीतरी आनंद झाला व माझ्या काळजावरील एक भयंकर वजन उतरल्यासारखें वाटलें. पण त्याचवेळीं डाक्टरांच्या स्थिती-बद्दल मला अत्यंत वाईट वाटून माझ्या डोळ्यांतून पाणी आलें. माझ्या तोंडांतून एक शब्द सुद्धां उमटेना ! मीं त्यांतूनही कांहीं बोलण्याचा प्रयत्न करणार तोंच माझ्या जवळच्या रक्षकानें “ वेळ झाली, आटपा. ” अशी सूचना दिली. ती ऐकून डाक्टर डोळ्यांत आंसवें

आणून मजकडे पाहून म्हणाले, “ झालें, वसंतराव, आतां तर कांहीं शंका राहिली नाहींना ? जा, आतां सुखानें नांदा. माझ्या मालतीला नीट जपा ! माझ्या नशीबीं तर सुख नाहींच; पण याउपर तुमच्या सुखांतच सुख मानून मीं माझे राहिलेले दिवस कंठीन ! माझ्याबद्दल तुम्हाला कोणत्याही तऱ्हेनें वाईट वाटायला नको ! माझ्या अपराधाच्या मानानें मला ही शिक्षा कांहींच नव्हे ! मी तुमचा मोठा अपराधी आहें. त्याचें प्रायश्चित्त तर मी भोगतोंच आहें; पण तुम्ही एकदां माझ्या सर्व अपराधांची ‘ क्षमा केली ’ असें म्हणा म्हणजे मला आनंद होईल ! जा आतां ! ”

मी यावर काय बोलणार ! अश्रूंनीं माझे डोळे भरून आले होते; शब्द तर तोंडावाटें बाहेर पडेनात; शेवटीं “ मीं येतों आतां ! ” असें मोठ्या कष्टानें म्हणून त्यांना नमस्कार केला व त्यांचा आशिर्वाद ग्रहण करून खिन्न अंतःकरणानें व त्यांच्याकडे वरचेवर पहात जड पावलांनीं रक्षकाबरोबर कसाबसा बाहेर पडलों !

यानंतरचें माझें काम म्हणजे पुनः एकवार पोलिस कचेरींत जाऊन साहेबांचे आभार मानणें एवढेंच होतें. तें आटपल्यावर मी तडक घरीं आलों. यावेळीं सुमारें चार वाजले होते. त्याच दिवशीं रात्रींच्या मेलनें माझा मुंबईस जाण्याचा विचार असल्यानें मी निघण्याची तयारी करूं लागलों. गाडी सुटावयास आतां अवघे पांचच तास होते. मानसिक विकारांचा काय पण जबरदस्त तडाका पहा ! यापूर्वीं मी दोनवेळ कलकत्त्यास आलों होतों; पण दोन्ही खेपेला दोन निरनिराळ्या मानसिक आधींनीं माझें हृदय व्याप्त असल्यानें येथून माझा पाय निघत नव्हता. परंतु आजची स्थिति फार निराळी होती. माझी सर्व चिंता दूर झाल्यामुळें व अंतःकरणावरील

एक असह्य दडपण नाहींसें झाल्यामुळें हे अवघे पांचच तास मला किती तरी दीर्घ वाटूं लागले !

असो ! सामानाची बांधाबांध करून व विशेषतः ती प्रिया संगम-कारिणी जादूची अंगठी नीट संभाळून घेऊन मी नियमित वेळीं स्टेश-नवर हजर झालों. कांहीं वेळानें घंटा झाली व आमची गाडी मोठ्या झपाट्यानें मुंबईच्या रस्त्याला लागली.

---

## प्रकरण पंधरावें.

सर्व वेगांमध्यें मनोवेगासारखी जलद गती दुसऱ्या कोणत्याही वेगाची नाहीं. आपली इच्छित वस्तू कितीही दूर असो व त्या वस्तूकडे आपणास नेणाऱ्या वाहनाची गती कितीही त्वरित असो; परंतु प्रत्यक्ष आपला देह त्याठिकाणीं जाण्याच्या किती तरी पूर्वीं आपण मनानें तेथें जाऊन पोंचतों. वास्तविक पहातां मालतीच्या व माझ्या-मध्यें केवढें तरी अंतर. सबंद दोन दिवस लागायचे जायला ! परंतु गाडींत माझें पाऊल पडतांच ती माझी हृदयदेवता माझ्यापुढें येऊन उभी राहिली व तिची प्रत्यक्ष भेट होईपर्यंत आपणाला आतां किती तरी वेळ काढावयाचा आहे हें पाहून मन उदास झालें. माझी उत्कंठा यावेळीं इतकी कांहीं प्रबळ झाली होती कीं, एखाद्या स्टेशनावर फक्त पांच मिनिटेंसुद्धां गाडी उभी राहिलेली मला खपत नव्हती. हिचा वेग ह्यापेक्षां जास्त कां वाढवीत नाहींत किंवा ही विनाकारण मध्यें थांब-वितात तरी कशाला ? अशा वेडगळ कल्पनांवर रेलवे कंपनीला मी

किती वेळ तरी दोष दिला ! पण माझ्या एकट्याच्या ह्या उत्कंठेला कोण विचारतो ? नियमाप्रमाणें ती बिचारी चालली होती व मलाही नियमितवेळीं मुंबईत नेऊन सोडणार होती. मी निघतों आहे म्हणून किंवा निघालों आहे म्हणून घरीं मुद्दामच कळविलें नव्हतें, एकदम अचानक घरीं जाऊन सर्वांना चकित् करण्याचा माझा विचार होता व ती वेळ केव्हां येईल ह्मणून मी मोठ्या उत्कंठेनें वाट पहात होतों. अखेरीस अशा रीतीनें तास मोजतां मोजतां व आतां घरीं गेल्यावर मालतीशीं आपण प्रथम बोलणारच नाहीं ! इतके दिवस तिनें अबोला धरल्याबद्दल तिला अगदीं खिजवून टाकूं वगैरे वगैरे अनेक आनंदाच्या कल्पनांवर कल्पना करीत एकदांचा बोरीबंदरवर उतरलों. इथून फक्त व्हिक्टोरिया करून दहाच मिनिटें जायचें कीं माझें घर ! इतका मी मालतीच्या अगदीं जवळ येऊन पोंचलों होतों; परंतु तो दहा मिनिटांचा प्रवाससुद्धां मला फार जड भासत होता. अथवा ह्यांत नवल तें काय ? कारण जसजसे आपण आपल्या उद्दिष्ट वस्तूजवळ जवळ जातों तसतशी ती आपणापासून दूर दूर जात आहे कीं काय असें वाटून आपली उत्कंठा प्रतिक्षणीं वाढत जाते, असा मानवी धर्मच आहे. असो; एकदांचें घर आलें आणि गाडींतून उतरून आंत असें पाऊल टाकणार तोंच जणुं कांहीं माझें स्वागत करण्याकरतांच कीं काय समोरच उभ्या असलेल्या माझ्या अधिष्ठात्री देवतेची—माझ्या प्रियमालतीची—व माझी नजरानजर झाली मात्र तोंच तिच्यावर लटकेंच रागावण्याच्या वगैरे माझ्या गाडींतल्या अनेक कल्पना जेथल्या जेथेंच जिरून गेल्या !

आज काय जिकडे तिकडे आनंदीआनंद होता. मी आल्याची

वर्दी समजतांच चातकाप्रमाणें माझी वाट पहात असलेला माझा मित्र सुंदररावही हजर झाला. ज्यावेळीं कलकत्त्यास डाक्टरनीं ती मारलेली अंगठी मजजवळ दिली, त्याचवेळीं इकडे मालतीची प्रकृती एकदम अचानक बरी झाली होती. अर्थात् आमच्या घरांत त्याच दिवशीं आनंदोत्सवास सुरुवात झाली होती. त्यांत उणीव काय ती फक्त माझीच होती व आज तर तीही भरून निघाली होती. तेव्हां त्या आनंदास एकपरीं विशेष जोर आला होता. रात्रौ आमच्या घरीं तर जणुं मोठ्या मेजवानीचा बेत होता. सुंदररावही पंक्तीला होतेच. त्यांनीं तर आज थट्टेची अगदीं कमाल केली. थोडक्यांत सांगावयाचें झटलें तर झालेली सर्व हकीकत सांगून व त्याच्या नानाविध थट्टांच्या कचाट्यांतून सुटून मोकळा व्हावयास मला रात्रौ बारा वाजले ! अथवा हें असें व्हायचेंच, कारण समवयस्क मित्रांचा महिमा तसाच कांहीं विचित्र असतो !

असो; वाचकहो ! माझें कथानक वास्तविक पहातां इथेंच संपलें. कारण ह्या पुढचा भाग ह्मणजे माझ्या प्रियेची व माझी जणुं प्रथमच झालेली एकांती भेट. त्या प्रसंगीं आम्हीं उभयतांनीं आजपर्यंत गुदरलेल्या प्रसंगांची वरचेवर आठवण करून किती वेळां अश्रू गाळले ! ह्यापुढें तरी आह्मां उभयतांचा एक क्षणभर सुद्धां वियोग होणार नाहीं ह्मणून किती वेळां आणा शपथा वाहिल्या. डाक्टर शांताराम, हणमंतराव वगैरे अधमांच्या नीच कृत्यांबद्दल आह्मांला किती राग आला व बिचाऱ्या निरपराध माधवाच्या मृत्युबद्दल आह्मांला किती दुःख झालें वगैरे वगैरे अनेक सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्यांत ती थोडी बहुत उरलेली रात्र कशी निघून गेली हें आमचें

आह्मांलाच समजलें नाहीं. अर्थात् तें तुह्मांला तरी कसें सांगूं ? इतकें मात्र खरें कीं, या दिवसापासून माझ्या खऱ्या सुखाला प्रारंभ झाला. अथवा ह्यांत मोठेंसें नवल होतें असें नाहीं ? कारण मालती सारखें रत्न आणि तेंही इतके सायास करून ज्याच्या पदरीं पडलें त्याच्या सुखाला काय वाण ?

असो ! ज्या मंगलमय प्रभूंच्या कृपाप्रसादानें अनेक दुःखें भोगून व आशानिराशेच्या भयंकर आवर्तातून अनेक वेळां पार पडून अखेर आज हा सोन्याचा दिवस आम्हीं पाहिला; तोच सर्व सुखदायी जगच्चालक तुह्मां सर्वांना असाच मंगलप्रद होवो, अशी त्याच्याजवळ प्रार्थना करून आह्मीं उभयतांही आपली रजा घेतों ! ! !

# उपसंहार.

माझ्या जीवनचरित्राचा विचित्र कथाभाग दर मागच्याच प्रकरणांत संपला. परंतु तेवढ्याच आयुष्यक्रमांत माझ्याशीं ज्यांचा विशेष संबंध आला व ज्यांच्या योगानेंच तो आयुष्यक्रम परिणामीं अशा-रीतीनें सुखकर झाला त्या कांहीं कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या संबंधानें चार ओळी दिल्या पाहिजेत. येवढ्याचकरतां हें प्रकरण आहे.

माझ्याशीं जिचा जास्त संबंध आला व केवळ जिच्या प्रेमळ व मायाळू स्वभावामुळेंच मी हें जग पाहिलें, अशी व्यक्ती ह्मणजे काशी होय ! तिचें माझ्यावर किती प्रेम होतें, तिला मजबद्दल किती काळजी होती व ती मला सुख व्हावें एतदर्थ किती झटत होती इत्यादि गोष्टी खरोखरच माझ्या लेखणीच्या बाहेरच्या आहेत ! दुर्दैवानें जे माता-पितरांच्या सुखाला मुकले असतील व ज्यांना काशीसारखी कोणी तरी काळजी घेणारी असेल त्यांनाच ती कल्पना होणार आहे; इतरांना काय ? असो. मालतीची प्रकृती बरी झाल्यावर काशीला किती तरी आनंद झाला. तिला ती अगदीं जीव कीं प्राण करीत असे. आधींच ती वयानें पिकलेंपान झाली होती. त्यांतच मालतीच्या व पर्या-यानें माझ्या काळजीनें ती अगदीं थकून गेली होती; परंतु त्यांतल्या-त्यांत इतक्या साऱ्या कष्टांचा शेवट गोड झाला हें पाहून तिला किंचित् हुषारी वाटत होती. आतां तिची एकच इच्छा होती ती हीच कीं, मालतीच्या व माझ्या प्रेमाचें असें कांहींतरी एक फळ दृष्टीस पडावें. परंतु, सर्वभक्षक कालापुढें कुणाच्या आशा व इच्छा पुऱ्या होणार ?

तिची तीही इच्छा आतां लवकरच पुरी होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं; पण माझ्या दुर्दैवानें एके दिवशीं ती आम्हां सर्वांना हाय हाय करावयास मागें ठेवून मोठ्या शांतपणानें हा लोक सोडून गेली ! ! ! तिच्या मृत्यूनें मला फार दुःख झालें; कारण तिच्या वयाच्या मानानें जरी हें मोठेंसें वावगें नव्हतें तरी पण ज्यावेळीं मला तिच्या-सारख्या मायेच्या माणसाची विशेष जरूर अशा ऐनप्रसंगीं काळानें तिला आपलीशी केली. ह्यायोगानें तिचा मृत्यु मला विशेष जाणवला !

नंबर दोनचें पात्र म्हणजे डॉ० शांताराम. वास्तविक पहातां माझ्या काशीच्या पंक्तीला बसण्याची यांची योग्यता मुळींच नव्हे; पण कसे झाले तरी ते माझ्या मालतीचे मामा; अर्थात् माझे सासरे—म्हणून त्यांना अगदीं काशीजवळच जागा देणें भाग पडलें आहे. माझ्या अल्पशा जीवनचरित्रांत त्यांचा माझा जो संबंध आला तेवढ्यावरून मला त्यांचा प्रथम फार तिरस्कार वाटत होता व अशा अधम मनुष्याला कांहीं तरी जबर शासन असावें असें मला मनापासून वाटत होतें ही गोष्ट खरी; परंतु कलकत्त्यास त्यांच्यावरील तो शेवटचा अत्यंत भयंकर प्रसंग पाहून व विशेषतः त्यांनीं मला सर्व हकीकत सांगितली तेव्हांची त्यांची शोचनीय स्थिति जाणून माझा राग व तिरस्कार पार जिरून गेला. इतकेंच नव्हे तर मला त्यांची उलट कींव येऊं लागली. त्यांना कांहीं तरी मदत करावी असें मला किती तरी वेळ वाटे ! परंतु त्या बाबतींत माझा नाइलाज होता ! ह्यावेळचा त्यांचा अपराध मानवीदयेच्या अगदीं बाहेरचा असल्यानें माझा त्यांना कोणत्याही तऱ्हेचा उपयोग होण्या-सारखा नव्हता. असो; ते अंदमानला गेल्यानंतर मधुन मधुन कल-

करत्याच्या पोलिसकमिशनर मार्फत मला त्यांचा समाचार समजत असे. पण ईश्वरानें त्यांना ही दुःखद स्थिति भोगावयास ह्या जगांत फार दिवस ठेवलें नाहीं. माझी त्यांची शेवटची भेट झाल्यानंतर सुमारें दोन वर्षांनीं त्यांचा तेथेंच अंत झाल्याची खबर आली आणि अशा रीतीनें तरी बिचारा ऐहिक हाल अपेष्टांतून मोकळा झाला ! पण अखेर त्यांचा तो इतका नीच धंदा काय होता हें गूढ मात्र त्यांचें त्यांच्याबरोबर गेलें ! !

नंबर तीन हणमंतराव ! तोही त्या दिवशीं माझ्या घरांतून निसटून गेल्या दिवसांपासून प्रत्यक्ष तर कधीं भेटला नाहींच; पण त्याची हकीकत मात्र बरेच दिवसांनीं समजण्याचा योग आला. डॉ० शांताराम वारल्याची हकीकत समजल्यानंतर सुमारें चार महिन्यांनीं आम्हीं उभयतांही सहज हवा खाण्याच्या निमित्तानें कलकत्त्यास गेलों होतों. ह्यावेळेस हणमंतरावाची आह्मांला मुळीं सुद्धां स्मृती नव्हती; परंतु एक दिवस नित्याप्रमाणें एक दैनिकपत्र वाचित असतांना " फांशीची शिक्षा " अशा जाड टाइपांनीं छापलेल्या एका मथळ्याकडे माझी सहज नजर गेली. काय आहे म्हणून त्या खालील मजकूर वाचूं लागलों तों सर्व हकीकत हणमंतरावाची. तो सर्व भाग कांहीं ह्याठिकाणीं देत बसत नाहीं. त्यांतला मतलब इतकाच होता कीं, हणमंतराव एकामोठ्या दरवड्यांत पकडला जाऊन त्याच्यावर दोन खुनांचा आरोप शाबीद झाल्यामुळें तो ह्या देहान्त शिक्षेस पात्र झाला होता. मला ह्याबद्दल मुळींसुद्धां वाईट वाटलें नाहीं. कारण, हा प्रसंग त्याच्यावर मागेंच यावयाचा; परंतु माझ्या हलगर्जीपणामुळें त्याचें आयुष्य इतके दिवस वाढलें होतें. तात्पर्य, त्यानेंही आपल्या कृतकर्माचें कडक प्रायश्चित्त भोगलें ! !

नंबर चार मावशी तिचा माझा अर्थाअर्थी कांहींच संबंध नव्हता; पण एकवेळ मजकडून जबर लांच खाऊन कां होईना पण ती माझ्या थोडीबहुत उपयोगीं पडली होती. एवढ्या वरूनच तिलाही ह्या ठिकाणीं स्थान दिलें आहे. बरेच दिवस तिची ही हकीकत मला कळली नव्हती; पण एक दिवस ती सहज समजली. ती जातीची स्त्री असूनही हणमंतरावासारख्या अधमांचा संसर्ग बाधल्यामुळें त्यांचा अंश तिच्यामध्येंही थोडाबहुत उतरला होता. तिच्या हातून ह्मणजे फार मोठा गुन्हा झाला होता असें नाहीं; परंतु माझ्या मालतीसारखाच एका सन्मान्य गृहस्थाच्या मुलीवर जादू टोणा करून तिला फूस लावून बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तिच्यावर शाबीद झाल्यामुळें तूर्त कांहीं दिवस तिला सरकारची पाहुणी होण्याचा योग आला होता ! ! !

वाचकहो, पहा ! काशी, डॉक्टर शांताराम, हणमंतराव व मावशी ह्या चार व्यक्त्या तुम्हांपुढें मांडल्या आहेत. ह्यांतून तुह्मी कोणती पसंत कराल ?

समाप्त.